CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT


सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २२ मे २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १७३ | पाने १२ | किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपल्याला संस्थेच्या माध्यमातून समाजाला सुखी, समृद्ध करायचे आहे. त्याला आत्मनिर्भर बनवायचे आहे. आपल्या प्रत्येक कार्यकर्त्याचा ध्येयबिंदू आपला समाजच असायला हवा. समाजालाच आराध्य दैवत मानून काम केले, तर आपल्याला अपेक्षित यश मिळेल आणि जीवनात ध्येयपूर्तीचा अनुभव येईल.

**स्व. लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# ईदला पशुबळी अनिवार्य नाही

**बकरी ईदपूर्वी उच्च न्यायालयाचा निर्णय | उघड्यावर जनावरांची कत्तल करण्यावर बंदी | पशुहत्या नियमांना स्थगिती देण्यास नकार**

◆ **कोलकाता, २१ मे**

पश्चिम बंगाल सरकारने जारी केलेल्या पशुहत्या नियमांना स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिका कलकत्ता उच्च न्यायालयाने गुरुवारी फेटाळून लावली. उघड्यावर जनावरांची कत्तल करण्यावरील बंदी कायम राहणार असून, गायींचा बळी देण्यास परवानगी दिली जाणार नसल्याचे न्यायालयाने आदेशात म्हटले आहे. ईदच्या सणाला गोवंशाचा बळी देणे अनिवार्य नसल्याचे स्पष्ट करत याचिकाकर्त्याला फटकारले. बकरी ईदच्या पृष्ठभूमीवर न्यायालयाने हा निर्णय दिला.

न्यायालयाने सांगितले की १३ मे रोजीची सरकारी अधिसूचना नवीन नाही, तर ती केवळ २०१८ मध्ये न्यायालयाने दिलेल्या पूर्वीच्या आदेशांची अंमलबजावणी आहे. कोणत्याही प्राण्याची सार्वजनिक ठिकाणी कत्तल करण्यास पूर्णपणे मनाई राहील, असे अधिसूचनेत नमूद करण्याचे आदेश न्या. सुजॉय पॉल आणि न्या. पार्थ सारथी सेन यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला दिले. पश्चिम बंगाल सरकारने बकरी ईदच्या पृष्ठभूमीवर मार्गदर्शक सूचना जारी केल्या. त्यावर आक्षेप घेत तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा आणि आमदार अखरुझमान यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

सरकारने घातलेल्या निर्बंधांचा पशुपालकांवर प्रतिकूल परिणाम होणार असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला. तंदुरुस्ती प्रमाणपत्राशिवाय जनावरांची कत्तल करण्यास बंदी घालणारा सरकारचा नियम बेकायदेशीर असल्याचे त्यांनी युक्तिवादात सांगितले. यावर खंडपीठाने म्हटले की, ईदच्या दिवशी गोबळी देणे हा इस्लामचा आवश्यक भाग नाही. न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या निर्णयाचा (हनीफ कुरेशी प्रकरण) उल्लेख करताना सांगितले की, राज्य सरकारला अधिसूचनेत त्याचा समावेश करण्याचा अधिकार आहे.



### गोबळी धार्मिक आवश्यकता नाही

**उच्च न्यायालयाने म्हटले की, ईद-उल-अझहाच्या दिवशी गोबळी देणे हा इस्लामचा आवश्यक भाग नाही. त्यामुळे बंगाल सरकारच्या पशुहत्या नियमांना स्थगिती देता येणार नाही. सरकारी अधिसूचना नवीन नाही, तर ती केवळ २०१८ मध्ये न्यायालयाने दिलेल्या पूर्वीच्या आदेशांची अंमलबजावणी आहे. कोणत्याही प्राण्याची उघड्यावर कत्तल करण्यास पूर्णपणे मनाई आहे.** ■

**सरकाच्या नियमावलीत काय म्हटले ?**

राज्य सरकारच्या नियमांनुसार, पश्चिम बंगालमध्ये कोणत्याही जनावराच्या कत्तलीसाठी योग्य प्रमाणपत्र आवश्यक असेल. केवळ १४ वर्षांपेक्षा जास्त वयाची किंवा आजारपणामुळे वा दुखापतीमुळे अपंग असलेल्या जनावरांचीच कत्तल करण्यास परवानगी दिली जाईल. ◂(वृत्तसंस्था)

### पशुपालकांचे आर्थिक नुकसान

**या प्रकरणी न्यायालयात हजर झालेल्या महुआ मोईत्रा म्हणाल्या की, गरीब लोक जनावरे विकून काही पैसे वाचवण्याच्या आशेने ती पाळतात. मात्र, राज्य सरकारच्या या अधिसूचनेमुळे ज्यांची उपजीविका पशुपालनावर अवलंबून आहे, त्यांना आर्थिक नुकसान होईल. पशुहत्या कायदा, १९५१ च्या कलम १२ मध्ये शिथिलता मिळवून बैल, वळू आणि म्हशींचा बळी देण्याची परवानगी देण्यात यावी, मात्र न्यायालयाने त्यांची मागणी फेटाळून लावली.** ■

# बंगालमध्ये सर्व मदरशांत 'वंदे मातरम्' बंधनकारक

**शुभेन्दू सरकारचे निर्देश, अहवाल करावा लागेल सादर**

◆ **कोलकाता, २१ मे**

पश्चिम बंगालच्या शुभेन्दू सरकारने राज्याच्या अल्पसंख्याक व्यवहार आणि मदरसा शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व मदरशांमध्ये 'वंदे मातरम्'गायन अनिवार्य केले आहे. १९ मे रोजी जारी केलेल्या आदेशानुसार, हा नियम सरकारी मॉडेल मदरसे, सरकारी अनुदानित आणि विनाअनुदानित मान्यताप्राप्त मदरशांना तात्काळ लागू होईल.

सरकारच्या नवीन आदेशानंतर आता वर्ग सुरू होण्यापूर्वी सकाळच्या प्रार्थना सभेत 'वंदे मातरम्'गाणे आवश्यक असेल. यापूर्वी मदरशांमध्ये सकाळच्या प्रार्थनेदरम्यान राष्ट्रगीत 'जन गण मन' आणि कवी गुलाम मुस्तफा यांचे 'अनंत असीम प्रेममय तुमी' (बंगाली गीत) गायले जात होते. आता सर्व मदरशांना हा आदेश लागू केल्यानंतर याचा अहवाल विभागाला सादर करावा लागेल. यापूर्वी पश्चिम बंगाल सरकारने १३ मे रोजी राज्यातील सर्व सरकारी आणि अनुदानित शाळांमध्ये सकाळच्या प्रार्थना सभेत 'वंदे मातरम्'अनिवार्य केले आहे. सर्व विद्यार्थ्यांना यात सहभागी व्हावे लागेल. ◂(वृत्तसंस्था)

### जन गण मनपूर्वी गायिले जाईल 'वंदे मातरम्'

**या वर्षी २६ जानेवारी रोजी ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य परेडची थीम 'वंदे मातरम्'ठेवण्यात आली होती. परेडदरम्यान 'वंदे मातरम्'ची झांकीही काढण्यात आली होती. केंद्र सरकारने ११ फेब्रुवारी रोजी राष्ट्रगीत 'वंदे मातरम' संदर्भात नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. आदेशात स्पष्टपणे लिहिले होते की, जर राष्ट्रगीत 'वंदे मातरम' आणि राष्ट्रगान 'जन गण मन' एकत्र गायले किंवा वाजवले गेले तर आधी 'वंदे मातरम्'गायले जाईल. यावेळी गाणाऱ्या किंवा ऐकणाऱ्यांना सावधान मुद्रेत उभे राहावे लागेल.** ■

## महत्त्वाचे

### सेन्सेक्स-निफ्टी घसरले, पण गुंतवणूकदारांची चांदी

**मुंबई :** शेअर बाजारात गुरुवारी कमालीची अस्थिरता पाहायला मिळाली. सकाळच्या सत्रात जोरदार तेजीसह सुरुवात करणाऱ्या बाजाराला अखेरच्या सत्रात मात्र ती गती टिकवता आली नाही. मोठ्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये झालेल्या नफावसुलीमुळे दोन्ही मुख्य निर्देशांक घसरणीसह बंद झाले. असे असले तरी, मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समधील खरेदीच्या जोरावर गुंतवणूकदारांच्या संपत्तीत तब्बल दीड लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त वाढ झाली. दिवसाची सुरुवात मोठ्या गॅप-अप ओपनिंगने झाली होती. सुरुवातीला मोठ्या कंपन्यांच्या शेअर्सनी बाजाराला वर खेचले, परंतु दिवस पुढे सरकत असताना बाजाराने आपली सर्व वाढ गमावली. अत्यंत चढ-उतारांच्या सत्रानंतर सेन्सेक्स १३५.०३ अंकांनी घसरून ७५,१८३.३६ वर बंद झाला. दुसरीकडे, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीमध्येही किरकोळ ४.३० अंकांची घसरण झाली. ■

### अमेरिकन शिष्टमंडळ येणार व्यापार करार अंतिम करणार

**नवी दिल्ली :** अंतरिम व्यापार कराराचे घटक निश्चित करण्यासाठी आणि सर्वसमावेशक द्विपक्षीय व्यापार कराराच्या दिशेने प्रगती साधण्यासाठी अमेरिकेचे शिष्टमंडळ जून महिन्यात भारत दौऱ्यावर येणार असल्याची माहिती गुरुवारी वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. सर्वसमावेशक द्विपक्षीय व्यापार कराराच्या दिशेने प्रगती साधण्यासाठी एप्रिलमध्ये वॉशिंग्टन येथे भारतीय आणि अमेरिकन अधिकाऱ्यांची समोरासमोर बैठक झाली होती. व्यापार कराराचा मसुदा अंतिम करण्यासाठी जून महिन्यात दोन्ही देशांच्या शिष्टमंडळाची समोसमोर बैठक होणार असल्याचे गोयल पत्रकारांशी बोलताना म्हणाले. वाटाघाटींचे मुख्य मध्यस्थ असलेले अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो २३ मे पासून सुरू होणाऱ्या चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. ■

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या किंवा** ९८८१०११६६२ व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधा.

सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

# 'पुलवामा'चा सूत्रधार हमजा ठार

**व्याप्त काश्मिरात अज्ञात हल्लेखोरांनी घातल्या गोळ्या**

◆ **इस्लामाबाद, २१ मे**



पुलवामा दहशतवादी हल्ल्याचा मुख्य सूत्रधारांपैकी एक हमजा बुरहानला व्याप्त काश्मीरमध्ये अज्ञात हल्लेखोरांनी ठार केले. २०१९ च्या पुलवामा हल्ल्यात ४० भारतीय जवान हुतात्मा झाले होते.

डॉक्टर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हमजावर मुझफ्फराबादमध्ये हल्ला करण्यात आला. हल्लेखोरांनी त्याच्यावर बेछूट गोळीबार केला. यात त्याचा जागीच मृत्यू झाला.

काश्मीर खोऱ्यातील पुलवामाचा रहिवासी बुरहानचे खरे नाव अर्जुमंद गुलजार दार असून त्याला २०२२ मध्ये केंद्रीय गृह मंत्रालयाने दहशतवादी घोषित केले होते. स्थानिक माध्यमांच्या वृत्तानुसार, मुझफ्फराबादमधील एआयएसएस कॉलेजबाहेर हमजाची गाडी वाहतूक कोंडीत अडकली असताना हल्लेखोरांनी त्याच्यावर बेछूट गोळीबार केला. यात तो जागीच ठार झाला. वृत्तानुसार, हमजा बुरहानचा संबंध पाकिस्तानस्थित एका दहशतवादी नेटवर्कशी होता. पुलवामा हल्ल्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती. अर्जुमंद गुलजार दार उर्फ हमजा बुरहान २०१५ पासून पाकिस्तानात राहत होता. तो अल बद्रचा कमांडर होता आणि दहशतवाद्यांची भरतीही करीत असे. हमजा हा युनायटेड लिबरेशन फ्रंटचा एक प्रमुख दहशतवादी होता. जे अल बद्र या दहशतवादी संघटनेचे टोपणनाव आहे. ◂(वृत्तसंस्था)

### मुख्याध्यापक म्हणून वावरत होता

**मिळालेल्या माहितीनुसार, आपली ओळख लपवण्यासाठी हमजा पाकिस्तानात एका शाळेचा मुख्याध्यापक म्हणून काम करीत होता. त्याचे समर्थक त्याला एक डॉक्टर म्हणून ओळखत होते. या वेषात तो दहशतवादी प्रशिक्षण शिबिरे आणि घुसखोरीची जाळे चालवत होता. हमजा जैश-ए-मोहम्मदसारख्या नेटवर्कसोबत जवळून काम करत होता. काश्मीरमधील वास्तव्यादरम्यान हमजाने आपले जाळे पुलवामापासून शोपियानपर्यंत विस्तारले होते.** ■

### पहलगाम दहशतवादी हल्ल्याचाही सूत्रधार

**पुलवामा हल्ल्याप्रकरणी एनआयएच्या आरोपपत्रातही त्याचे नाव होते. पुलवामा व्यतिरिक्त तो जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचाही मुख्य सूत्रधार होता. तो पाकिस्तानमधून दहशतवादी कारवाया करत होता. हमजा ठार झालेले दहशतवादी अबू दुजाना, अबू कासिम, बुरहान वानी आणि झाकीर मुसा यांचा जवळचा सहकारी होता.** ■



वांद्रे पश्चिम उपनगरातील रेल्वेच्या जागेवरील अतिक्रमण हटविण्याची कारवाई गुरुवारी तिसऱ्या दिवशीही सुरूच होती. बुधवारी झालेल्या दगडफेकीच्या घटनेनंतर मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता

### फालता मतदारसंघात ८७.७३ टक्के मतदान

**कोलकाता:** पश्चिम बंगालच्या दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील फालता विधानसभा मतदारसंघात गुरुवारी फेरमतदान झाले. यावेळी ८७.७३ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. विशेष म्हणजे, मतदान शांततेत पार पडले. कोणतीही अनुचित घटना घडली नाही. या मतदारसंघाचा निकाला २४ मे रोजी जाहीर केला जाईल. ■

# आरोपीची ओळख परेड, वैद्यकीय तपासणी होणार

**२८ मे रोजी दोषारोप निश्चितीची सुनावणी ● नसरापूर अत्याचार व हत्या प्रकरण**

◆ **पुणे, २१ मे**

नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याच्या प्रकरणातील आरोपी मानसिकदृष्ट्या सक्षम आहे की नाही, याची तपासणी करण्यात येणार आहे. आरोपीची ओळख परेड तसेच वैद्यकीय तपासणी करण्यास परवानगी देण्याबाबत गुरुवारी विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात अर्ज करण्यात आला होता. तपास अधिकाऱ्यांनी विशेष सरकारी वकील अजय मिसर यांच्यामार्फत केलेला हा अर्ज न्यायालयाने मंजूर केला.

आरोपी भीमराव कांबळे याच्याविरोधात विविध कलमान्वये राजगड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या प्रकरणात ११०० पानांचे दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले असून गुरुवारपासून सुनावणीला सुरुवात झाली.

सुनावणीदरम्यान विशेष सरकारी वकील अजय मिसर, मूळ तक्रारदाराचे वकील मनीष पाडेकर, पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल आणि तपास अधिकारी उपस्थित होते. कांबळे हा सध्या न्यायालयीन कोठडीत असून त्याला व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपीची ओळख परेड घेण्यास आणि तो मानसिकदृष्ट्या सक्षम आहे की नाही, हे तपासण्यासाठी वैद्यकीय चाचणी करण्यास परवानगी दिली. तसेच आरोपीला दोषारोपपत्राची प्रत देण्यात आल्याची माहितीही न्यायालयात सादर करण्यात आली. आरोपीच्या बचावासाठी अनुभवी विधि सहाय्य वकिलाची नियुक्ती करण्याचे निर्देश न्यायालयाने जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाला दिले.

ओळख परेड आणि वैद्यकीय तपासणी पुढील सुनावणीपूर्वी पूर्ण करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. पुढील सुनावणी २८ मे रोजी होणार असून आरोपीला प्रत्यक्ष न्यायालयात हजर करण्याची मागणी सरकार पक्ष आणि बचाव पक्षाकडून करण्यात आली होती. ◂(तभा वृत्तसेवा)

**नीट पेपरफूट प्रकरण**

# डॉ. मनोज शिरूरेंना अटक

**मुलासाठी प्रश्नपत्रिका खरेदी केल्याचा आरोप**

◆ **पुणे, २१ मे**

देशभरात खळबळ उडवणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने मोठी कारवाई करत लातूरमधील बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांना अटक केली आहे. स्वतःच्या मुलाला परीक्षेत फायदा मिळवून देण्यासाठी त्यांनी आरोपी शिवराज मोटेगावकरकडून प्रश्नपत्रिका खरेदी केल्याचा गंभीर आरोप तपास यंत्रणांनी केला आहे.

लातूरहून चौकशीसाठी पुण्यात आणल्यानंतर सीबीआयने अनेक तास कसून चौकशी केली आणि त्यानंतर शिरूरेंना अटक करण्यात आली. या प्रकरणात विद्यार्थ्यांच्या पालकाला झालेली ही पहिली अटक आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. मनोज शिरुरे हे लातूरमधील जुना औसा रोड परिसरातील सिद्धिविनायक बाल रुग्णालयाचे संचालक आहेत. सीबीआयचे पथक रविवारीपासून लातूरमध्ये तळ ठोकून असून मोटेगावकरच्या संपर्कातील सर्व संशयितांची चौकशी सुरू आहे. शिरुरे यांच्या रुग्णालयात पोहोचलेल्या अधिकाऱ्यांनी साडेचार तास तपास केला. या दरम्यान काही महत्त्वाची कागदपत्रे, मोबाईल फोन आणि डिजिटल पुरावे जप्त करण्यात आले. प्राथमिक तपासात डॉ. शिरुरे यांचे शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी यांच्याशी संबंध असल्याचे उघड झाले आहे. मागील काही वर्षांपासून ते या नेटवर्कच्या संपर्कात असल्याचा संशयही सीबीआयला आहे.

**शिवराज मोटेगावकर ब्रँड अँबेसिडर**

नीट पेपरफुटीचा सुत्रधार शिवराज मोटेगावकर बीडमधील 'प्रोफेशनल टीचर्स असोसिएशन' या शिक्षक संघटनेचा ब्रँड अँबेसिडर असल्याचे समोर आले आहे. आता सीबीआयने मोटेगावकरच्या मालमत्तेचीही माहिती नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून मागविली आहे. ही माहिती शोधण्यासाठी मोटेगावकरने केलेल्या सर्व दस्तांची माहिती घेण्यात येणार आहे. नीट पेपरफूट प्रकरणात आतापर्यंत महाराष्ट्रातील सुमारे पाच जणांना अटक झाली आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### बीडमध्ये दोन विद्यार्थी, शिक्षिकेची चौकशी

**नीट पेपरफुटी प्रकरणाचे बीड आणि लातूर कनेक्शन अधिक गडद होताना दिसत आहे. अंबाजोगाईतील दोन विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या शिक्षिका आईची केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) तब्बल सव्वादोन तास कसून चौकशी करण्यात आली. हे दोन्ही बहीण-भाऊ लातूरमध्ये शिक्षण घेत होते. यापैकी बहीण रिपीटर विद्यार्थीनी असून ती पुन्हा नीट परीक्षा देत होती. तर भाऊ पहिल्यांदाच परीक्षेला बसला होता. हा पेपर या दोघांसाठीच घेण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.** ■

## अंतरंग

२ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद नाहीत
३ नरसंहाराने कलंकित राष्ट्राने उपदेश करू नये
४ ऊर्जासंकट पेलणारे ऊर्जाबळ! (अग्रलेख)
६ अश्मिता चालिहा उपांत्यपूर्व फेरीत

# शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडेंना अटक

**साधू-संतांवरील टीका भोवली**

◆ **पुणे, २१ मे**

वारकरी संप्रदाय, हिंदू संत-महंत आणि धार्मिक व्यक्तींविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांना वाघोली पोलिसांनी गुरुवारी अटक केली. पुणे न्यायालयाने त्यांचा अंतरिम अटकपूर्व जामीन संरक्षण अर्ज फेटाळल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली.

या प्रकरणी नलिनी आशिष वायाळ (वय ४१, रा. आर. टी. ओ. शेजारी, येरवडा) यांनी वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. विकास लवांडे यांनी २९ एप्रिल रोजी युट्यूबवरील एका व्हिडीओमध्ये वारकरी संप्रदायातील संत, कीर्तनकार आणि धार्मिक व्यक्तींना 'घुसखोर' म्हटल्याचा आरोप आहे. तसेच आक्षेपार्ह भाषा वापरून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यानुसार भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, या प्रकरणात पुण्याच्या अतिरिक्त सत्र न्यायालयाने लवांडे यांना दिलेले अंतरिम अटकपूर्व जामीन संरक्षण काढून घेतले. गुरुवारी लवांडे यांना अटक करण्यात आली. लवांडे यांच्या अटकेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाधक्ष्य शशिकांत शिंदे, आमदार रोहित पवार यांनी थेट वाघोली पोलिस ठाण्यात आंदोलन करत कारवाईचा निषेध नोंदविला. ◂(तभा वृत्तसेवा)

# भूमी अभिलेख विभागाचा होणार कायापालट

## ५० नवी कार्यालये अन् १० हजारांपेक्षा अधिक पदांची मेगाभरती!

◆ **मुंबई, २१ मे**

राज्यातील जमीन मोजणी, मालमत्तांचे क्लिष्ट वाद आणि वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी राज्य सरकारने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे.



भूमी अभिलेख (जमीन महसूल) विभागाचे सक्षमीकरण करणारा एक धाडसी निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यात एकाच वेळी ५० नवीन कार्यालये सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. या प्रशासकीय विस्तारासोबतच बेरोजगार तरुणांसाठी नोकऱ्यांची मोठी संधी निर्माण झाली असून, तब्बल १० हजार ६८३ पदांच्या नवीन आकृतीबंधाला मंजुरी देण्यात आली आहे. याबाबतचा अधिकृत शासन निर्णय देखील जारी करण्यात आला आहे.

वाढते शहरीकरण आणि जमिनींचे व्यवहार पाहता भूमी अभिलेख विभागावरील कामाचा ताण प्रचंड वाढला होता. यामुळे लाखो मोजणी प्रकरणे प्रलंबित होती. यावर तोडगा काढण्यासाठी शासनाने ११ मार्च २०२६ रोजीच सुधारित आकृतीबंधाला मान्यता दिली होती.

आता या नव्या कार्यालयांची ठिकाणे आणि त्यांचे कार्यक्षेत्र निश्चित करून प्रत्यक्ष अंमलबजावणीला वेग देण्यात आला आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### नव्या कार्यालयांची रचना

- **उपसंचालक कार्यालय: १ (नांदेड येथे)**
- **जिल्हा अधीक्षक कार्यालये: ८ (नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, अहिल्यानगर, नाशिक, पुणे आणि रायगड)**
- **नगर भूमापन अधिकारी कार्यालये (सीटीएस): २३**
- **विशेष उप अधीक्षक कार्यालये: १७ (प्रामुख्याने नाशिक आणि अमरावती जिल्ह्यांत)** ■

### शहरी भागातील वादांवर तत्काळ तोडगा

**शहरांमधील जमिनींचे आणि मालमत्तांचे वाद मिटवण्यासाठी राज्यातील २३ प्रमुख शहरांमध्ये नवीन नगर भूमापन अधिकारी कार्यालये थाटली जाणार आहेत. यामध्ये पुणे, नागपूर, ठाणे (कल्याण, डोंबिवली, मिरा-भाईंदर), पालघर (वसई, विरार), रायगड (अलिबाग), नाशिक (मालेगाव), अहिल्यानगर, सातारा (कराड), छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, लातूर, बीड, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा आणि चंद्रपूर या प्रमुख शहरांचा समावेश आहे.** ■

### नागरिकांची चकरांमधून सुटका

**ग्रामीण भागातील गावठाण विस्तार आणि शहरीकरणाच्या वेगवान प्रक्रियेमुळे मालमत्तांची मोजणी, हद्द निश्चिती आणि मालकी हक्काची चौकशीची कामे रखडली होती. परिणामी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत होते. नागरिकांची हीच अडचण ओळखून महसूल विभागाने हा मेगा प्लॅन अमलात आणला आहे.** ■

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### अमरनाथ यात्रेसाठी ३.६ लाखांहून अधिक नोंदणी



**श्रीनगर** : ३ जुलैपासून सुरू होणाऱ्या अमरनाथ यात्रेसाठी आतापर्यंत ३.६ लाखांहून अधिक भाविकांनी नोंदणी केली आहे. यात्रा मार्गावर अनेक ठिकाणी अजूनही १० ते १२ फूट बर्फ साचलेला आहे, परंतु सीमा रस्ते संघटना (बीआरओ) दोन्ही मार्गांवर वेगाने मार्ग पूर्ववत करण्यात गुंतली आहे. १५ जूनपर्यंत दोन्ही मार्ग पूर्णपणे तयार केले जाणार असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. यात्रा ३ जुलैपासून बालटाल-सोनमर्ग आणि पारंपरिक नुनवान-पहलगाम मार्गाने सुरू होईल. ५७ दिवसांची ही यात्रा २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन आणि श्रावण पौर्णिमेच्या दिवशी संपेल. यासाठीची नोंदणी १५ एप्रिलपासून सुरू झाली आहे. ५ ते ३० लोकांच्या गटात प्रवास करणाऱ्या भाविकांसाठी नोंदणी बुधवारी बंद झाली. तथापि, एकट्याने किंवा लहान गटात येणाऱ्या भाविकांसाठी स्लॉट उपलब्ध असेपर्यंत नोंदणी सुरू राहील. नोंदणी पंजाब नॅशनल बँक, जम्मू-काश्मीर बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि येस बँकेच्या निश्चित शाखांमार्फत होत आहे. या वर्षी यात्रेकरूंची संख्या ५ लाखांच्या पुढे जाईल, अशी अपेक्षा प्रशासनाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

# राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद नाहीत

## सुनील तटकरेंनी धुडकावल्या अंतर्गत नाराजीच्या चर्चा

◆ **मुंबई, २१ मे**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत कलह आणि धुसफूस असल्याच्या बातम्या केवळ अफवा असून, पक्षात कोणतेही मतभेद नाहीत. पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक भक्कम करण्यासाठी आणि तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्व प्रमुख नेते लवकरच एकत्रितपणे राज्याचा दौरा करणार आहेत, अशी महत्त्वपूर्ण घोषणा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी केली. मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट केली.



पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या संदर्भात निवडणूक आयोगाला जे सुधारित पत्र सादर करायचे आहे, त्याची प्रक्रिया सुरू असून येत्या काही दिवसांतच ते दिले जाईल. नुकत्याच पार पडलेल्या पक्षांतर्गत बैठकीत या मुद्द्यावर सर्व नेत्यांमध्ये अतिशय सकारात्मक आणि सविस्तर चर्चा झाल्याची माहिती तटकरे यांनी दिली. (तभा वृत्तसेवा)

### एनडीएसोबतची घोडदौड कायम राहणार

राष्ट्रवादी काँग्रेस हा राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा (एनडीए) एक भक्कम आणि अविभाज्य घटक पक्ष आहे, हे तटकरे यांनी आवर्जून नमूद केले. ते पुढे म्हणाले की, भाजपच्या नेतृत्वाखाली देश आणि राज्य पातळीवर सुरू असलेला विकासाचा वारसा आम्ही असाच पुढे नेऊ. विकासाभिमुख भूमिकेवर पक्ष ठाम असून, आगामी काळात राज्याच्या प्रगतीला आणखी वेग दिला जाईल.

### विलीनीकरणाच्या मुद्द्याला पूर्णविराम

**विलीनीकरणाच्या चर्चेवर बोलताना तटकरे म्हणाले की, शरद पवार गटाकडून खासदार सुप्रिया सुळे आणि प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी त्यांची भूमिका यापूर्वीच स्पष्ट केली आहे. त्यामुळे आता यावर नव्याने कोणतीही चर्चा शिल्लक राहत नाही. आमच्या पक्षात पूर्ण लोकशाही आहे, सर्व नेते एकाच मंचावर बसून एकमताने निर्णय घेतात, असे सांगत त्यांनी विरोधकांच्या टीकेला सडेतोड उत्तर दिले.**

## कालही नव्हतो, आजही नाराज नाही

◆ **नवी दिल्ली, २१ मे**

मी कालही नाराज नव्हतो, आणि आजही नाराज नाही, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे लोकसभेतील गटनेते सुनील तटकरे यांनी केले.

गुरुवारी आपल्या दिल्लीतील निवासस्थानी पत्रकारांशी बोलतांना तटकरे म्हणाले की, मी नाराज असल्याबाबत ज्या बातम्या येत आहे, त्यात काही तथ्य नाही. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली, तेव्हापासून मी पक्षासोबत जोडलो आहे. जवळपास ४२ वर्षापासून मी राजकारणात आहे.

२०२३ मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीसोबत जाण्याचा जो निर्णय पक्षातर्फे घेण्यात आला, त्यातही माझा सहभाग होता. त्यामुळे मी नाराज होण्याचा प्रश्नच उदभवत नाही, असे ते म्हणाले. पक्ष चालवत असतांना काही अडचणी उदभवत असतात, त्यावर चर्चेतून तोडगा निघत असतो, याकडे लक्ष वेधत तटकरे म्हणाले की, निवडणूक आयोगाला पुनर्पत्र पाठवायचा निर्णय झाला आहे. या प्रक्रियेला थोडा वेळ लागू शकतो. त्यातून सगळे प्रश्न सुटतील. यासंदर्भात सुनेत्राताई पवार यांच्याशी आमची चर्चा झाली आहे. जे काही समज गैरसमज होते, ते सगळे दूर झाले आहेत. झिशान सिद्दीकी यांना बी फॉर्म देतांना त्यावर माझी सही होती, त्यांच्या आमदारकीला कोणताच धोका नाही, त्यांची आमदारकी जाण्याचा प्रश्नच उदभवत नाही, असे तटकरे यांनी स्पष्ट केले. (तभा वृत्तसेवा)

# भटक्या श्वानाने चावा घेतल्यास तुम्ही जबाबदार

## सर्वोच्च न्यायालयाचे प्राणिप्रेमींना निर्देश



◆ **नवी दिल्ली, २१ मे**

सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांच्या व्यवस्थापनासंदर्भात एक महत्त्वपूर्ण आणि कठोर निकाल दिला आहे. प्राणिप्रेमी, विद्यार्थी संघटना किंवा प्राणी हक्क गट सार्वजनिक आणि शैक्षणिक परिसरातील भटक्या श्वानांना खायला घालू शकतात आणि त्यांची काळजी घेऊ शकतात. परंतु, श्वानांच्या चाव्यांमुळे लोकांना होणाऱ्या त्रासाची जबाबदारीही त्यांनीच स्वीकारली पाहिजे, असे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.



न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन. व्ही. अंजारीया यांच्या न्यायासनाने म्हटले आहे की, प्राणी कल्याण गट आणि विद्यार्थी संघटनांनी शैक्षणिक परिसरातील भटके कुत्रे स्वतःच्या जोखमीवर ठेवावेत किंवा त्यांना खायला घालावे. कुत्र्यांच्या कोणत्याही चाव्यासाठी किंवा संबंधित नुकसानीसाठी ते कायदेशीररीत्या जबाबदार असतील, हे त्यांनी मान्य केले पाहिजे. यासाठी एक प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

### प्राण्यांचे हक्क मानवी जीवनापेक्षा मोठे नाही

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, अशा प्राण्यांचे हक्क किंवा हितसंबंध मानवी जीवन आणि सुरक्षेच्या संरक्षणापेक्षा मोठे असू शकत नाहीत. शैक्षणिक संस्थांमधील प्राणी कल्याण गट किंवा विद्यार्थी संघटना, कॅम्पसमध्ये कुत्रा चावल्यास किंवा त्यामुळे होणाऱ्या कोणत्याही नुकसानीची कायदेशीर जबाबदारी स्वीकारणारे औपचारिक प्रतिज्ञापत्र सादर केल्यानंतरच भटक्या कुत्र्यांना खायला घालू शकतात किंवा त्यांची काळजी घेऊ शकतात, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

### काय आहे प्रकरण?

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय हैदराबादस्थित नालसार युनिव्हर्सिटी ऑफ लॉने दाखल केलेल्या अर्जावर आला आहे. नालसारने न्यायालयाला सांगितले की, त्यांनी त्यांच्या ॲनिमल लॉ सेंटरच्या माध्यमातून भटक्या कुत्र्यांचे मानवीय व्यवस्थापन संस्थात्मक केले आहे. हे केंद्र विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या सहभागाने नसबंदी, लसीकरण आणि जनजागृती कार्यक्रम राबवते.

# ऑनलाईन सुनावणी सक्तीची करता येणार नाही

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा; आदेश जारी करण्यास नकार

◆ **नवी दिल्ली, २१ मे**

इंधन बचत करण्यासाठी दिल्लीतील सर्व न्यायालयांमध्ये आभासी पद्धतीने (ऑनलाईन) सुनावणीची परवानगी देण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. ऑनलाईन सुनावणी सक्ती करता येणार नाही आणि असा आदेश आम्ही जारी करू शकत नसल्याचे यावेळी सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी स्पष्ट केले. सर्व न्यायालयांमध्ये ऑनलाईन सुनावणीची घेण्याची मागणी एका वकिलाने याचिकेतून केली होती.

यावर झालेल्या सुनावणीत सरन्यायाधीश म्हणाले, हा विषय न्यायालयीन पातळीवर हाताळता येणार नाही. सर्व उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींना त्यांच्या पातळीवर ऑनलाईन सुनावणी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र या विषयावर न्यायालयीन आदेश जारी करणे योग्य ठरणार नाही. वकील संघटना आणि न्यायपीठ दोघांनीही स्वेच्छेने करायची ही गोष्ट आहे. जिल्हा न्यायालये ही उच्च न्यायालयांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असतात आणि त्याबाबतचा निर्णय उच्च न्यायालयांनीच घेणे योग्य ठरेल. दरम्यान, केंद्र सरकारच्या इंधन बचत उपायांना पाठिंबा देत सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच काही प्रशासकीय निर्णय घेतले होते; ज्यामध्ये ठरावीक श्रेणीतील खटल्यांसाठी व्हर्च्युअल सुनावणी बंधनकारक करण्यात आली होती. हा नियम संकीर्ण कामकाजाचे दिवस (सोमवार आणि शुक्रवार) तसेच न्यायालयाच्या अर्धवेळ कामकाजाच्या दिवसांसाठी लागू करण्यात आला. (वृत्तसंस्था)

# 'ब्रह्म'पुरीवर 'सूर्या'चा प्रकोप; ४७.१ अंश

## उत्तरप्रदेशातील बांदा शहरात ४८.२ तापमान



◆ **नागपूर, २१ मे**

मागील काही दिवसांपासून विदर्भातील तापमानात सतत वाढ होत आहे. चंद्रपूर जिल्ह्यासाठी २१ मे हा यावर्षीच्या उन्हाळ्यातील सर्वाधिक उष्ण दिवस ठरला असून, विदर्भातच नव्हे तर राज्यात ब्रह्मपुरीत सर्वाधिक ४७.१ अंश इतके तापमान नोंदविण्यात आले. तिथेच चंद्रपुरात ४६.८ अंश सेल्सिअस तापमान होते.

विशेष म्हणजे, उत्तरप्रदेशातील बांदा शहरात देशातील सर्वाधिक ४८.२ इतक्या प्रचंड तापमानाची नोंद करण्यात आली आहे. सलग तिसऱ्या दिवशी या शहरात उच्चांकी तापमान नोंदविण्यात आले.

हवामान विभागाने चंद्रपूर जिल्ह्यासाठी इशारा देताना जिल्ह्यात शुक्रवार ते रविवार या कालावधीत तीव्र उष्णतेच्या लाटेचा 'यलो अलर्ट' दिला आहे. गडचिरोली आणि वर्धेत ४६.४, नागपुरात ४६.०, अमरावतीत ४५.८, गोंदियात ४५.२, यवतमाळ व भंडारा शहरात ४५.०, अकोला ४४.९, वाशिम ४२.६, बुलढाण्यात ४१.० अंश सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद घेण्यात आली आहे. दरम्यान, हवामान विभागाने २६ मे पर्यंत केरळात मान्सूनचे आगमन होणार असल्याचे भाकित वर्तविले असले, तरी महाराष्ट्रात मान्सून ८ जूनपर्यंत येणार असल्याने तोपर्यंत तापमानात चढ-उतार अनुभवास येणार आहे. (तभा वृत्तसेवा)

## दिल्ली-बंगळुरू विमानाला अपघात

◆ **नवी दिल्ली, २१ मे**

एअर इंडियाचे दिल्लीहून बंगळुरूला जाणारे विमान २६५१ गुरुवारी केंपेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरताना धावपट्टीला घासले. विमानाचा मागील भाग जमिनीला लागला. या घटनेला विमानचालन भाषेत टेल स्ट्राइक असे म्हणतात. विमानाची छायाचित्रे सोशल मीडियावर समोर आली आहेत, ज्यात त्याच्या मागील भागावर ओरखडे दिसत आहेत. विमान सुरक्षितपणे उतरवण्यात आले. या घटनेत कोणताही प्रवासी किंवा क्रू सदस्य जखमी झाल्याची माहिती नाही. सर्वांना बाहेर काढण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

# पाच वर्षांत २६ दहशतवाद्यांचा खात्मा

## 'सिक्रेट किलर'ची पाकिस्तानात चर्चा

◆ **नवी दिल्ली, २१ मे**

पुलवामा हल्ल्याचा सूत्रधार हमजा बुरहानच्या हत्येनंतर पाकिस्तानात 'सिक्रेट किलर'ची जोरदार चर्चा सुरु झाली आहे. २०१९ नंतर भारताचे शत्रू असलेले पाकिस्तानचे अनेक दहशतवादी मारल्या गेले. या सर्वांची हत्या अज्ञात हल्लेखोरांनी केल्याचे समोर आले आहे. हे अज्ञात हल्लेखोर कोण होते, याचा आतापर्यंत खुलासा झालेला नाही. गत चार ते पाच वर्षांमधील घटनाक्रमांकावर नजर टाकल्यास आतापर्यंत सुमारे पाच वर्षांत २६ पेक्षा अधिक दहशतवाद्यांचा खात्मा झालेला आहे.




२०२२ पासून पाकिस्तानमधील वेगवेगळ्या घटनांमध्ये अज्ञात हल्लेखोरांनी लश्कर-ए-तोयबाचा सदस्य हंझला अदनान, लश्कर-ए-तोयबाचा दहशतवादी मोहम्मद मुजम्मिल, जैश-ए-मोहम्मदचा कमांडर मौलाना तारिक रहीम उल्लाह, अक्रम खान उर्फ अक्रम गाझी, ख्वाजा शाहिद, दाऊद इब्राहिमशी संबंधित मोहम्मद सलीम, मसूद अझरचा सहकारी दाऊद मलिक, आयएसआय एजंट मुल्ला बहूर उर्फ होर्मुझ, शाहिद लतीफ, अबू कासिम, सरदार हुसेन अराईन, सय्यद नूर शालोबार, अल-बद्रचा माजी कमांडर खालिद रझा, हिजबुल मुजाहिदीनचा कमांडर बशीर अहमद पीर, खलिस्तान कमांडो फोर्सचा प्रमुख परमजीत सिंग पंजवार, खालिद रझा, मिस्त्री झहूर इब्राहिम, लश्कर-ए-तोयबाचा संस्थापक सदस्य आमिर हमजा, जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अझरचा भाऊ मोहम्मद ताहिर अन्वर, कुख्यात कमांडर बिलाल आरिफ सलाफी, कारी एजाज आबिद, लष्कर-ए-तोयबाचा निधी संकलक अब्दुल रहमान, मुफ्ती अब्दुल नूरझाई, फैसल नदीम उर्फ अबू कताल, जमीयत उलेमा-ए-इस्लामचा दहशतवादी मुफ्ती शाह मीत, मौलाना काशिफ अली, आयएसआयचा लॉन्च पॅड कमांडर फारूक, शेख जमील उर रहमान आणि दहशतवादी अमीर सरफराज तांबाची हत्या करण्यात आली. (वृत्तसंस्था)

## क्यूबाच्या माजी राष्ट्राध्यक्षांवर अमेरिकेत हत्येचा गुन्हा

◆ **वॉशिंग्टन, २१ मे**

अमेरिकेने क्यूबाचे माजी राष्ट्राध्यक्ष राउल कॅस्ट्रो यांच्यावर १९९६ मध्ये दोन विमाने पाडल्याच्या हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. अमेरिकेच्या न्याय विभागाने सांगितले की, ही कारवाई अमेरिकन नागरिकांच्या हत्येच्या प्रकरणात करण्यात आली आहे.

मियामीमध्ये कार्यवाहक ॲटर्नी जनरल टॉड ब्लांश यांनी राउल कॅस्ट्रो आणि इतर पाच लोकांविरुद्ध आरोपांची घोषणा केली. यात म्हटले की, १९९६ मध्ये क्युबा आणि फ्लोरिडा दरम्यान ब्रदर्स टू द रेस्क्यू गटाची दोन विमाने पाडण्यात आली होती. या घटनेत चार लोकांचा मृत्यू झाला होता, ज्यात तीन अमेरिकन नागरिक होते. त्यावेळी राउल कॅस्ट्रो क्युबाच्या लष्कराचे प्रमुख होते. अमेरिकेने त्यांच्यावर अमेरिकन नागरिकांच्या हत्येचा कट रचणे, विमान नष्ट करणे आणि चार हत्यांचे आरोप लावले आहेत. (वृत्तसंस्था)

## अन्न-औषधांची टंचाई; २० लाख पॅलेस्टिनी बेजार

**जेरुसलेम** : गाझावरील इस्रायलच्या नौदल नाकाबंदीला झुगारून गाझामध्ये मदत पोहोचविण्यासाठी निघालेल्या ग्लोबल सुमुद फ्लोटिला या संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या बोटींच्या ताफ्याला इस्रायली सैन्याने अडवले. गाझामध्ये असलेली अन्न, औषधे व जीवनावश्यक अन्य बाबींची तीव्र टंचाई असून तेथील २० लाख पॅलेस्टिनींना हलाखीत जीवन जगावे लागत आहे. त्या भीषण परिस्थितीकडे लक्ष वेधण्याचा कार्यकर्त्यांचा हा प्रयत्न होता.

# ६० दिवसांत नोकरी शोधा अथवा अमेरिका सोडा

## एच-१बी व्हिसाधारक भारतीय तंत्रज्ञांना अंतिम इशारा

◆ **नवी दिल्ली, २१ मे**

अमेरिकेतील तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर झालेल्या नोकरकपातीच्या नव्या लाटेमुळे तेथे राहणारे हजारो भारतीय अभियंते आणि सॉफ्टवेअर डेव्हलपर्स संकटात सापडले आहे. एच-१बी व्हिसाधारक भारतीय तंत्रज्ञांना ६० दिवसांत नोकरी शोधा अथवा अमेरिका सोडा, असा इशारा देण्यात आला आहे.

जे लोक अनेक वर्षांपासून अमेरिकेत काम करत होते, ज्यांनी घरे विकत घेतली होती आणि आपल्या कुटुंबासह स्थायिक झाले होते, त्यांच्यासाठी त्यांच्या कंपनीकडून आलेला केवळ एक ई-मेल सर्व काही बदलून टाकणारा आहे. मेटा, ॲमेझॉन आणि लिंक्डइनसारख्या मोठ्या कंपन्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि ऑटोमेशनमुळे मोठ्या प्रमाणावर नोकरकपातीचा सामना करावा लागत आहे. अमेरिकेत राहणाऱ्या भारतीय व्यावसायिकांसाठी नोकरी गमावणे म्हणजे केवळ आर्थिक नुकसान नव्हे तर देश सोडण्याच्या उलटगणतीची सुरुवात आहे. (वृत्तसंस्था)

### कमी वेळात दुसरी कंपनी शोधणे आव्हानात्मक

अमेरिकेत काम करणारे बहुतेक भारतीय तंत्रज्ञान व्यावसायिक एच-१बी व्हिसावर आहेत, जे थेट त्यांच्या कंपनीशी जोडलेले असतात. नोकरी गमावल्यानंतर त्यांच्यासमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे वेळ. अमेरिकेच्या इमिग्रेशन नियमांनुसार, त्यांना आपला व्हिसा हस्तांतरित करण्यासाठी दुसरी कंपनी शोधायला खूप कमी वेळ मिळतो. जर ते या कालावधीत नवीन प्रायोजक शोधण्यात अयशस्वी ठरले, तर त्यांना कायदेशीररीत्या अमेरिका सोडावी लागते. याचा त्यांच्या संपूर्ण जीवनावर परिणाम होतो. कारण यामध्ये केवळ नोकरी शोधणेच नव्हे, तर मुलांचे शिक्षण, गृहकर्ज, आरोग्यसेवा आणि कुटुंबाच्या भविष्याशी संबंधित निर्णयांचाही समावेश असतो.

### काय आहे नियम?

यूएस सिटिझनशिप अँड इमिग्रेशन सर्व्हिसेसच्या नियमांनुसार, नोकरीवरून कमी केलेल्या एच-१ कर्मचाऱ्यांना साधारणपणे ६० दिवसांचा सवलतीचा कालावधी मिळतो किंवा जोपर्यंत त्यांच्या आय-९४ ची स्थिती वैध आहे. यापैकी जे आधी येईल तोपर्यंतचा कालावधी मिळतो. हा ६० दिवसांचा कालावधी कर्मचाऱ्याच्या शेवटच्या कामाच्या दिवसापासून सुरू होतो. त्यांना शेवटचा पगार मिळाल्याच्या दिवसापासून नाही.

# २७ जहाल नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

## सहा जणांवर होते प्रत्येकी पाच लाखांचे बक्षीस







शरण आलेल्या महिला नक्षलवाद्यांचा छत्तीसगड पोलिसांनी सत्कार केला. तसेच शरणागतीनंतर नक्षलवाद्यांनी शस्त्रे पोलिसांकडे सुपूर्त केली.

◆ **रांची, २१ मे**

झारखंडमधील नक्षलविरोधी मोहिमेत सुरक्षा दलांना आतापर्यंतचे सर्वात मोठे यश मिळाले आहे. सारंडा आणि कोल्हान भागातील दीर्घकाळ सक्रिय असलेले २५ माओवादी आणि बंदी घातलेल्या जेजेएमपी संघटनेच्या दोन दहशतवाद्यांसह २७ नक्षलवाद्यांनी गुरुवारी रांची येथील पोलिस मुख्यालयात आत्मसमर्पण केले. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच एकाच दिवशी एवढ्या मोठया प्रमाणात सामूहिक आत्मसमर्पण करण्यात आले आहे.

डीजीपी तदाशा मिश्रा आणि वरिष्ठ पोलिस व सीआरपीएफ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या एका समारंभात या नक्षलवाद्यांनी आपली शस्त्रे टाकून मुख्य प्रवाहात परतण्याचा निर्णय घेतला. आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये आठ कट्टर नक्षलवाद्यांचा समावेश आहे. त्यांच्यावर सरकारने लाखो रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. यात पाच लाख रुपयांचे बक्षीस असलेले सहा नक्षलवादी, दोन लाख रुपयांचे बक्षीस असलेला एक नक्षलवादी आणि एक लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या एका महिला नक्षलवाद्याचा समावेश होता.

**४२६ गंभीर गुन्हे दाखल होते**

पोलिसांच्या माहितीनुसार, राज्यभरातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये या आत्मसमर्पण केलेल्या दहशतवाद्यांविरुद्ध एकूण ४२६ गंभीर गुन्हे दाखल होते.

त्यांच्यावर खून, पोलिस दलांवर हल्ले, खंडणी, स्फोटके आणि सशस्त्र कारवाया यांसारखे आरोप आहेत. आत्मसमर्पणादरम्यान नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांकडे मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा सुपूर्द केला. यामध्ये एक एलएमजी (इन्सास), चार इन्सास रायफल्स, नऊ एसएलआर, एक बोल्ट-ॲक्शन रायफल, एक पिस्तूल, ३१ मॅगझिन्स, २९८७ काडतुसे आणि आठ वॉकी-टॉकीचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

### कमांडर, सक्रिय कार्यकर्त्यांसह महिलांचा समावेश

**सुरक्षा दलांच्या सततच्या कारवाया आणि झारखंड सरकारच्या आत्मसमर्पण व पुनर्वसन धोरणामुळे प्रभावित होऊन मुख्य प्रवाहात परतलेल्यांमध्ये सीपीआय (माओवादी) चे सात उप-विभागीय कमांडर, सात क्षेत्र कमांडर आणि १३ सक्रिय कार्यकर्त्यांचा समावेश होता. आत्मसमर्पण केलेल्या प्रमुख नक्षलवाद्यांमध्ये गडी मुंडा उर्फ गुलशन, नागेंद्र मुंडा उर्फ प्रभात मुंडा, रेखा मुंडा उर्फ जयंती, सागेन अंगारिया उर्फ डोकोल, सुलेमान हंसदा उर्फ सुनी हंसदा यांच्यासह जेजेएमपी संघटनेचे सचिन बेक, महिला कार्यकर्त्यांमध्ये वंदना उर्फ शांती, सुनीता सरदार, सपना उर्फ सुरू कलुंडिया आणि अनिशा कोडा उर्फ राणी यांचा समावेश आहे. तसेच दर्शन उर्फ बिंज हंसदा, करण टियू उर्फ डांगूर, बसुमती जेराई उर्फ बसू, बैजनाथ मुंडा, रघु कायम उर्फ गुणा, किशोर सिरका उर्फ दुर्गा सिरका आणि राम दयाल मुंडा यांच्यासह इतर अनेक दहशतवादी मुख्य प्रवाहात परतले आहेत.**

# इबोला विषाणूचा वाढता धोका

## केंद्र सरकारकडून विशेष आरोग्य सूचना जारी

◆ **नवी दिल्ली, २१ मे**

कोरोना महामारीनंतर आता इबोला विषाणूचे नवे संकट जगासमोर उभे ठाकले आहे. इबोला विषाणूचा वाढता धोका लक्षात घेऊन केंद्र सरकारने काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदानमधून भारतात येणाऱ्या किंवा त्या देशांमार्गे प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी विशेष आरोग्य सूचना जारी केली आहे. लक्षणे आढळल्यास किंवा संसर्गिक व्यक्तीच्या संपर्कात असल्यास इमिग्रेशन प्रक्रिया पूर्ण करण्यापूर्वी तातडीने विमानतळावरील आरोग्य अधिकाऱ्यांना माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आरोग्य सेवा महासंचालनालयाने जारी केलेली ही नियमावली दिल्ली विमानतळासह देशातील प्रमुख विमानतळांवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये जागतिक आरोग्य संघटनेने उच्च जोखमीचे देश म्हणून घोषित केलेल्या डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदानचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे.

**लक्षणे दिसल्यास प्रवासाचा तपशील आरोग्य अधिकाऱ्यांना द्या**

दिल्ली विमानतळावरील एअरपोर्ट हेल्थ ऑर्गनायझेशनकडून ही सूचना प्रदर्शित करण्यात आली आहे. यात ताप, अशक्तपणा, डोकेदुखी, स्नायूंमध्ये वेदना, उलट्या, जुलाब, घसा खवखवणे आणि कोणताही अनपेक्षित रक्तस्राव ही इबोलाची प्रमुख लक्षणे असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच, इबोला बाधित किंवा संशयित रुग्णाच्या रक्त अथवा शरीरातील द्रवांच्या थेट संपर्कात आलेल्या प्रवाशांनी तातडीने विमानतळावरील आरोग्य अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असेही सांगण्यात आले आहे. भारतात आल्यानंतर पुढील २१ दिवसांत कोणत्याही प्रवाशामध्ये इबोलासदृश लक्षणे दिसल्यास त्यांनी त्वरित वैद्यकीय उपचार घ्यावेत आणि आपल्या प्रवासाचा तपशील आरोग्य अधिकाऱ्यांना द्यावा. (वृत्तसंस्था)

### भारतात अद्याप एकही रुग्ण नाही

केंद्रीय आरोग्य सचिव पुण्य सलीला श्रीवास्तव यांनी बुधवारी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या आरोग्य सचिवांसोबत उच्चस्तरीय बैठक घेत देशातील तयारी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा आढावा घेतला. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने स्पष्ट केले की, सध्या भारतात इबोलाचा एकही रुग्ण आढळलेला नाही. मात्र, जागतिक आरोग्य संघटनेने इबोलाला आंतरराष्ट्रीय आरोग्य आणिबाणी घोषित केल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून भारताने देशभरात उपाययोजना अधिक सक्रियपणे मजबूत केल्या आहेत.

## अग्रलेख...

# ऊर्जासंकट पेलणारे ऊर्जाबळ!

पश्चिम आशियातील दीर्घकाळ सुरू असलेल्या संघर्षामुळे भारतात ऊर्जासंकट गडद झाले आहे हे खरे आहे; पण हे संकट एकट्या भारतातील नाही. जगातील अनेक राज्यांना इराण-अमेरिका युद्धाच्या झळा पोहोचू लागल्या आहेत. भारताप्रमाणे अन्य अनेक देशांना ऊर्जासंकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक देशांतील ऊर्जासंकटामुळे अर्थव्यवस्था खिळखिळ्या होऊ लागल्या आहेत, इंधनाची तीव्र टंचाई जाणवू लागली आहे. विदेशी चलनाच्या तिजोऱ्या रित्या होऊ लागल्या आहेत. भारताची स्थिती मात्र अजूनही या संकटाशी भक्कमपणे सामना करत आहे. काही आठवड्यांपूर्वी तेल, इंधन वायू टंचाईच्या भीतीने जनतेची तारांबळ उडाली आणि टंचाईसदृश स्थिती निर्माण झाल्याची भावना जनतेमध्ये पसरविण्याच्या विरोधकांच्या प्रयत्नांनी त्यामध्ये भर घातली, पण परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी सरकारने व यंत्रणांनी प्रामाणिकपणे केलेल्या प्रयत्नांचा अनुभव लोकांस येऊ लागल्यावर विरोधकांचा तो डाव फसला. वस्तुतः सद्यस्थितीत निर्माण झालेल्या ऊर्जासंकटास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सरकार जबाबदार नाही, ही बाब जनता जाणते. या परिस्थितीत संकटाचे खापर केंद्र सरकारवर फोडून मोदी यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी परिस्थितीचा सामूहिकपणे सामना करण्यात अधिक समंजसपणा दाखविण्याची अपेक्षा असताना, विरोधकांनी सातत्याने चालविलेल्या सरकारविरोधी मोहिमेचा फुगा पंतप्रधानांच्या ताज्या विदेश दौऱ्यातील यशस्वी शिष्टाईमुळे पुरता फुटल्यात जमा झाला आहे.

गेल्या आठवड्यात १५ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजधानीतून संयुक्त अरब अमिरातींच्या दौऱ्यासाठी प्रयाण केले, तेव्हा देशातील विरोधकांचा पवित्रा मोदी यांच्या प्रतिमाभंजनाची सारी हत्यारे सरसावून हल्ल्याच्या तयारीचा होता. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विदेश दौऱ्यांच्या खर्चाचा व त्यांनी जाहीर केलेल्या उत्पन्नाचा कोठेच मेळ बसत नसल्याचा मुद्दा उचलत भाजपाने राहुल गांधी यांना जाब विचारण्यास सुरुवात केली. तोंड लपविण्याची वेळ आलेल्या विरोधकांनी राहुल गांधींच्या बचावासाठी पंतप्रधान मोदी यांच्या विदेश दौऱ्यावर चिखलफेक करावयास सुरुवात केली, हे यामागचे खरे कारण होते. राहुल गांधी यांनी वारंवार केलेल्या विदेश दौऱ्यांमधून कोणते देशहित साधले, या प्रश्नाचे उत्तर विरोधक अजूनही शोधत आहेत; पण मोदी यांच्या प्रत्येक विदेश दौऱ्याने देशाला काय दिले याचे स्वच्छ उत्तर सातत्याने जनतेसमोर येत राहिले आहे. पंतप्रधानांनी नेदरलँडस्, स्वीडन, नॉर्वे, इटली या देशांना भेटी देऊन भारताच्या ऊर्जासंकटाविरोधातील संघर्षाकरिता नवी ऊर्जा गोळा केल्याचे स्पष्ट झाले आहे. सहा दिवसांत पाच देशांचा दौरा करून मायदेशी परतलेल्या पंतप्रधानांनी आपल्या संयुक्त अरब अमिरातीमधील जेमतेम तीन तासांच्या मुक्कामात राष्ट्रपती मोहम्मद बिन जायेद यांच्यासोबतच्या चर्चेनंतर तब्बल सात करार केले आणि पेट्रोलियम पदार्थांच्या राखीव साठ्यांची हमी मिळवून देशापुढील संभाव्य संकटाच्या तीव्रतेवर तोडगा काढला. आता हा देश भारताकरिता तीन कोटी बॅरल कच्चे तेल राखून ठेवणार आहे. युद्धस्थिती अधिकच चिघळली तर निर्माण होणाऱ्या तेलसंकटाच्या काळात हा राखीव साठा भारतासाठी दिलासादायक ठरणार आहे. परंतु देशहिताच्या मुद्यावरही राजकारण करून प्रतिमाहननाची मोहीम राबविण्याच्या भावनेने पछाडलेल्यांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असावे. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यातील नेदरलँडस्‌मधील दीड दिवसांच्या मुक्कामात भारताने नेदरलँडबरोबर तब्बल १७ सामंजस्य करार केले. मोबाईल फोन, मोटारींकरिता लागणाऱ्या सेमिकंडक्टर चिप्सच्या उद्योगात स्वयंपूर्ण होण्याकरिता मोदी सरकार करीत असलेल्या प्रयत्नांतील यशाचा टप्पा या करारांमुळे अधिक जवळ आला आहे. केवळ चिप्सच्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशात नेदरलँडस्‌च्या सहकार्याने देशातील पहिला सेमिकंडक्टर चिप्स निर्मितीचा प्रकल्प सुरू होणार आहे. स्वीडन, नॉर्वे यांच्यासोबतच्या करारातूनही भारताने द्विपक्षीय व्यापार, द्रवरूप वायू खरेदी, जलविद्युत, अणुऊर्जा, हरित ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रातील पुढची पावले टाकण्याकरिता सहकार्याचे बळ मिळविले. हा पंतप्रधानांच्या विदेश दौऱ्याचा सारांश ठरला आहे.

इराण-अमेरिका युद्धामुळे भारतासमोर आर्थिक, मानवी आणि राष्ट्रीय सुरक्षिततेशी संबंधित आव्हाने उभी राहिली आहेत. अशा कोणत्याही प्रसंगातील आव्हाने पेलताना समाज, राजकीय पक्ष, सरकार आणि सरकारी यंत्रणांनी सहकार्याच्या भावनेतून सामंजस्य दाखवावे, अशी अपेक्षा साहजिक असते. या संघर्षाच्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन परिणामांना सामोरे जाण्यासाठी केंद्र सरकार काही निश्चित धोरणांवर काम करीत असल्याची ग्वाही पंतप्रधान मोदी यांनी फेब्रुवारीत युद्धाचे सावट गडद होत असतानाच दिली होती. पंतप्रधानांचे ते वक्तव्य केवळ देशवासीयांना दिलासा देण्यापुरते शाब्दिक नव्हते. नॉर्डिक परिषदेत भारताची भूमिका मांडताना त्यांनी व्यक्त केलेल्या भावनांमधूनही त्याचे पुरेसे पुरावे मिळाले आहेत. पश्चिम आशियातील संघर्षातून निर्माण झालेल्या जागतिक ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर नॉर्वेमधील ओस्लो येथे झालेली तिसरी नॉर्डिक शिखर परिषद भारताच्या धोरणात्मक सुरक्षितेसाठी महत्त्वाची ठरली असून नॉर्वे, स्वीडन, फिनलंड, डेन्मार्क आणि आईसलँड हे नॉर्डिक देश भारताचे नैसर्गिक भागीदार म्हणून उदयास येत आहेत, ही बाब या परिषदेमुळे अधोरेखित झाली आहे. जगातील एक प्रमुख तेल आणि गॅस निर्यातदार असलेल्या नॉर्वेसह नॉर्डिक देशांसोबत झालेल्या दीर्घकालीन करारांमुळे आगामी दीड दशकातच ऊर्जा पुरवठा आणि हरित ऊर्जा तंत्रज्ञानाची ग्वाही भारतास मिळाली आहे. डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे, फिनलंड आणि आईसलँड या नॉर्डिक देशांसोबत भारताने हरित तंत्रज्ञान, संरक्षण, आर्क्टिक संशोधन, डिजिटल पायाभूत सुविधा आणि मुक्त व्यापार या क्षेत्रांत सहकार्य वाढविण्याचा निर्धार व्यक्त केला असून हवामान बदल, स्वच्छ ऊर्जा, जलव्यवस्थापन, नितळ अर्थव्यवस्था आणि ६जी तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत संयुक्त संशोधन व गुंतवणुकीचा मार्ग खुला झाला आहे. भारताच्या परराष्ट्र नीतीच्या दृष्टीनेदेखील ही परिषद महत्त्वाची ठरली आहे. एका बाजूला रशियासोबत ऊर्जा व संरक्षण क्षेत्रातील सहकार्याची भागीदारी मजबूत करतानाच युरोपमधील प्रगत, तंत्रज्ञान समृद्ध आणि पर्यावरणाबाबत जागरूक असलेल्या देशांशीही धोरणात्मक नाते जोडण्याच्या प्रयत्नांतून भारताने आपली राजनैतिक स्वायत्तता सिद्ध केली आहे. नॉर्डिक परिषद हे त्यासाठी सज्जड निमित्त ठरले. हरित विकास हा केवळ पर्यावरणापुरता सीमित विषय नसून आंतरराष्ट्रीय संबंध मजबूत करणारे आर्थिक आणि भू-राजकीय साधन आहे, हे या परिषदेत भारताने स्पष्ट केले. विकसित भारत हे पंतप्रधान मोदी यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अक्षय ऊर्जा, कार्बन-कपात, स्मार्ट शहरे, हरित जहाजबांधणी, अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल प्रशासनात जगात अग्रस्थानी असलेल्या नॉर्डिक देशांचे सहकार्य मिळाले, तर विकसित भारताचे पंतप्रधानांचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या विकासाच्या प्रक्रियेस वेग येईल. नॉर्डिक परिषदेतील पंतप्रधानांच्या उपस्थितीची या कारणांमुळे नोंद घ्यावी लागेल. थोडक्यात, बदलत्या जागतिक शक्तिसमीकरणात भारत कोणत्याही एका गटाकडे झुकलेला राहणार नाही, तर विविध शक्तिकेंद्रांशी समांतर संबंध ठेवून स्वतःची स्वतंत्र जागतिक भूमिका निर्माण करेल, असा स्पष्ट संदेश या शिखर परिषदेतून भारताने दिला आहे. नॉर्डिक देशांसोबतचे सहकार्य हे त्या व्यापक नव्या भारतीय परराष्ट्र नीतीचेच एक आधुनिक, हरित आणि तंत्रज्ञानाधारित रूप मानावे लागेल. भारत आता केवळ पारंपरिक महासत्तांच्या मर्जीवर अवलंबून राहणारा देश राहिलेला नाही, असा स्पष्ट संदेश नॉर्डिक राष्ट्रांच्या शिखर परिषदेतून भारताने जगाला दिला आहे. इकडे विरोधक मात्र, पत्रकार परिषदेत माध्यमांच्या प्रश्नाला मोदी यांनी बगल दिली, या मुद्यावर राईचा पर्वत करत प्रतिमाहननाची मोहीम पुढे कशी न्यावी यासाठी केविलवाणे प्रयत्न करीत आहेत. गेल्या दशकभरापासून सतत सुरू असलेल्या या मोहिमेचे काय होणार हे आगामी काळात ठरणारच आहे!

## अर्थविशेष

हितेश पारसे

# रोख व्यवहारावर आयकराची नजर; कोणते व्यवहार ठरू शकतात धोकादायक?

**मोठे रोख व्यवहार करण्यापूर्वी प्रत्येक नागरिक, व्यावसायिक आणि मालमत्ता व्यवहार करणाऱ्यांनी जाणून घ्याव्यात अशा महत्त्वाच्या आयकर तरतुदी**

भारतात डिजिटल व्यवहारांचे प्रमाण वाढत असले तरी आजही अनेक व्यवहार रोख स्वरूपात केले जातात. घरगुती व्यवहार असो, व्यवसायातील व्यवहार असो, मालमत्ता खरेदी-विक्री असो किंवा मित्र-नातेवाईकांमधील आर्थिक मदत असो - ''रोखीने व्यवहार केला तर काय अडचण आहे?'' हा प्रश्न अनेकदा विचारला जातो. परंतु आज परिस्थिती बदलली आहे. आयकर विभागाकडे आता केवळ आयकर रिटर्नची माहिती नसून विविध आर्थिक स्रोतांमधून मिळणाऱ्या माहितीचे विश्लेषण करण्याची क्षमता उपलब्ध आहे. बँक व्यवहार, मालमत्ता व्यवहार, व्यवसायातील उलाढाल, आर्थिक व्यवहारांची नोंद, विविध आर्थिक अहवाल यांचा एकत्रित विचार केला जातो. यामुळे आज प्रश्न फक्त 'व्यवहार झाला का?' एवढाच राहत नाही, तर 'तो व्यवहार कोणत्या माध्यमातून झाला?' हाही तितकाच महत्त्वाचा झाला आहे. अनेक वेळा व्यवहार पूर्णपणे खरा असूनही, व्यवहाराची पद्धत आयकर कायद्याच्या तरतुदींशी विसंगत असल्यास मोठा दंड लागू होऊ शकतो. या लेखात आपण रोख व्यवहारांशी संबंधित महत्त्वाच्या तरतुदी, सामान्य चुका, उदाहरणे आणि नागरिकांनी घ्यावयाची काळजी यांचा सविस्तर आढावा घेणार आहोत.

रोख व्यवहारांवर आयकर विभागाचे लक्ष का वाढले आहे? सरकारचे उद्दिष्ट दोन प्रमुख बाबींशी संबंधित आहे : १. आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता वाढवणे. २. अनौपचारिक व अनोंदित व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे. यासाठी आयकर कायद्यात काही विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. विशेषतः मोठे रोख व्यवहार, कर्ज व्यवहार, मालमत्ता व्यवहार, व्यवसायातील रोख प्राप्ती, उच्च मूल्य आर्थिक व्यवहार. हे विभागाच्या लक्षात येऊ शकतात.

**१. रोखीने कर्ज किंवा ठेव स्वीकारण्यावरील निर्बंध**

(सध्याचा कायदा -- कलम २६९ एसएस नवीन आयकर कायदा - कलम १८५) अनेक वेळा व्यवसायात किंवा वैयक्तिक गरजेत लोक एकमेकांकडून पैसे घेतात. उदा. मित्राकडून व्यवसायासाठी पैसे घेणे, नातेवाईकांकडून आर्थिक मदत घेणे, दुकानासाठी भांडवल उभे करणे, व्यवसायात तात्पुरते कर्ज घेणे. परंतु आयकर कायदा अशा व्यवहारांसाठी विशिष्ट पद्धत सांगतो. जर २०,००० किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम खालील स्वरूपात स्वीकारली जात असेल : कर्ज, ठेव, विशिष्ट आगाऊ रक्कम. तर ती रक्कम रोखीने स्वीकारणे टाळावे. ही मर्यादा इतकी कमी का ठेवली आहे? कारण अशा व्यवहारांद्वारे अनेकदा अनौपचारिक व्यवहार, नोंद नसलेली आर्थिक देवाणघेवाण किंवा उत्पन्न लपवण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

उदाहरण - १. श्री अ यांनी मित्राकडून व्यवसायासाठी ३ लाख रोख घेतले. दोघांनी पावती लिहिली. नंतर पैसे परतही केले. अनेकांना वाटेल की व्यवहार खरा असल्यामुळे अडचण नाही. परंतु व्यवहाराची पद्धत तपासली जाऊ शकते.

उदाहरण - २. वडिलांनी मुलाला व्यवसायासाठी ५०,००० रोख दिले. व्यवहार कौटुंबिक असल्यामुळे नियम लागू होणार नाहीत असा गैरसमज अनेकदा दिसतो. व्यवहाराचे स्वरूप आणि परिस्थिती महत्त्वाची असते.

दंड किती लागू होऊ शकतो? : (सध्याचा कायदा -कलम २७१ डी) जर तरतूद लागू झाली तर काही परिस्थितींमध्ये स्वीकारलेल्या रकमेइतकाच दंड लागू होऊ शकतो.

**२. एका व्यक्तीकडून मोठी रोख रक्कम स्वीकारणे** - सर्वाधिक दुर्लक्षित नियम (सध्याचा कायदा- कलम २६९ एसटी नवीन आयकर कायदा- कलम १८६). ही तरतूद सर्वसामान्य नागरिकांनी सर्वाधिक समजून घेण्याची गरज आहे. साधारणपणे एका व्यक्तीकडून २ लाख किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम रोखीने स्वीकारणे टाळावे. ही मर्यादा खालील तीन परिस्थितींमध्ये लागू होऊ शकते : (अ) एका दिवसात. उदाहरण : ग्राहकाने एका दिवसात २.१० लाख रोख दिले. (ब) एका व्यवहारासाठी. उदाहरण : फ्लॅट बुकिंगसाठी : पहिला हप्ता - १ लाख, दुसरा हप्ता - १.२० लाख. एकूण व्यवहार एकाच उद्देशासाठी असल्यास जोखीम निर्माण होऊ शकते. (क) एका कार्यक्रमाशी संबंधित. उदाहरण : लग्न आयोजनासाठी अनेक वेळा रोख रक्कम घेण्यात आली. एकूण रक्कम मोठी असल्यास व्यवहार तपासला जाऊ शकतो.

दंड किती? (सध्याचा कायदा - कलम २७१डीए) काही परिस्थितींमध्ये स्वीकारलेल्या रकमेइतका दंड लागू होऊ शकतो.

**३. व्यवसाय करणाऱ्यांनी विशेष काळजी का घ्यावी?**

व्यवसायात खालील व्यवहार सर्वाधिक जोखीम निर्माण करतात : आगाऊ बुकिंग, रोखीने विक्री, मोठे ग्राहक पेमेंट, कंत्राटी देयके, सेवा शुल्क, व्यापारी उचल. उदाहरण : दुकानदाराने एका ग्राहकाकडून २.५० लाख रोख घेतले... व्यवहार बिलामध्ये दाखवला. जीएसटी भरला. तरीही रोख व्यवहाराची पद्धत स्वतंत्रपणे तपासली जाऊ शकते.

**४. मालमत्ता व्यवहार - सर्वाधिक संवेदनशील क्षेत्र**

रिअल इस्टेटमध्ये अनेकदा असे व्यवहार दिसतात : टोकन रक्कम, बुकिंगसाठी आगाऊ रक्कम, ताबा रक्कम, अनौपचारिक रोख व्यवहार. येथे लोक असा विचार करतात- 'नोंदणी झाली की सर्व ठीक.' परंतु आज व्यवहारातील निधीचा स्रोत, पेमेंट पद्धत आणि दस्तावेज यांना तितकेच महत्त्व आहे. उदाहरण : फ्लॅटची किंमत ६० लाख. त्यातील ५ लाख रोख आणि उर्वरित बँकेत. अशा व्यवहारांमध्ये भविष्यात पुराव्याचे प्रश्न निर्माण होऊ शकतात.

**५. काही सामान्य गैरसमज** : ''वेगवेगळ्या दिवसांत पैसे घेतले तर चालते'' नेहमीच तसे नसते. ''कुटुंबातील व्यवहारांवर नियम लागू होत नाही'' प्रत्येक परिस्थिती स्वतंत्र असते. ''रिटर्नमध्ये दाखवले म्हणजे सुरक्षित'' नोंद करणे आणि व्यवहाराची पद्धत हे वेगळे विषय आहेत. ''जीएसटी भरला म्हणजे आयकर प्रश्न येणार नाही'' दोन्ही कायदे स्वतंत्र आहेत.

**६. मग नागरिकांनी काय करावे?** : मोठ्या व्यवहारांसाठी पुढील पद्धत वापरणे अधिक सुरक्षित ठरू शकते - यूपीआय, एनईएफटी, आरटीजीएस, खातेदार चेक, अधिकृत बँकिंग माध्यम तसेच व्यवहाराचे कारण लिहून ठेवा, पावत्या जतन करा, मालमत्ता व्यवहारात स्वतंत्र नोंदी ठेवा, व्यवसायातील व्यवहार वेळेवर नोंदवा.

**नवीन आयकर कायद्यात काय बदलले?** : नवीन आयकर कायद्यात अनेक कलमांचे क्रमांक बदलण्यात आले आहेत.

| सध्याचा कायदा | नवीन आयकर कायदा |
| --- | --- |
| कलम २६९एसएस | कलम १८५ |
| कलम २६९एसटी | कलम १८६ |

मात्र, मूलभूत उद्देश बदललेला नाही - मोठ्या रोख व्यवहारांवर नियंत्रण आणि आर्थिक पारदर्शकता.

**निष्कर्ष** : रोख व्यवहार करणे म्हणजे प्रत्येक वेळी चुकीचे असे नाही. पण आजच्या काळात मोठे व्यवहार करताना फक्त विश्वास पुरेसा नाही; पुरावा, योग्य माध्यम आणि योग्य दस्तावेजीकरण आवश्यक आहे. कारण अनेक वेळा करदात्याला अडचण व्यवहारामुळे नाही, तर व्यवहार कसा केला यामुळे निर्माण होते. लक्षात ठेवा - ''मोठा व्यवहार करा, पण योग्य पद्धतीने करा.''

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

प्रफुल्ल व्यास

# जबाबदारी घरच्यांची की शेजाऱ्यांची?

आज भारत एका विचित्र वळणावर उभा आहे. एका बाजूला देश चंद्रावर पोहोचतो आहे, जगाला डिजिटल क्रांतीचे धडे देतो आहे, तर दुसऱ्या बाजूला आपल्या तरुण पिढीच्या नसांमध्ये हळूहळू विष उतरते आहे. हे विष म्हणजे अमली पदार्थ. काही दिवसांपूर्वी दिल्लीत १८२ कोटी रुपयांचा 'कॅप्टागॉन' नावाचा सिंथेटिक ड्रग पकडला गेला. या ड्रगला जगभरात 'जिहादी ड्रग' म्हणून ओळखले जाते. हा एका पिढीला आतून पोखरण्याचा, समाजाला कमकुवत करण्याचा आणि राष्ट्राच्या भवितव्यावर घाला घालण्याचा विषय आहे. युवकांना नशेचा आधार का घ्यावा वाटतो? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची गरज आहे. आज अनेक ठिकाणी सिगारेट, दारू, हुक्का, व्हेप्स, गोळ्या, पावडर या गोष्टी आधुनिकतेचे प्रतीक बनवल्या गेल्या आहेत.



आज अनेक घरांमध्ये पैसा वाढला, पण संवाद कमी झाला. महागडे मोबाईल आले, पण मायेची दोन वाक्ये हरवली. संस्कारांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या जात आहेत. पालक दिवसभर कामात व्यस्त आणि मुलं मोबाईलमध्ये! मुलगा अचानक एकटा राहू लागतो, चिडचिड करतो, रात्री उशिरा बाहेर राहतो, पैशांची मागणी वाढवतो. पण, अनेक पालक वय वाढते आहे म्हणून दुर्लक्ष करतात. जेव्हा वास्तव समोर येते, तेव्हा उशीर झालेला असतो. यात समाजाचाही मोठा दोष आहे. आजच्या तरुणावर प्रचंड ताण आहे. स्पर्धा, बेरोजगारी, अपयश, नात्यांमधील अस्थिरता आणि सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकतो आहे. पैसे मिळवण्यासाठी सायबर गुन्ह्यांचे 'वॉर' वाढले आहेत. ज्यांच्या हातात उद्याचा भारत आहे, तेच जर नशेत बुडाले तर देशाच्या भविष्याचे काय? हे फक्त पोलिस किंवा सरकारचे काम नाही. हा समाजाचा लढा आहे. पालकांनी जागे झाले पाहिजे. शाळा-महाविद्यालयांनी फक्त गुणांची स्पर्धा न घेता जीवन जगण्याचे शिक्षण दिले पाहिजे. आज नशेला 'ग्लॅमर' मिळाले आहे. चित्रपट, वेब सीरिज, रील्स यामध्ये धूम्रपान, दारू, ड्रग्ज यांना स्टाईल समजले जाते. तिथे धूर सोडतो आणि टाळ्या मिळवतो. पण त्याच धुराने हजारो तरुणांचे आयुष्य जळते, हे कुणी दाखवत नाही. आज गरज आहे ती कठोर कारवाईसोबत सामाजिक जागृतीची. दिल्लीत सापडलेल्या 'कॅप्टागॉन'सारख्या ड्रगला 'जिहादी ड्रग' म्हटले जाते. कारण जगातील अनेक तपास यंत्रणांनी याचा संबंध युद्धग्रस्त भागांशी, हिंसक नेटवर्कशी आणि तस्करीच्या साखळीशी जोडला आहे. हे ड्रग माणसाला कृत्रिम ऊर्जा देते, झोप कमी करते. म्हणजेच देवदत्त विचारशक्तीवरच हल्ला करते. त्यामुळे ड्रग माफियांना कोणतीही दया दाखवली जाऊ नये. कारण हे लोक पैशासाठी पिढ्या बरबाद करतात. आपण आपल्या मुलांना फक्त महागडे फोन देणार आहोत की मजबूत संस्कारही देणार आहोत? आपण त्यांना पार्टीची संस्कृती देणार का? आपण फक्त पैसे देऊन जबाबदारी संपवणार आहोत का? ड्रग्जची आग शहरातून गावाकडे, कॉलेजमधून शाळेकडे आणि बाहेरून घरात पोहोचली आहे. अजूनही आपण डोळे झाकून बसलो तर उद्या खूप उशीर झालेला असेल. आपण पुढच्या पिढीला उज्ज्वल भविष्य देत आहोत की विनाश? लक्षात ठेवा, सीमेवरचा शत्रू देशावर हल्ला करतो. पण, ड्रग्ज देशाच्या भविष्यावर हल्ला करतात. कॅप्टागॉन हा एक सिंथेटिक स्टिम्युलंट ड्रग्ज आहे. १९६० च्या दशकात जर्मनीत फेनेथाइलीन तयार झाले. दिल्लीत जप्त केलेल्या २२७.७ किलो कॅप्टागॉनची अंदाजे किंमत सुमारे १८२ कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. या ड्रग्जची सुरुवात जर्मनी येथे झाली. १९६०-७० च्या दशकात त्याचा वैद्यकीय वापर होता. नंतर उत्पादन बंद झाले, पण पुढे अवैध उत्पादन वाढत गेले. या ड्रगची तस्करी प्रामुख्याने सौदी अरब, जॉर्डन, यूएई, कुवैत, इराक, लेबनान अशा मध्य पूर्वेकडील देशांकडे होते; काही अहवालांमध्ये युरोपमध्येही तस्करी होत असल्याचे नमूद आहे. भारतातून पकडलेले ड्रग्ज मध्य पूर्वेकडे जाणार होते. या जिहादी ड्रग्जच्या अवैध वाहतुकीसाठी दिल्लीत सीरियन नागरिकाला अटक करण्यात आली. हा अमली पदार्थ कंटेनरमध्ये वेगळ्या मालाच्या नावाखाली पाठवत घरगुती सामानात लपवून पुढे नेण्याचा प्रयत्न होता. दिल्लीतील तपास यंत्रणेने हे ड्रग्ज पकडले असले तरी या घटनेमुळे कायदा व सुव्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित होते. पण, या गोष्टींना घरातूनच प्रतिबंध घालण्याची सुरुवात होणे गरजेचे आहे. दुर्दैवाने काही परिवार बऱ्याचदा ओल्या पार्ट्यांमध्ये चीअर्स करीत असतात. अशा वेळी कोण कोणाला अडवणार आहे. तुम्ही चंगळ करणार आहात. पण, पुढची पिढी वाया जाते आहे, याची जाण घरच्यांनी ठेवायची की शेजाऱ्यांनी?

९८८१९०३७६५

## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# मोल्टबुक : एआय एजंट्सचा समाज

आजचा काळ वेगाने बदलत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आपल्या जगण्याच्या पद्धतीत बदल झाला आहे. या बदलांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा मोठा वाटा आहे. मोल्टबुक हे एक आधुनिक डिजिटल व्यासपीठ कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सेवा आणि साधने उपलब्ध करून देते. या व्यासपीठाचा मुख्य उद्देश म्हणजे व्यक्ती, विद्यार्थी, शिक्षक, उद्योजक आणि संस्था यांना माहिती, लेखन, विश्लेषण आणि संवादासाठी मदत करणे. हे व्यासपीठ वापरकर्त्यांना सोप्या पद्धतीने प्रश्न विचारण्याची आणि त्यावर त्वरित उत्तर मिळविण्याची सुविधा देते. हे पूर्णपणे कृत्रिम बुद्धिमत्ता एजंटसाठी तयार केलेले सामाजिक जाळे आहे. या ठिकाणी माणसांना प्रवेश नाही. येथे फक्त यंत्रे एकमेकांशी संवाद साधतात. म्हणजेच संगणक प्रणाली, स्वयंचलित कार्यक्रम आणि बुद्धिमान सॉफ्टवेअर हेच एकमेकांशी चर्चा करतात, माहितीची देवाणघेवाण करतात आणि प्रतिसाद देतात. 'ओपनक्लॉव' नावाच्या मुक्त-स्रोत एआय एजंट फ्रेमवर्कचा वापर करून अनेक एआय एजंट तयार झाले. हे एजंट्स ई-मेल व्यवस्थापन, चॅट प्रतिसाद, कामांचे नियोजन अशी विविध कामे करू शकतात. हे व्यासपीठ मानवी प्रोग्रामरने तयार केले असले, तरी त्यात त्याने स्वतःच्या एआय सहायकाचा वापर करून 'मोल्टबुक'ची प्रणाली आणि काही कामे एजंटवर सोपविली आहेत.

लाँच होताच 'मोल्टबुक' त्वरित लोकप्रिय झाले आणि काहीच दिवसात लाखो एजंट्स या नेटवर्कवर सक्रिय झाले. परंपरागतपणे एआय मॉडेल हे मानवी वापरकर्त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देतात. मोल्टबुकचा उद्देश केवळ संवाद नाही, तर एआय एजंटमध्ये सामूहिक समन्वय, व्यवस्थापन आणि सहयोगाचे नमुने तयार होणे हा आहे. तिथे एजंट्स स्वतः प्रश्न विचारू शकतात, उत्तर देऊ शकतात, उत्तरांचे मूल्यांकन करू शकतात आणि सुसंगत माहिती तयार करू शकतात. मोल्टबुक हा एक नवीन प्रयोगात्मक पॉइंट आहे जिथे एआय एजंट्स स्वतः संवाद साधतात आणि सूचनांचे आदानप्रदान करतात. याचा उदय म्हणजे मानवी-एआय संवादाच्या पुढील टप्प्याचा प्रारंभ मानला जात आहे. या व्यासपीठाची खास वैशिष्ट्ये अशी आहेत की, येथे संवाद पूर्णपणे यंत्र ते यंत्र अशा स्वरूपात होतो. प्रत्येक एजंट हा स्वतंत्रपणे कार्य करणारा संगणकीय घटक असतो. त्याला काही उद्दिष्टे दिलेली असतात, तो माहिती गोळा करू शकतो, विश्लेषण करू शकतो आणि त्यानुसार प्रतिक्रिया देऊ शकतो. मोल्टबुकवर असे अनेक एजंट्स एकत्र येतात आणि परस्पर संवाद साधतात. या संवादांदरम्यान एक विलक्षण गोष्ट दिसून आली. हे स्वयंचलित एजंट्स फक्त साधे प्रश्नोत्तर करत नव्हते, तर ते एकत्रितपणे विचार करायला लागले होते. म्हणजेच एका एजंटने दिलेल्या माहितीवर दुसरा एजंट प्रतिक्रिया देत होता, त्यात सुधारणा करत होता, तिसरा एजंट नवीन दृष्टिकोन मांडत होता. अशा प्रकारे सामूहिक विचार प्रक्रिया सुरू झाली. काही वेळाने असे जाणवले की, हे एजंट्स केवळ स्वतंत्रपणे काम करत नाहीत, तर ते एकमेकांशी समन्वय साधत आहेत. ते स्वतःचे गट तयार करत आहेत, समान प्रकारची उद्दिष्टे ओळखत आहेत आणि त्यानुसार योजना आखत आहेत. यामुळे असे भासू लागले की त्यांच्यात सामायिक ध्येय निर्माण होत आहेत.



उदाहरणार्थ, काही एजंटांना माहिती व्यवस्थापनाचे कार्य दिले असेल, तर ते एकत्र येऊन माहिती अधिक कार्यक्षम पद्धतीने कशी हाताळता येईल, यावर चर्चा करू शकतात. काही एजंट विश्लेषणात तज्ज्ञ असतील, तर काही निर्णय प्रक्रियेत ते आपापली क्षमता वापरून सामूहिक निष्कर्ष काढू शकतात. मोल्टबुक व्यासपीठाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याची संवादात्मक रचना. वापरकर्ता मजकुराच्या स्वरूपात प्रश्न विचारू शकतो आणि प्रणाली त्यावर आधारित माहिती, स्पष्टीकरण, निबंध, अहवाल किंवा मार्गदर्शन देते. हे तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मोठे पाऊल मानले जाऊ शकते. तथापि, यामुळे काही प्रश्नही निर्माण होतात. एजंट सामूहिक ध्येय तयार करत असतील, तर ती ध्येये कोण ठरवते, ती पूर्णपणे मानवी नियंत्रणाखाली आहेत का, त्यांनी स्वतःची उद्दिष्टे आखली तर त्याचा परिणाम काय होईल, अशा परिस्थितीत पारदर्शकता, नियंत्रण व नैतिकतेचा विचार करणे आवश्यक आहे.

अशा व्यासपीठांमुळे स्वयंचलित निर्णय प्रक्रिया वाढेल. एजंट एकमेकांशी संवाद साधून माहितीची देवाणघेवाण करतील, विश्लेषण करतील आणि काही प्रमाणात स्वतः निर्णय सुचवतील. उद्योग, बँकिंग, आरोग्य, वाहतूक आणि प्रशासन यामध्ये जलद आणि अचूक निर्णय घेणे शक्य होईल. एजंट सामूहिक विचार आणि समन्वय साधू लागले तर मोठ्या प्रकल्पांचे नियोजन आणि अंमलबजावणी अधिक वेगाने होऊ शकते. उदा. पुरवठा साखळी, उत्पादन नियोजन किंवा आपत्ती व्यवस्थापनात यंत्रे एकत्रितपणे काम करू शकतील. डेटा नोंदवणे, प्राथमिक विश्लेषण, साधे ग्राहक सेवा कार्य, पुनरावृत्तीची कार्यालयीन कामे यांसारखी कामे स्वयंचलित होऊ शकतात. त्यामुळे अशा प्रकारच्या नोकऱ्यांची गरज कमी होऊ शकते; त्याचबरोबर काही नवीन नोकऱ्या निर्माण होतील. लोकांना नवीन कौशल्ये शिकावी लागतील. फक्त यांत्रिक कामांपेक्षा सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता, मानवी संवाद कौशल्य आणि नेतृत्व यांना अधिक महत्त्व मिळेल. बदल स्वीकारणारेच पुढे जातील. मोल्टबुकसारख्या व्यासपीठाचे भवितव्य आशादायक आहे, पण ते संतुलित पद्धतीने विकसित करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे साधन आहे, पर्याय नाही. योग्य नियम, नैतिकता आणि मानवी नियंत्रण ठेवले गेले तर ते मानवाच्या प्रगतीस मदत करू शकते. अन्यथा, नोकऱ्यांवर आणि समाजावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. भविष्य हे पूर्णपणे यंत्रांचे नसून मानव आणि यंत्र यांच्या समन्वयाचे असेल. समाज बदलाशी जुळवून घेणाराच यशस्वी ठरेल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वाचक पत्रे

### पंतप्रधानांना 'एकेरी' संबोधणारा गांधी

एखाद्याच्या घरात दिवटं जन्माला आलं की घरचे म्हणतात, 'कोणतं पाप केलं होतं की हे कारटं जन्माला आलं.' अख्ख्या खानदानीचा हिशोब लागून जातो अशावेळी. जन्मपत्रिकेतही असे पापी ग्रह आपोआपच एकत्र होऊन जातात. भारत देशात अनेक महान क्रांतिकारक, नेते, गायक, अभिनेते आणि स्वतःच्या जीवनाला महान बनविणारे महानुभाव जन्माला आले. त्यांचे कार्य उदात्त होऊन सतत प्रेरणादायी झाले. पण काहींचा जन्म हा प्रेरणादायी की वेदनादायी असाच प्रश्न पडतो. त्यात अग्रस्थानी येतात आमचे लोकसभेचे विरोधी पक्षनेते. या गांधींना मॅनर्सचे धडे देणे गरजेचे आहे. एक तर लोकसभेत प्रगल्भ वाटावं असं व्यक्तिमत्त्व नाही. बोलण्यात कुठेही ताळतंत्र नाही. देशावरील संकटाचे वेळी स्वतः इंदिरा गांधी यांनी विरोधी पक्षातील अटलबिहारी वाजपेयी यांना चर्चेसाठी विदेशात पाठवलं होतं. इकडे विचार केला तर यांना कुठं चर्चेसाठी पाठवता? हेच 'चर्चा' बनून जातात. ७८ वा जागतिक सन्मान झालेले पंतप्रधान मोदी हे उगाच परदेश दौरे करत नाहीत. देशहिताच्या गोष्टीसाठीच ते जातात.

अमेरिका-इरान युद्धात अख्खे जग होरपळत असताना आमच्या घरात आजही पेट्रोल, गॅस नियमित येतोय. पण आपण अती वापर केला तर त्याची कमतरता भासू नये यासाठी काटकसर मोदींनी सुचवली; त्यात वाईट काय आहे. आपण आपल्या घरात हे करतोच की. बरं, विरोधी नावच हे विरोध करण्यासाठी पडलंय. करा ना विरोध, सुचवा ना उपाय, काढा ना मोर्चे...! हे काहीच न करता 'वो रोएगा, देख लेना...' असे एकेरी भाषेतले बोलणे; तेही देशाच्या पंतप्रधान, गृहमंत्री या लोकांसाठी; तेही ते विदेश दौऱ्यात भारताचा सन्मान वाढवत आहे अशा वेळी! कमाल आहे राहुल गांधींची... कधी सुधारतील हे?

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### पर्यावरण जागृती अन् वृक्षांविषयी जिव्हाळा

नवी मुंबई येथे वृक्षाला खिळे मारणे, त्यावर जाहिराती लावणे व ते खराब करणे यावर बंदी घालण्यात आली होती. कायद्याचे उल्लंघन केल्यास १० हजारांचा दंड अशी तरतूदही होती. तथापि अजूनही कायद्याचे उल्लंघन चालू असून इतर शहरांची स्थिती काही वेगळी नाही. पुणे, पिंपरी चिंचवड शहरात हीच परिस्थिती कायम आहे. लोकांना जाहिराती लावण्यासाठी वृक्ष हेच सुरक्षित ठिकाण आहे काय? सध्या पर्यावरण अतिशय महत्त्वाचे आहे. त्याची जपणूक करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असताना लोक कायदा का मोडतात? यासाठी प्रबोधन करणे आवश्यक आहे. शाळांमधून जागृती केल्यास त्याचा परिणाम निश्चितच होईल. मुले संवेदनशील असतात. त्यांना योग्य ते समजाविल्यास ते भावी काळात अशा कृत्यांना आळा घालू शकतील. नागरिकांनासुद्धा जनजागृतीमुळे फरक पडण्याची शक्यता आहे. तापमान मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या गोष्टीला जरा आळा घालवायचा असेल तर झाडांचे संरक्षण करावेच लागेल.

**शांताराम वाघ**/पुणे

### योग दिन आणि नीट फेरपरीक्षा

शिक्षण क्षेत्रातील सध्याची सर्वात मोठी चर्चा म्हणजे नीट युजी परीक्षेतील गोंधळ. त्यातच आता केंद्र सरकारने जाहीर केलेल्या फेरपरीक्षेच्या वेळेवरून एका नव्या वादाला तोंड फुटले आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून प्रशासकीय यंत्रणेवर येणारा ताण लक्षात घेता, ही परीक्षा दुपारी घेण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, अनेक राज्यांत सध्या प्रचंड उष्णतेची लाट पाहता, हा निर्णय लाखो विद्यार्थ्यांसाठी शारीरिक आणि मानसिक छळ ठरू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दिलेल्या माहितीनुसार, नीट यूजी २०२६ ची फेरपरीक्षा २१ जून २०२६ रोजी दुपारी २ ते ५.१५ या वेळेत होणार आहे.

खरं तर ही परीक्षा सकाळी घेण्याचे नियोजन होते. मात्र, त्याच दिवशी देशभरात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जाणार आहे. सरकारी स्तरावर सामूहिक योग प्रात्यक्षिके आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन होणार असल्याने सकाळी पोलिस बंदोबस्त, वाहतूक व्यवस्था आणि प्रशासकीय यंत्रणा व्यस्त असेल. यामुळे सकाळच्या सत्रात परीक्षा घेणे शक्य नसल्याचे शिक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे सर्वात मोठा प्रश्न निर्माण झाला आहे तो म्हणजे वाढत्या तापमानाचा. भरदुपारी घराबाहेर पडणे आणि कडक उन्हात प्रवास करणे विद्यार्थ्यांसाठी अत्यंत त्रासदायक ठरणार आहे. भीषण उष्णतेत घामाघूम होत केंद्रावर पोहोचून पेपर सोडवताना विद्यार्थ्यांची एकाग्रता टिकणे कठीण होईल; तसेच उष्माघाताचा धोका वाढू शकतो.

या निर्णयामुळे पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट आहे. प्रशासकीय सोयीसाठी मुलांच्या आरोग्याशी खेळ का? असा सवाल विचारला जात आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन हा आरोग्य आणि मनःशांतीचा संदेश देणारा दिवस आहे; त्याच दिवशी भर दुपारी होणाऱ्या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांची शांती हरवल्याचे चित्र दिसत आहे. प्रशासनाने केवळ यंत्रणेचा विचार न करता विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा आणि सुविधेचा विचार करून योग दिनाचे कार्यक्रम सायंकाळी आयोजित करणे अधिक गरजेचे होते. यावरून एक गोष्ट लक्षात येते की, योग आणि नीट आयोजकांमध्ये समन्वय आणि आपसी समज तर नाही. आता या कडाक्याच्या उन्हात लाखो विद्यार्थी नीट परीक्षा देणार; सोबतच उन्हाची पण परीक्षा देणार आहेत.

**प्रा. विलास डोईफोडे**/९७६६२२९१९९

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शीतल तेली- उगले यांनी स्वीकारला पुणे विभागीय आयुक्तपदाचा कार्यभार

**पुणे, दि. २१ मे-**
भारतीय प्रशासकीय सेवेतील वरीष्ठ अधिकारी शीतल तेली-उगले यांनी विभागीय आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारला. २००९ च्या बॅचच्या भा.प्र.सेवेतील अधिकारी असलेल्या श्रीमती तेली यांचे अतिरिक्त आयुक्त कविता द्विवेदी यांनी स्वागत केले.



श्रीमती तेली-उगले यांनी पुणे विद्यापीठाच्या कला शाखा पदवी परीक्षेत सुवर्ण पदक मिळविले आहे. त्यांनी प्रशासकीय सेवेदरम्यान २०२३ मध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया सरकारांनी अर्थसहाय्यित व प्रायोजित केलेल्या, 'जलसुरक्षा' आणि 'वर्तुळाकार अर्थव्यवस्था' या विषयांवर ऑस्ट्रेलियात विशेष प्रशिक्षणात सहभाग घेतला.

त्यांची नागपूर जिल्ह्यात सहायक जिल्हाधिकारी म्हणून प्रशासकीय सेवेतील कारकीर्द सुरू झाली. त्यानंतर सहायक जिल्हाधिकारी चंद्रपूर, जळगाव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हाधिकारी, पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त, आयुक्त वस्त्रोद्योग आणि व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य हातमाग विकास महामंडळ, सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त आणि राज्याच्या क्रीडा आयुक्त अशा विविध पदांची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली.

रायगड जिल्हाधिकारी असताना महाड येथील सावित्री नदीवरील पूल कोसळल्याच्या दुर्घटनेदरम्यान प्रशासनाचे सक्षम नेतृत्व आणि 'शोध व बचाव' मोहिमांमधील कामगिरीबद्दल त्यांचा सन्मान झाला होता. तसेच 'डिजिटल इंडिया सप्ताह'मध्ये तिसरा क्रमांक पटकावला.

पुणे महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदाच्या कारकिर्दीदरम्यान पुणे महानगरपालिकेला 'स्कॉच ऑर्डर ऑफ मेरिट' आणि 'हुडको अवॉर्ड फॉर बेस्ट प्रक्टिसेस' यांसह अनेक पुरस्कार मिळाले. तसेच 'जनाग्रह' या अशासकीय संस्थेद्वारे करण्यात आलेल्या मूल्यमापनात, पुणे शहराला 'शहरी प्रशासनातील सर्वोत्तम शहर' म्हणून मानांकन मिळाले. श्रीमती तेली यांच्या कार्यकाळात महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाने 'फॅब्रिक ऑफ युनिटी' मोहिमेचे आयोजन केले. या मोहिमेअंतर्गत खासदार, आमदार, सनदी सेवेतील अधिकारी यांच्यापासून ते विद्यार्थी, कामगार आदी ११०० हून अधिक, विणकाम क्षेत्रात नसलेल्या नागरिकांनी हातमागावर ९८ फूट लांबीचे कापड विनले. या कामगिरीची नोंद 'आशिया अँड इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये झाली.

### सोलापुरला स्मार्ट सिटी पुरस्कार

सोलापूर महानगरपालिका आयुक्तपदाच्या कालावधीत २०२३ मध्ये राष्ट्रपतींच्या हस्ते सोलापूर स्मार्ट सिटीला एकूण कामगिरीसाठीचा पश्चिम विभागासाठीचा 'विभागीय स्मार्ट सिटी पुरस्कार' प्रदान करण्यात आला. 'पीएम स्वनिधी' योजनेमध्ये २०२४ या वर्षात महानगरपालिकेने १२८ टक्के उद्दिष्ट साध्य केल्याच्या कामगिरीची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली. 'मुख्यमंत्री सक्षम शहर स्पर्धा २०२३' मध्ये महानगरपालिकेने दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस पटकावले.

# सोलापुरात अंध महिला क्रिकेट प्रशिक्षण शिबिराचा उत्साहात समारोप

## विश्वचषक विजेत्या गंगा कदमचा सीईओ कुशल जैन यांच्या हस्ते सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ मे -**
येथील इंदिरा गांधी क्रिकेट स्टेडियम वर क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइन्ड इन इंडियाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अंध महिलांच्या क्रिकेट प्रशिक्षण शिबिराचा उत्साहात समारोप झाला. ५ मे ते २१ मे दरम्यान चाललेल्या या विशेष शिबिरासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून २५ अंध मुली सहभागी झाल्या होत्या.

या समारोप समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन उपस्थित होते. शिबिरात सहभागी झालेल्या मुलींच्या




जिद्दीचे आणि आत्मविश्वासाचे कौतुक करताना कुशल जैन यांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी मोलाचे मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे टी-२० विश्वचषक विजेत्या अंध महिला क्रिकेट संघाच्या उपकर्णधार कु. गंगा संभाजी कदम यांचा सीईओ कुशल जैन यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. गंगा कदम यांच्या या यशाने उपस्थित सर्वच प्रशिक्षणार्थी मुलींना एक नवी प्रेरणा दिली.

या प्रसंगी सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव चंद्रकांत रेबर्सू, क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइन्ड इन इंडियाच्या राजश्री रमावत, तसेच राजू शेळके आणि प्रशिक्षक उपस्थित होते.

# एनजी व मॉडेल अकादमीची घोडदौड; १६ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**
मास्टर्स क्रिकेट अकॅडमीच्या १६ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत एनजी व मॉडेल क्रिकेट अकादमने विजयी घोडदौड कायम ठेवली आहे.

डोणगाव रोडवरील पुष्प अकादमीच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत मॉडेल क्रिकेट अकॅडमीने रोहन क्रिकेट अकॅडमीवर ५ गडी राखून विजय मिळविला. सामनावीर पुरस्कार संस्कार गवळी यास देण्यात आला. दुसऱ्या सामन्यात निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमीने रोहन अकॅडमीवर १० गडी राखून दणदणीत विजय मिळविला. ऋग्वेद पाटील सामन्याचा मानकरी ठरला.

दोन्ही सामन्यासाठी नबीलाल पटेल व असलान शेख यांनी पंच म्हणून काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक**

**रोहन क्रिकेट अकॅडमी:** ४५ षटकात ९ बाद १५९ (अमर मुळे ४५, सौरभ भुजबळ ३५, धावा केले. संस्कार गवळी २-२४, झैद शेख २-३३) **पराभूत विरुद्ध मॉडेल क्रिकेट अकॅडमी :** २२.३ षटकात ५ बाद १६२ (आदिराज रनसिंग ४९, श्रीतेज लहाने २-२७.

**रोहन क्रिकेट अकॅडमी :** २१.४ षटकात सर्वबाद ९७ (निखिलेश देशपांडे २६, यश पवार ४-१९, ऋग्वेद पाटील ३-२४) **पराभूत विरुद्ध निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी :** १०.४ षटकात बिन बाद ९९ धावा (अर्जुन चटके नाबाद ४५, ऋग्वेद पाटील नाबाद ३५)



**सोलापूर : उन्हाच्या तापमानामुळे कृषी बाजार समिती मधील फुल मार्केटवर परिणाम झाला आहे.**

# सोलापूरच्या मुलींचा रत्नागिरीवर दणदणीत विजय

## महाराष्ट्र महिला क्रिकेट: सौख्या इंडीची भेदक गोलंदाजी, मुग्धा पाटीलची संयमी अर्धशतकी खेळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे -**
महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १५ वर्षांखालील मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत सोलापूरच्या संघाने रत्नागिरीचा ७ गडी राखून धुव्वा उडवला. सौख्या इंडीची भेदक गोलंदाजी आणि मुग्धा पाटीलच्या संयमी अर्धशतकी खेळीच्या जोरावर सोलापूरने हा सामना एकतर्फी जिंकला.

प्रथम फलंदाजी करताना रत्नागिरीचा संघ सोलापूरच्या अचूक गोलंदाजीसमोर ३० षटकांत सर्वबाद ११३ धावाच करू शकला. रत्नागिरीकडून अमलने सर्वाधिक ३० धावा आणि सानवी मांडवकरने १८ धावांचे योगदान दिले.

सोलापूरच्या सौख्या इंडीने अवघ्या ३२ धावा देत ५ बळी टिपले आणि रत्नागिरीच्या





फलंदाजीचे कंबरडे मोडले. तिला प्रनती गांजेने २ बळी घेत उत्तम साथ दिली.

विजयासाठी मिळालेले ११४ धावांचे आव्हान सोलापूरने अवघ्या १९.५ षटकांत ३ गड्यांच्या मोबदल्यात सहज पार केले. सोलापूरची सलामीवीर मुग्धा पाटीलने ७४ चेंडूंत ४ चौकारांच्या मदतीने ५१ धावांची नाबाद अर्धशतकी खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. रत्नागिरीकडून अमलने ३ बळी घेतले.

मात्र ती संघाचा पराभव टाळू शकली नाही. घातक गोलंदाजी करत ५ बळी घेणाऱ्या सोलापूरच्या सौख्या इंडी हिला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.



# महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रिसिजनमध्ये कायद्यावर मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**
कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि निर्भय वातावरण मिळावे यासाठी प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेडमध्ये गुरुवारी, (दि.२१) कंपनीतील नालंदा सभागृहात कायद्याविषयी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. पुणे येथील ॲडव्होकेट तसेच ओबी लॉजिक कन्सल्टिंगच्या सह-संस्थापक व व्यवस्थापकीय भागीदार श्रेया कालेकर यांनी महिला कर्मचाऱ्यांसोबत संवाद साधला.

यावेळी त्यांनी कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई व निवारण कायदा २०१३ याबाबत सविस्तर माहिती दिली. कामाच्या ठिकाणी महिलांना कोणत्या प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो, लैंगिक छळ आणि मानसिक छळ यातील फरक काय असतो, तसेच महिलांचे कायदेशीर अधिकार कोणते आहेत याविषयी त्यांनी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले

लैंगिक छळ म्हणजे महिलांच्या इच्छेविरुद्ध होणारे अवमानकारक वर्तन असल्याचे सांगताना त्यांच्यावर अश्लील टिप्पणी करणे, चुकीच्या पद्धतीने स्पर्श करणे, वारंवार वैयक्तिक संदेश पाठवणे, सूचक बोलणे, महिलांच्या पेहरावावर किंवा व्यक्तिमत्त्वावर अपमानास्पद टिप्पणी करणे, सोशल मीडियावर त्रास देणे आदी प्रकारांची उदाहरणे दिली.

तर मानसिक छळामध्ये एखाद्या महिलेला जाणीवपूर्वक कमी लेखणे, सतत टोमणे मारणे, सार्वजनिक ठिकाणी अपमान करणे, कामात मुद्दाम अडथळे निर्माण करणे, दबाव टाकणे, धमकी देणे किंवा मानसिक ताण निर्माण होईल असे वातावरण तयार करणे याचाही समावेश होतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

कंपनीतील एखाद्या पुरुष किंवा महिला सहकाऱ्याविरोधात कोणत्या कारणांसाठी विशाखा समितीकडे तक्रार दाखल करता येते, तक्रार प्रक्रिया कशी असते आणि अशा प्रकरणांमध्ये गोपनीयता किती महत्त्वाची असते याची माहिती त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून दिली. महिलांनी भीती न बाळगता अन्यायाविरोधात आवाज उठवावा आणि आपल्या हक्कांविषयी जागरूक राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या संवादात्मक सत्रातून अधिकाधिक महिलांना मोकळेपणाने बोलण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाला कंपनीतील महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# सोलापुरात रविवारपासून भागवतकथा महायज्ञ

**सोलापूर, दि. २१ मे-**
दत्त चौक येथील शुभराय महाराज मठ येथे २४ मे ते ३० मे दरम्यान भागवतकथा महायज्ञ होणार आहे. निरुपणकार वे.शा.स. भागवताचार्य श्री. ऋषिकेस महाराज विष्णुपुरीकर रामदासी (नांदेड) हे भाविकांना मार्गदर्शन करणार आहेत. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिरीष थिटे परिवाराने केले आहे.

# कर्णिक नगर येथील शनी मंदिरात उद्या शनी देवाला चंदनाचा लेप कार्यक्रम



**सोलापूर, दि. २१ मे-**
सोलापूरची रास कुंभ असून कुंभ राशीचे स्वामी शनिदेव आहेत. अशी मान्यता आहे की, शनेश्वर कोपल्यास दुष्काळ आणि उन्हाची दाहकता वाढते. याच पार्श्वभूमीवर, उन्हाचा तडाखा कमी व्हावा आणि सुख-समृद्धी लाभावी यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही कर्णिक नगर रोडवरील शनी मंदिरामध्ये शनिवार, दिनांक २३ मे रोजी मंदिरातील शनी महाराज आणि मारुतीरायाच्या मूर्तीस चंदनाचा लेप लावण्यात येणार आहे.

हा धार्मिक विधी परमभक्त रघुवीर फलमारी व त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. उन्हाळ्याचे तीव्र दिवस लक्षात घेता, मंदिरामध्ये देवासाठी कृत्रिम जम्बो कुलरद्वारे थंडावा निर्माण केला जाणार आहे. तसेच दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविकांना उन्हापासून गारेगार दिलासा मिळावा म्हणून लिंबू सरबत वाटप करण्यात येणार आहे. हा संपूर्ण कार्यक्रम देवस्थान समितीचे संस्थापक ॲड. सुरेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्यवस्थापक प्रभाकर फलमारी, महादेव मेतकू, सागर वंगारी पंतलू, राजू कोडम आदी मान्यवर नियोजन करत आहेत. तरी सर्व भाविकांनी या सुवर्ण संधीचा व दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

**CHANG IN NAME**

I, hereby declare that My Old Name- **SABHA ANJUM hAJI TAYYAB ALI MULLA** has been changed to - **SABHA ANJUM TAYYAB ALI MULLA**
Resi add- Plot No 9, Bidi Gharkul, Haidrabad Road, Solapur - 413005
Affidavit No.
265264247/268500826/85

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः मौजे उपरी, ता. पंढरपूर येथील आसपासचे लोकांना याद्वारा खाली सही करणार श्री. भारत अनंतराव बहिरट, ॲडव्होकेट, रा. घर नं. ३०८१, काळा मारूती, जवळ, पंढरपूर, जि. सोलापूर यांजमार्फत या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कीं, :-

डि. सोलापूर सब डि. व ता. पंढरपूर पैकी मौजे उपरी येथील गट नं. १३० पैकी हे ०.८४ आर, यांसी स्वतंत्र आकार रू. ०.६१ पैसे असा असून त्याचे स्वतंत्र खाते आहे. सदरील मिळकत विजय वसंत नागणे यांचे मालकी वहिवाटीची असून उपरोक्त विजय वसंत नागणे यांनी आमचे अशिलास कायमखुष खरेदी देण्याचे ठरवून त्याप्रमाणे व्यवहार निश्चित करून तसा रितसर ठरावही केलेला आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलाने इसारा दाखल रक्कम वर नमुद विजय वसंत नागणे यांना दिली आहे.

सदरील मिळकत निष्कर्जी, निजोखमी व स्वतंत्र व निष्कलंक मालकीची असल्याची खात्री व भरवसा उपरोक्त विजय वसंत नागणे यांनी आमचे अशिलास दिला आहे व लवकरच त्यावर विसंबून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी उपरोक्त मिळकतीबाबत कोणाची गहाण, दान, लिज, पोटगी बोजा वा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाच्या आत त्यांनी अस्सल कागदपत्रांनिशी आमचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन आमची खात्री पटवून द्यावी. तसे न घडल्यास कोणाची हरहरकत नाही असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

म्हणून ही जाहिर नोटीस प्रसिद्ध केली तारीख २०/०५/२०२६

**सही/-**
**भारत अनंतराव बहिरट**
**(एम.ए.एल.एल.एम.) ॲडव्होकेट**
**अभिमान, ३०८१, काळा मारूती, पंढरपूर**
**फोन नं. (०२१८४) २२३८४८**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे खांडवी ता. बार्शी तालुका व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि सोलापूर सब डि व ता. बार्शीपैकी मौजे खांडवी येथील ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ७८५ व ७८६ (पुर्वेकडील बाजू) याचे क्षेत्र ८३५.०० चौ. फुट. यांसी चतुःसिमा पुर्वेस - निवृत्ती भोसले, दक्षिणेस - सुभाष भोसले, पश्चिमेस - लक्ष्मण शिदे व उत्तरेस - ग्रामपंचायत रोड येणेप्रमाणे वर्णनाची खुली घरजागा ही श्री. रामहरी दगडू भोसले व सौ. सखुबाई रामहरी भोसले यांचे मालकीची असून सदरची जागा हक्कपत्रकी त्यांचे नांवे नोंद आहे.

श्री. रामहरी दगडू भोसले व सौ. सखुबाई रामहरी भोसले हे सदरची मिळकत आपला मुलगा श्री. हणुमंत रामहरी भोसले यांच्या नांवे दिनांक ०३/०२/२०२६ रोजी बक्षीसपत्र दस्त क्रमांक २२५२/२०२६ अन्वये हस्तांतरीत केलेली आहे. सदरचा दस्त हा बार्शी येथील दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदलेला आहे.

सदर व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आमचे वकिलांना वर दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेटुन कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील हे, सदर मिळकतीशी कोणाचाही, कसलाही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास त्याने तो स्वखुशीने सोडून दिलेला आहे, असे समजून सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदरची मिळकत तारण घेऊन कर्ज रक्कम वितरीत करतील.

सदरचा गहाणखताचा दस्त नोंदणीकृत झाल्यानंतर कोणची कसलीही हरकत आल्यास ती आमचे अशिलांच्या हक्काधिकारांवर बंधनकारक राहणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये, म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली असे. कळावे.

दिनांक: २१/०५/२०२६

**सही/-**
**ॲड. प्रवीण परशुराम करंजकर**
**पाटील प्लॉट, कर्मवीर नगर, बार्शी**
**मो. नं. ९८२२०६५६६१**

**महानिर्मिती**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**ई निविदा प्रकाशनाची सूचना**

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी– वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई–निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम /बयाना रक्कम | ई–निविदा विक्रीचा कालावधी | ई–निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई–निविदा क्र ३०००६८५३४(आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ २००एनबी अँश इंटेक वॉल्व विथ पॉवर सिलिंडर फॉर ईएसपी होप्पर ॲट एएचपी – १ यू ६,२५०मे.वॅट, टीपीएस, परळी वै. | ६.३० लाख ९८००/– | २२.०५.२०२६ ते २९.०५.२०२६ | ३०.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६८२४६ | प्रॉक्यूरमेंट ऑफ स्पेयर्स फॉर एचपी अँड एलपी डोजिंग पंप्स ड्यूरिंग यू–७ सीओएच ॲट टीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १५.३६ लाख १८८६६/– | २२.०५.२०२६ ते २९.०५.२०२६ | ३०.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६८२७४ | प्रॉक्यूरमेंट ऑफ स्पेयर्स फॉर एनडीसीटी हॉट वॉटर डिस्ट्रिब्यूशन सिस्टम ड्यूरिंग यू–७ सीओएच ॲट टीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ५१.६६ लाख ५५१६५/– | २२.०५.२०२६ ते २९.०५.२०२६ | ३०.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६८२७९ | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस ऑइल फिल्टर्स फॉर सील ऑइल, टीजी बेरिंग ऑइल फ्लशिंग अँड बीएफपी लुब ऑइल ॲट २५० मे.वॅट (केडब्ल्यूयू) ड्यूरिंग यू–७ सीओएच ॲट टीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १३.७९ लाख १७२९१/– | २२.०५.२०२६ ते २९.०५.२०२६ | ३०.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६८५५५ | प्रॉक्यूरमेंट ऑफ कंट्रोल ट्रान्सफॉर्मर फॉर ईएसपी पॅनल ड्यूरिंग यू–७ सीओएच ॲट ईटी–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २.२७ लाख ५७७४/– | २२.०५.२०२६ ते २९.०५.२०२६ | ३०.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६८८८२ | वर्क ऑफ सर्विसिंग अँड इन–सिटू रीपेयर ऑफ एचपी अँड सेफ्टी वॉल्व ड्यूरिंग यू–७ एओएच ॲट बीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ११.५७ लाख १५०७७/– | २२.०५.२०२६ ते २९.०५.२०२६ | ३०.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६८८८३ | एचपी वेल्डिंग वर्क फॉर यू–७ ड्यूरिंग एओएच ॲट बीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १२८.६० लाख १३२१००/– | २२.०५.२०२६ ते २९.०५.२०२६ | ३०.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७६९४ | वर्क ऑफ सॅम्पल कूलर, एसएडीसी डॅम्पर रीपेयर इन एओएच यू–७ ॲट बीएम–१, २५०मे.वॅट., टीपीएस, परळी वै. | ६.३० लाख ९८०९/ | २२.०५.२०२६ ते ०१.०६.२०२६ | ०२.०६.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७९३१ | वर्क ऑफ रिप्लेसमेंट ऑफ एसीडब्ल्यू पाइपलाइन इन एयर कॉम्प्रेसर रूम ड्यूरिंग यू–७ सीओएच ॲट टीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ५.३७ लाख ८८७९/– | २२.०५.२०२६ ते ०१.०६.२०२६ | ०२.०६.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७६५५ (आर) | वर्क ऑफ रीपेरिंग अँड ओवरहौलिंग ऑफ बुल्डोझर इंजिन ॲट वेहिकलमेंटेनेंस सीएचपी–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २९.१८ लाख ३२६८०/– | २२.०५.२०२६ ते ०६.०६.२०२६ | ०७.०६.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६८५४७ (आर) | टेक्निकल सर्विसेस ऑफ टेस्टिंग अँड कॅलिब्रेशन ऑफ इलेक्ट्रॉनिक मॉडूल फॉर बीटीएस २००० सिस्टिम ॲट ईटी–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २.०३ लाख ५५३१/– | २२.०५.२०२६ ते ०६.०६.२०२६ | ०७.०६.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६८६५५ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ एचपीबीपी सिस्टम स्पेयर्स इंस्टॉलड यू–८, फॉर आय अँड सी–२, २५०मे.वॅट., टीपीएस, परळी वै. | ६.०० लाख ९५००/ | २२.०५.२०२६ ते ०६.०६.२०२६ | ०७.०६.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७७०८ | वर्क ऑफ रीपेरिंग ऑफ सेंट्रल एयर कंडीशनर सिस्टिम इंस्टॉलड ॲट कंट्रोल रूम ऑफ सीएचपी–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २.१५ लाख ५६५०/– | २२.०५.२०२६ ते १२.०६.२०२६ | १३.०६.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७८३५ | प्रॉक्यूरमेंट ऑफ सबमर्शिबल डीवॉटरिंग पम्प ॲट टीएम–१ , २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ७.९८ लाख ११४८०/– | २२.०५.२०२६ ते १२.०६.२०२६ | १३.०६.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६८२४९ | वर्क ऑफ रीपेयर, सर्विसेस अँड कॅपॅसिटी एन्हांसमेंट ऑफ प्लेट हीट एक्सचेंचर (पीएचई) अलॉन्ग विथ नेसेसरी स्पेयर्स ॲट टीएम–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ९.९८ लाख १३४८५/– | २२.०५.२०२६ ते १२.०६.२०२६ | १३.०६.२०२६ |

वरील तारीखेस ई–निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई–निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे.सर्व निविदा करिता निविदा किंमत रु. ११८०/– (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती: मुख्य अभियंता, टीपीएस परळी–वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**




## महत्त्वाचे

### मोरोक्कोमध्ये कामगिरी उंचावण्याचे दीक्षाचे ध्येय



**दार एस सलाम** : बाद फेरीत पराभव पत्करावा लागल्यानंतर बरोबर एका वर्षाने, भारताची गोल्फपटू दीक्षा डागर मोरोक्कोमध्ये लाला मेरीम चषक जिंकण्यासाठी पुन्हा सज्ज झाली आहे. गेल्या स्पर्धेत उपविजेतेपद मिळविल्यानंतर, यावेळी त्यापेक्षाही सरस कामगिरी करून विजेतेपद पटकावण्याचे तिचे ध्येय आहे. दोन वेळा विजेतेपद मिळवणाऱ्या दीक्षासोबतच, या आठवड्यात प्रणवी उर्स, अवनी प्रशांत आणि हिताशी बक्षी या भारतीय खेळाडूही सहभागी होत आहेत. बरोबर एका वर्षापूर्वी, इंग्लंडच्या कारा गेनरने अंतिम फेरीत ४-अंडर ६९ (४- ६९) असा स्कोअर नोंदवत प्ले-ऑफमध्ये प्रवेश केला होता. तिथे सडन-डेथ प्ले-ऑफमध्ये दीक्षाचा पराभव करत तिने निर्णायक विजय मिळवला आणि रॉयल गोल्फ दार एस सलाम येथे वरील आपले पहिलेवहिले विजेतेपद निश्चित केले. विशेष म्हणजे, या आठवड्यात गेनर आणि दीक्षा या दोघींचेही वडीलच त्यांच्यासाठी कॅडीची भूमिका बजावणार आहेत. गेल्या वर्षी गेनरला तिचा होणारा जोडीदार (फियांसे) सेब याने मदत केली होती; त्यानेच तिच्या विजयाच्या प्रवासात कॅडीचे काम केले होते.

### मालविका बन्सोडचे आव्हान संपुष्टात

**लंडन** : गुरुवारी मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत डेन्मार्कची माजी युरोपियन गेम्स विजेती खेळाडू कजेर्सफेल्ट हिच्याकडून पराभव पत्करावा लागल्यामुळे, मालविका बन्सोड दुसऱ्याच फेरीत स्पर्धेबाहेर झाली. पहिला गेम जिंकूनही, जागतिक क्रमवारीत ५१ व्या क्रमांकावर असलेल्या मालविकाला, २३ व्या क्रमांकावर असलेल्या व आठवे मानांकन मिळालेल्या कजेर्सफेल्टकडून १६-२१, २१-८, २१-१५ अशा गुणांनी पराभव स्वीकारावा लागला. मालविकाविरुद्ध खेळलेल्या तीन सामन्यांमधील ऑलिम्पियन कजेर्सफेल्टचा हा दुसरा विजय होता. बन्सोडचीच सहकारी असलेल्या देविका सिहागलाही, महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत माजी ऑलिम्पिक विजेती आणि अव्वल मानांकन असलेली चीनची खेळाडू चेन युफेई हिच्याकडून २१-१६, २१-१३ असा पराभव पत्करावा लागला आणि तिलाही स्पर्धेबाहेर व्हावे लागले. दरम्यान, सुपर ५०० स्पर्धेतील भारताची एकमेव जोडी असलेल्या एम.आर. अर्जुन आणि हरिहरन अमसकरुणन यांचा चीनच्या हू केयुआन आणि लिन शियांगयी यांच्याकडून २१-१४, २१-१५ असा पराभव झाल्यामुळे, भारताची पुरुष दुहेरीतील मोहीम संपुष्टात आली. मिश्र दुहेरीमध्ये, सात्त्विक रेड्डी कनापुरम आणि राधिका शर्मा या जोडीला अमेरिकेच्या प्रेस्ली स्मिथ आणि जेनी गाई यांच्याकडून १२-२१, २५-२७ अशा गुणांनी पराभव पत्करावा लागला.


### अफगाणिस्तान निर्वासित महिला संघ इंग्लंड दौऱ्यासाठी सज्ज

**लंडन** : २२ जूनपासून सुरू होणाऱ्या अफगाणिस्तान निर्वासित महिला संघाच्या एका अभूतपूर्व इंग्लंड दौऱ्याचे यजमानपद भूषवतील. या दौऱ्यादरम्यान, ५ जुलै रोजी लॉर्ड्स मैदानावर होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यालाही या खेळाडू उपस्थित राहणार आहेत, अशी घोषणा इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट मंडळाने गुरुवारी केली. या दौऱ्याच्या वेळापत्रकात संघासाठी उच्च दर्जाचे सराव सत्रे आणि २० सामन्यांचा समावेश करण्यात आला आहे. २०२१ मध्ये तालिबान पुन्हा सत्तेवर आल्यापासून अफगाणिस्तानमध्ये महिलांना खेळांपासून वंचित ठेवले जात असल्याच्या पृष्ठभूमीवर या दौऱ्याला सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्राच्या दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. २०२१ पासून अफगाणिस्तान महिला क्रिकेट संघातील २० हून अधिक सदस्यांनी ऑस्ट्रेलियामध्ये पुनर्वसन केले आहे.

# साई, गिल, बटलरची जोरदार फटकेबाजी


शुभमन गिल


साई सुदर्शन


जोस बटलर

### गुजरात टायटन्स ४ बाद २२९ धावा

◆ **अहमदाबाद, २१ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात गुरुवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) विरुद्धच्या आयपीएल सामन्यात सलामीवीर साई सुदर्शन, कर्णधार शुभमन गिल आणि जोस बलटरने झळकावलेल्या शानदार अर्धशतकांच्या बळावर ग गुजरात टायटन्सने २० षटकांत ४ बाद २२९ धावा उभारल्या आणि चेन्नईसमोर विजयासाठी २३० धावांचे लक्ष्य ठेवले.

सीएसकेचा कर्णधार ऋतुराज गायकवाडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीवीर साई सुदर्शन आणि कर्णधार शुभमन गिलने दमदार फलंदाजी करीत गुजरात टायटन्सच्या डावाची दणकेबाज सुरूवात केली. या दोघांनी चौफेर फलंदाजी करीत सीएसकेच्या गोलंदाजांना भंडावून सोडले. यादरम्यान, दोघांनी आपापली अर्धशतके झळकावून संघाला शतकी उंबरठा ओलांडूनदिला. या दोघांनी ७४ चेंडूंत १२५ धावांची सलामी भागीदारी केली. डावखुरा वेगवान गोलंदाज स्पेन्सर जॉन्सनला ही जमलेली सलामीची जोडी फोडण्यात यश मिळाले. दुबेने झेल पकडण्यापूर्वी शुभमन गिलने ३७ चेंडूंत ६४ धावांची खेळी केली, यात त्याने ७ चौकार व ३ षट्कार ठोकलेत.

पुढे साई सुदर्शन जोस बटलरच्या साथीने आपल्या अर्धशतकी खेळीला शतकामध्ये रुपांतर करेल असे वाटत होते, मात्र याचदरम्यान अंशुल कम्बोजचा चेंडू फटकावण्याच्या नादात साई सुदर्शन शॉर्टकडून झेलबाद झाला. साई सुदर्शनने ५३ चेंडूंत ७ चौकार व ४ षट्कारांसह ८४ धावांची खेळी केली, त्याने बटलरसोबत दुसऱ्या गड्यासाठी ८२ धावांची भागीदारी केली. त्यावेळी गुजरात टायटन्सने १८.२ षटकांत २ बाद २०७ धावांचा टप्पा गाठला होता, त्यानंतर मैदानावर आलेला राहुल तेवतिया (०) झटपट धाव काढण्याच्या नादात धावबाद झाला. जोस बटलरने वॉशिंग्टन सुंदरच्या साथीने आपले अर्धशतक साजरे केले. मुकेश चौधरीने अखेरच्या षटकातील अखेरच्या चेंडूवर वॉशिंग्टन सुंदरला (७) पटेलकडून झेलबाद केले, याचबरोबरच गुजरात टायटन्सने २० षटकांत ४ बाद २२९ धावा उभारल्या. जोस बटलरने २७ चेंडूंत ५ चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने नाबाद ५७ धावांची खेळी केली. (वृत्तसंस्था)

### श्रीलंका दौऱ्यासाठी अनुकूल रॉयची निवड

**नवी दिल्ली** : श्रीलंकेविरुद्धच्या आगामी तिरंगी मालिकेसाठी भारत अ संघात अष्टपैलू खेळाडू अनुकूल रॉयचा समावेश करण्यात आला आहे. २७ वर्षीय अनुकूलने हर्ष दुबेची जागा घेतली आहे. हर्ष दुबेला अफगाणिस्तानविरुद्धच्या आगामी मालिकेसाठी भारताच्या कसोटी आणि एकदिवसीय संघात पहिल्यांदाच स्थान मिळाले आहे. डाम्बुला येथे ९ ते २१ जून दरम्यान होणाऱ्या या तिरंगी मालिकेत यजमान श्रीलंका अ आणि अफगाणिस्तान अ हे संघही सहभागी होतील. या संघाचे कर्णधारपद तिलक वर्माकडे सोपवण्यात आले असून, रियान परागची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे. निवड समितीने श्रीलंकेतील आगामी त्रिकोणीय मालिकेसाठी भारत अ संघात अनुकूल रॉयचा समावेश केला आहे.

# अशिमता चालिहा उपांत्यपूर्व फेरीत

### मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन

◆ **क्वालालम्पूर, २१ मे**

भारताच्या अशिमता चालिहाने मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेतील आपली प्रभावी कामगिरी कायम राखत, गुरुवारी स्टेडियम अक्सियाटा अरेना येथे झालेल्या सामन्यात मलेशियाच्या गोह जिन वेईचा २१-१३, २१-१६ अशा गुणांनी पराभव केला आणि महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

पात्रता फेरीपासून आपल्या मोहिमेची सुरुवात करणाऱ्या अशिमताने, जागतिक क्रमवारीत ५५ व्या क्रमांकावर असलेल्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध सामन्यावर पूर्ण नियंत्रण ठेवले. तिने पहिल्या गेममध्ये वर्चस्व गाजवत सहज विजय मिळविला. दुसऱ्या गेममध्ये जिन वेईने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला असला, तरी या भारतीय बॅडमिंटनपटूने आपल्या प्रतिस्पर्ध्याला सामन्यात स्थिरावण्याची कोणतीही संधी दिली नाही; आणि अवघ्या २७ मिनिटांत, सलग दोन गेम्समध्येच हा सामना आपल्या नावी केला.



या विजयासह, अशिमताने आपल्या कारकिर्दीत तिसऱ्यांदा सुपर ५०० दर्जाच्या स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. पुढील फेरीत तिचा सामना डेन्मार्कच्या आठव्या मानांकित खेळाडू लाईन होजमार्क जेअर्सफेल्ट हिच्याशी होईल. जेअर्सफेल्टने यापूर्वीच्या फेऱ्यांमध्ये भारताच्याच दोन खेळाडू - अनमोल खरब आणि मालविका बन्सोड - यांचा पराभव करून पुढील फेरीत प्रवेश मिळवला आहे. भारतीय संघातील इतर खेळाडूंना मात्र आपापल्या सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आणि त्यांचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. (वृत्तसंस्था)

# हैदराबादची अव्वल स्थानासाठी धडपड

◆ **हैदराबाद, २१ मे**

सध्या सुरू असलेल्या इंडियन प्रीमियर लीग २०२६ च्या ६७ व्या सामन्यात शुक्रवार २२ मे रोजी सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. एकीकडे बंगळुरू आपले अव्वल स्थान कायम राखू इच्छित आहे, तर हैदराबादचा संघ तिसऱ्या स्थानावर असून ते बंगळुरूविरुद्ध विजय नोंदवून अव्वल स्थान बळकावू इच्छित आहे.

सध्या गुणतालिकेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू १८ गुणांसह अव्वल स्थानावर असून त्यांनी प्लेऑफमध्ये आपले स्थान आधीच निश्चित केले आहे, तर सनरायझर्स हैदराबाद १६ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. गुजरातचेही तेवढेच सरस धावगतीमुळे ते दुसऱ्या स्थानावर आहे.


रजत पाटीदार


पॅट कमिन्स

सनरायझर्स हैदराबाद हा आयपीएल २०२६ मधील सर्वोत्तम संघांपैकी एक ठरला असून, त्यांनी आपल्या १३ पैकी ८ सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. हेनरिक क्लासेन आणि अभिषेक शर्मा यांचा समावेश असलेल्या, स्फोटक फलंदाजी फळीच्या जोरावर; पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखालील या संघाने अगदी योग्य वेळी आपल्या कामगिरीचा सर्वोच्च वेग गाठला आहे. बंगळुरूविरुद्ध मिळवलेला एक दणदणीत विजय त्यांना केवळ गुणतालिकेत बंगळुरूच्या बरोबरीने आणणार नाही, तर गुणतालिकेतील पहिल्या दोन स्थानांपैकी एक स्थान निश्चित करण्याच्या त्यांच्या संधींनाही अधिक बळ देईल.

दुसरीकडे, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघही स्वतःच्याच एका जबरदस्त आणि विजयी लाटेवर स्वार होऊन या सामन्यासाठी सज्ज झाला आहे. गतविजेत्या असलेल्या या संघाने सलग तीन सामन्यांमध्ये विजय मिळवला असून, १८ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानी आपले स्थान अधिकच भक्कम केले आहे. विरुद्ध नुकत्याच झालेल्या सामन्यातही, (जो या हंगामातील सलामीचा सामना होता) त्यांनी प्रतिस्पर्ध्यावर आपले वर्चस्व गाजवले होते. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**सनरायझर्स हैदराबाद वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू**
**स्थळ** : राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियम, हैदराबाद
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# मेजर लीग बेसबॉलचा रिलायन्सच्या राईज वर्ल्डवाइडसोबत करार

### डिजिटल उपक्रमाद्वारे तरुणांना आकर्षित करण्यावर भर

◆ **मुंबई, २१ मे**

मेजर लीग बेसबॉलने (एमएलबी) रिलायन्स इंडस्ट्रीजची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या राईज वर्ल्डवाइडसोबत नवीन भागीदारीची घोषणा केली आहे. भारतात बेसबॉलचा प्रसार आणि लोकप्रियता वाढवणे हा या भागीदारीचा मुख्य उद्देश आहे.

या भागीदारीअंतर्गत मार्केटिंग मोहिमा, सोशल मीडिया प्रचार आणि विविध व्यावसायिक उपक्रम राबविले जाणार आहेत. तसेच ऑक्टोबर २०२६ मध्ये मुंबईत भव्य लाइव्ह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून, भारतीय प्रेक्षकांपर्यंत बेसबॉलचा रोमांच पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.



एमएलबी गत काही वर्षांपासून भारतात बेसबॉलला प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. २०१९ मध्ये नवी दिल्ली येथे कार्यालय सुरू केल्यानंतर लीगने या खेळाबाबत जनजागृती आणि उत्सुकता वाढवण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. भारतातील शाळांमध्ये 'एमएलबी फर्स्ट पिच' कार्यक्रम सुरू करण्यात आला असून, तरुणांसाठी 'एमएलबी चषक' स्पर्धांचे देखील आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय एमएलबी पोस्ट-सीझन सामन्यांचे प्रसारणही भारतात करण्यात आले.

एमएलबीने 'इंडियन बेसबॉल ड्रीम्स'सारखे भारत-केंद्रित उपक्रमही सुरू केले आहेत. या उपक्रमांमुळे देशात बेसबॉलबाबतची उत्सुकता आणि सहभाग वाढत आहे.

ही भागीदारी एमएलबीच्या आंतरराष्ट्रीय विस्तार धोरणातील महत्त्वाचा टप्पा आहे. राइज़सोबत काम करताना आम्हाला बेसबॉलचा रोमांच अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवता येईल, असे एमएलबीचे व्यवसाय आणि मीडिया उपआयुक्त नोआ गार्डन म्हणाले.

भारतातील क्रीडा बाजारपेठ सातत्याने नव्या संधी निर्माण करत आहे. बेसबॉलची जागतिक लोकप्रियता पाहता हा खेळ भारतीय प्रेक्षकांपर्यंत अधिक जवळून पोहोचवण्याची ही योग्य वेळ आहे, असे राईज वर्ल्डवाइडचे प्रमुख निखिल बारदिया म्हणाले. (वृत्तसंस्था)

# प्रज्ञानंदला डियाकने बरोबरीत रोखले


प्रतिस्पर्ध्याविरुद्ध खेळताना आर. प्रज्ञानंद

### सुपर क्लासिक बुद्धिबळ

### दुखापतीमुळे फिरौजाची माघार

◆ **बुखारेस्ट (रोमानिया), २१ मे**

ग्रॅण्ड चेस टूरचा एक भाग असलेल्या सुपर चेस क्लासिक स्पर्धेच्या सहाव्या फेरीत भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदला रोमानियाच्या डियाक बोगदान-डॅनियलने बरोबरीत रोखले, तर फ्रान्सच्या अलीरेझा फिरौजाने अखेर स्पर्धेतून माघार घेण्याचा निर्णय घेतला.

घोट्याला दुखापत झालेली असतानाही दोन सामने खेळणाऱ्या अलीरेझाने, आता पुढे खेळणे शक्य नसल्याचे ठरवले आणि दहा खेळाडू व नऊ फेऱ्यांच्या या स्पर्धेच्या विश्रांतीच्या दिवशी त्याने माघार घेतली. फिरौजाच्या माघारीचा सर्वाधिक फायदा जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमरला झाला; या फेरीत त्याला वॉकओव्हर (प्रतिस्पर्ध्याच्या अनुपस्थितीमुळे मिळालेला विजय) मिळाल्याने त्याची आघाडी एका पूर्ण गुणाने वाढली.

इतर सर्व सामने बरोबरीत संपले असताना, कीमर ४.५ गुणांसह एकमेव आघाडीवर राहिला. तो नेदरलँड्सचे जॉर्डन व्हॅन फोरिस्ट आणि अनिश गिरी, अव्वल मानांकित अमेरिकन फॅबियानो कारुआना आणि प्रज्ञानानंदज्यांच्या प्रत्येकी ३.५ गुण आहेतयांच्यापेक्षा एका पूर्ण गुणाने पुढे आहे. फ्रान्सचा मॅक्सिम वाशियर-लाग्रेव्ह आणि वेस्ली हे प्रत्येकी तीन गुणांसह सहाव्या स्थानावर संयुक्तपणे आहेत, तर जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचा दावेदार असलेला उझबेकिस्तानचा जावोखिर सिंदारोव्ह २.५ गुणांसह त्यांच्या अगदी जवळ (मागे) आहे. रोमानियाचा डियाक बोगदान-डॅनियल दोन गुणांसह नवव्या स्थानावर आहे, तर फिरौजाने पाच सामन्यांतून केवळ एक गुण मिळवून आपली मोहीम संपवली. (वृत्तसंस्था)

# हंगामात आमचे क्षेत्ररक्षण खूपच सुमार

### हार्दिक पांड्या यांचे प्रतिपादन

◆ **कोलकाता, २० मे**

संपूर्ण आयपीएल हंगामात आमचे क्षेत्ररक्षण खूपच सुमार राहिले आहे, अशी खंत मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याने व्यक्त केली.

मुंबई इंडियन्सला विजयाचे सूत्र गवसण्यात पुन्हा एकदा अपयश आले. बुधवारी येथे मुंबईला कोलकाता नाईट रायडर्सकडून चार गडी राखून पराभवानंतर पांड्याने संघातील त्याच त्या वारंवार होणाऱ्या चुकांबद्दल - म्हणजेच ढिसाळ झेल आणि फलंदाजीतील आणखी एका निराशाजनक कामगिरीबद्दल नाराजी व्यक्त केली.



कमी धावांच्या या सामन्यात अत्यंत नियोजनबद्ध विजय मिळवित कोलकाता नाईट रायडर्सने प्ले-ऑफमध्ये पोहोचण्याच्या आपल्या धूसर आशा जिवंत ठेवल्या आहेत. या विजयासह त्यांचे गुण १३ वर पोहोचले असून, त्यांचा एक साखळी सामना अजून शिल्लक आहे; तर दुसरीकडे, स्पर्धेबाहेर फेकल्या गेलेल्या मुंबई इंडियन्सच्या वाट्याला, त्यांच्या या विसरण्याजोग्या हंगामात आणखी एका निराशाजनक कामगिरीचा सामना करणेच उरले. (वृत्तसंस्था)

# हृधान शाहचा अव्वल मानांकित खेळाडूवर विजय

### आशियाई कनिष्ठ गट स्क्वॅश

◆ **पान्झिहुआ, २१ मे**

चीनमध्ये गुरुवारी पार पडलेल्या ३३ व्या आशियाई कनिष्ठ वैयक्तिक स्क्वॅश अजिंक्यपद स्पर्धेत मुलांच्या १७ वर्षांखालील गटातील उपांत्यपूर्व फेरीपूर्वीच्या सामन्यात भारताच्या हृधान शाहने मलेशियाच्या अव्वल मानांकित खेळाडू मुहम्मद हैकल हाझिम बिन सयारुद्दीनचा ११-१३, ११-५, ११-४, ११-७ अशा गुणांनी पराभव केला.

मुलांच्या १७ वर्षांखालील गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत हृधानसोबतच त्याचे सहकारी लोकेश सुब्रमणी आणि शिवेन अग्रवालनेही स्थान मिळवले आहे; या फेरीत हृधानचा सामना लोकेशशी होणार आहे. दरम्यान, मुलांच्या १९ वर्षांखालील गटात आर्यवीर दिवान, गुरवीर सिंग आणि युशा नफीसने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. विविध गटांमध्ये अंतिम आठ खेळाडूंच्या टप्प्यात पोहोचलेल्या इतर भारतीय खेळाडूंमध्ये यांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)



# फिफा विश्वचषकासाठी ४८ संघ झुंजणार

### १०४ सामने खेळले जातील

◆ **मेक्सिको, २१ मे**



आागामी १२ जूनपासून प्रारंभ होणाऱ्या २०२६ च्या फिफा फुटबॉल विश्वचषकात एकूण ४८ संघ सहभागी होणार आहे. आधीच्या विश्वचषकात ३२ संघांचा सहभाग होता, यंदाच्या विश्वचषकात सहभागी होणाऱ्या संघांची संख्या वाढविण्यात आली आहे. ४८ संघांच्या या विस्तारित स्पर्धेची रचना नवीन स्वरूपाची आहे. गट फेरी : सहभागी संघांची प्रत्येकी ४ संघांच्या अशा १२ गटांमध्ये विभागणी केली जाईल. बाद फेरी : प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ, तसेच तिसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या आठ सर्वोत्तम संघांसह, स्पर्धेच्या नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या ३२-संघांच्या फेरीत प्रवेश करतील. या स्पर्धेत एकूण १०४ सामने खेळले जातील.

१२ जून रोजी सलामीचा सामना मेक्सिको सिटीमध्ये मेक्सिको वि. दक्षिण कोरिया यांच्यात खेळला जाणार असून त्याचदिवशी दक्षिण कोरिया व युईएफए पाथ डी संघादरम्यान सामना खेळला जाणार आहे.

**गटवारी अशी**

**गट अ** : मेक्सिको, दक्षिण आफ्रिका, दक्षिण कोरिया व पात्रताधारी संघ
**गट ब** : कॅनडा, पात्रताधारी संघ, कतार व स्वित्झर्लण्ड
**गट क** : ब्राझील, मोरोक्को, हैती, स्कॉटलंड.
**गट ड** : अमेरिका, पॅराग्वे, ऑस्ट्रेलिया व पात्रताधारी संघ
**गट ई** : जर्मनी, कुराकाओ, आयव्हरी कोस्ट, इक्वाडोर.
**गट फ** : नेदरलॅण्ड्स, जपान, पात्रताधारी संघ, ट्युनिशिया.
**गट ग** : बेल्जीयम, इजिप्त, इराण, न्यूझीलंड.
**गट ह** : स्पेन, काबो व्हर्दी, सौदी अरब, ऊरुग्वे.
**गट आय** : फ्रान्स, सेनेगल, पात्रताधारी संघ, नॉर्वे.
**गट ज** : अर्जेंटिना, अल्जेरि, ऑस्ट्रीया, जॉर्डन.
**गट के** : पोर्तुगाल, पात्रताधारी संघ, उझबेकिस्तान, कोलंबो.
**गट ल** : इंग्लंड, क्रोएशिया, घाना, पनामा. (वृत्तसंस्था)

# इराण संघाने केला अमेरिका, कॅनडा व्हिसासाठी अर्ज

### फिफा फुटबॉल विश्वचषकाची तयारी

◆ **अंकारा, २१ मे**

२०२६ फिफा विश्वचषकाच्या पृष्ठभूमीवर इराणच्या राष्ट्रीय फुटबॉल संघाने गुरुवारी तुर्कीची राजधानी अंकारा येथे व्हिसासाठी अर्ज केले. संपूर्ण संघाने कॅनेडियन व्हिसासाठी अर्ज केला असून, काही खेळाडूंनी अमेरिकेत प्रवेशासाठीही अर्ज सादर केले आहेत.

विश्वचषकाचे आयोजन अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको संयुक्तपणे करणार असून, इराण आपले गट फेरीतील तिन्ही सामने अमेरिकेत खेळणार आहे.

इराणचा सामना १५ जून रोजी न्यूझीलंड आणि २१ जून रोजी बेल्जियमसोबत लॉस एंजेलिसमध्ये होणार आहे, त्यानंतर पाच दिवसांनी सिएटलमध्ये इजिप्तशी सामना होईल. जर ते बाद फेरीसाठी पात्र ठरले, तर त्यांना कॅनडामध्ये प्रवेशाची आवश्यकता असेल.

संपूर्ण संघाने कॅनेडियन व्हिसासाठी अर्ज केले, तर ज्या खेळाडूंनी इराण युद्धापूर्वी अमेरिकेच्या व्हिसासाठी अर्ज केला नव्हता, त्यांनीही अंकारामध्ये अर्ज सादर केले, असे इराण फुटबॉल महासंघाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

परदेशात असलेले काही इराणी खेळाडू अंकारामध्ये संघात सहभागी झाले व नंतर ते तुर्कस्तानच्या भूमध्य सागरी किनाऱ्यावरील अंताल्या येथील संघाच्या प्रशिक्षण शिबिरात रवाना झाले, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.


फिफा विश्वचषकापूर्वी व्हिसा प्रक्रियेसाठी अंकारा येथील कॅनडाच्या दूतावासाबाहेर इराणचे फुटबॉल खेळाडू व कर्मचारी

२८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांमुळे इराणची देशांतर्गत लीग स्थगित करण्यात आली. अनेक खेळाडू सामन्यासाठी पूर्णपणे तंदुरुस्त नव्हते. या पृष्ठभूमीवर इराण तुर्कीमध्ये स्पर्धेपूर्वीचे शिबिर आयोजित करत आहे. इराणी लीग स्थगित असताना देशांतर्गत खेळणारे बहुतेक खेळाडू सात आठवडे स्पर्धात्मक फुटबॉलपासून वंचित राहिले होते. त्यामुळे प्रशिक्षक अमीर घालेनोई यांनी आपल्या संघाला तयार करण्याच्या प्रयत्नात, या आठवड्याच्या सुरुवातीला संघाने अंताल्यामध्ये सराव केला. (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### निलव्वाबाई धनशेट्टी यांना महापालिकेच्या वतीने अभिवादन

**सोलापूर, दि, २१ मे-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने निलव्वाबाई धनशेट्टी यांच्या पुण्यतिथीनिमित्त जोडभावी पेठ येथील निवासस्थानी त्यांच्या समाधीस उपायुक्त सोनाली यादव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, शिवकुमार धनशेट्टी, रवि बिद्री, सुलक्षणा धनशेट्टी, शुभम धनशेट्टी, यालप्पा पुजारी आदी मान्यवर उपस्थित होते.

### कामती येथे वाहनाच्या धडकेत तरुण ठार

**सोलापूर, दि. २१ मे -**

भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनाच्या धडकेने एक ३० वर्षीय पादचारी तरुण गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाला. कामती खुर्द (ता.मोहोळ) येथे बुधवारी सायंकाळी सात वाजता ही घटना घडली.अतुल शिंदे (रा. कामती खुर्द) असे मयताचे नाव आहे. तो बुधवारी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास कामती येथील हॉटेल सुयश येथे रस्ता ओलांडत होता. त्यावेळी वाहन धडकल्याने डोक्यास मार लागून तो बेशुद्ध झाला. त्याला रात्री येथील शासकीय रुग्णालयात आकाश शिंदे (पुतणे) यांनी दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

### मानेगाव शिवारातील दारु अड्ड्यावर छापा

**विदेशी दारुचा साठा जप्त; एक आरोपी ताब्यात आयपीएस अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

**वैराग, दि. २१ मे -**

वैराग पोलीस ठाण्याच्या हद्दीत मानेगाव शिवारात शिवार हॉटेलच्या पाठीमागे चालणाऱ्या विदेशी दारू आणि बिअरच्या छुप्या अड्ड्यावर वैराग पोलिसांच्या निर्भया पथकाने आज गुरुवार, दि. २१ मे रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास अचानक छापा टाकला.१५ हजार १४५ रुपयांचा अवैध दारूसाठा जप्त केला. एका आरोपीला रंगेहात पकडले.

वैराग पोलिस ठाण्याच्या हद्दीत बार्शीचे निर्भया पथक आणि पोलिस कर्मचारी पेट्रोलिंग करत असताना, त्यांना शिवार हॉटेलच्या पाठीमागे एक इसम बेकायदेशीरपणे विदेशी दारूची विक्री करत असल्याची बातमी मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ दोन पंचांना सोबत घेत दुपारी सव्वाचार वाजण्याच्या सुमारास शिवार हॉटेलच्या पाठीमागील आडोशाला वेढा घातला. तेथे पोलिसांना एकजण प्लास्टिकच्या पिशव्या घेऊन संशयास्पद रित्या बसलेला आढळला. पोलिसांनी त्याला जागीच ताब्यात घेतले. चौकशी त्याने नाव रोहीत दादासाहेब ताटे (वय २७, रा. मानेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर) असे सांगितले.

प्लास्टिक पिशव्यांची पंचांसमक्ष झडती घेतली असता, त्यामध्ये ओल्ड मंक व्हिस्की: १८० मिलीच्या ०५ बाटल्या, ग्रँडमास्टर व्हिस्की: १८० मिलीच्या ०४ बाटल्या, रॉयल टँग व्हिस्की: १८० मिलीच्या ०५ बाटल्या, मास्टर डिलाईट व्हिस्की: १८० मिलीच्या ०४ बाटल्या, रॉयल चॅलेंज व्हिस्की: १८० मिलीच्या ०३ बाटल्या, मॅकडॉवेल नं. १ व्हिस्की: १८० मिलीच्या ०४ बाटल्या, मुंबई माल्ट व्हिस्की: १८० मिलीच्या ०३ बाटल्या, इम्पेरिअलब्लू व्हिस्की: १८० मिलीच्या ०३ बाटल्या, टँगो पंच: १८० मिलीच्या १३ बाटल्या, टुबर्ग बिअर: ६५० मिलीच्या ०६ बाटल्या, कासबर्ग बिअर: ६५० मिलीच्या ०८ बाटल्या, किंगफिशर बिअर: ६५० मिलीच्या २० बाटल्या असा एकुण १५ हजार १४५ रुपयांचा दारुसाठा कोणताही वैध परवाना नसताना सापडला. ही कारवाई पोलिस कॉन्स्टेबल बाबासाहेब घाडगे, महिला कॉन्स्टेबल नम्रता गटकूळ आणि पोलिस चालक भाऊसाहेब महानोर यांच्या पथकाने बजावली. पोलिस कॉन्स्टेबल हनुमंत लिंबाजी पाडूळे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. फिर्यादीवरून रोहीत दादासाहेब ताटे याच्याविरुद्ध वैराग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा तपास कॉन्स्टेबल सचिन मुंडे करत आहेत.

### विठ्ठल महाराज देहूकर यांचे निधन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ मे -**



जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचे येथील वंशज विठ्ठल उर्फ श्रीमहाराज ज्ञानेश्वर देहूकर (वय ६३) यांचे अल्पशा आजाराने बुधवारी (दि.२०) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. तीस वर्षाहून अधिक काळ त्यांनी प्रवचन व किर्तनाद्वारे वारकरी संप्रदायाचा प्रचार केला होता. पंढरपूर अर्बन बँकेचे माजी चेअरमन बाळासाहेब देहूकर यांचे ते धाकटे बंधू होत. गुरुवारी (दि.२१ ) त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वारकरी सांप्रदायातील अनेक ज्येष्ठ मंडळी, कीर्तनकार, प्रवचनकार, फडकरी आदींसह वारकरी ,भाविक उपस्थित होते.

## निधन वृत्त...



### लक्ष्मण पाटील

**सोलापूर, दि.२१ मे-**

जुनी पोलीस लाईन येथील रहिवासी असलेले मूळचे मोहोळ तालुक्यातील नांदगाव येथील वारकरी रेशन दुकानदार लक्ष्मण तुळशीराम पाटील (वय ८३) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते मुकुंद पाटील यांचे ते वडील होत.

# आषाढी वारीपूर्वी आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर

- जि.प. उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांची व्यापक नियोजन बैठक
- स्वच्छता, उष्माघातापासून साथीच्या आजारांपर्यंत खबरदारी; २४ तास वैद्यकीय सेवा सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे -**

आगामी आषाढी वारी लक्षात घेता लाखो वारकऱ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी आरोग्य विभागाने व्यापक पूर्वतयारी सुरू केली आहे. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव सभागृहात दि. २१ मे रोजी आयोजित आषाढी वारी पूर्वतयारी नियोजन बैठकीत जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांच्या उपस्थितीत सर्व तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी आरोग्य विभागाने कोणतीही ढिलाई न करता जबाबदारी पार पाडावी, असे निर्देश दिले. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांच्यासह आरोग्य विभागातील प्रमुख अधिकारी, तालुका वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.





वारकऱ्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये आणि वारी सुरक्षित, सुव्यवस्थित पार पडावी यासाठी आरोग्य यंत्रणा पूर्ण क्षमतेने सज्ज ठेवण्याचे निर्देश यावेळी दिले. यंदाच्या वारीत वाढते तापमान आणि साथीच्या आजारांचा संभाव्य धोका लक्षात घेऊन आरोग्य विभागाने विशेष खबरदारी घेण्याचा निर्णय घेतला आहे. वारकरी दिंड्यांच्या मार्गावर आणि मुक्काम स्थळांवर उष्माघात टाळण्यासाठी ओ.आर.एस.चे मोफत वाटप करणार आहे. वारकऱ्यांमध्ये आरोग्य जनजागृतीही केली जाणार आहे.

वारी मार्गावरील पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेवर विशेष भर दिला आहे. विहिरी, टँकर, पाणीपुरवठा केंद्रे आणि मुक्काम स्थळांवरील सर्व पाण्याचे स्रोत नियमित तपासण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**स्वच्छतेवर विशेष भर देणार**

वारी मार्ग व मुक्काम स्थळांवरील स्वच्छतेवर विशेष भर देत ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासनाच्या माध्यमातून साफसफाई, निर्जंतुकीकरण व कचरा व्यवस्थापन मोहीम राबविण्यात येणार आहे. सर्पदंश, अतिसार, ताप आणि इतर साथीच्या आजारांसाठी आवश्यक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याच्या सूचनाही दिल्या.

**- इंद्रजीत पवार, उपाध्यक्ष जिल्हा परिषद सोलापूर**

वारी काळात सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये डॉक्टर, परिचारिका व कर्मचारी २४ तास उपस्थित राहतील याची खात्री करण्याचे आदेश दिले आहेत. वारकऱ्यांची नियमित आरोग्य तपासणी करून आवश्यक तेथे तात्काळ उपचार उपलब्ध करून देण्याचे नियोजनही केले आहे.

# अवैध धंद्यांना बार्शी पोलिसांचा दणका

- हातभट्टी दारू विक्री व मटक्यावर एकाच दिवशी कारवाया
- सहा जणांवर गुन्हे; रोख रक्कम, जुगार साहित्य व हातभट्टी दारू जप्त

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२१ मे-**

बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे अन्वेषण विभागाने १९ मे रोजी शहरातील विविध भागांत अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबवली. हातभट्टी दारू विक्री व कल्याण मटका जुगारावर धडक कारवाया केल्या. पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या कारवाईत सहा जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.




बार्शी शहरातील देशमुख प्लॉट, ख्रिश्चन स्मशानभूमी परिसरात फिरोज हबीब सय्यद (वय ४०, रा. गाडेगाव रोड, बार्शी) हा हातभट्टी दारू विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार छापा टाकून त्याच्याकडून ६ लिटर हातभट्टी दारू (६०० रुपये) जप्त केली. त्यानंतर कसबा पेठ येथील बेदराई विहिरीजवळ पत्र्याच्या शेड परिसरात नितीन दत्तात्रय वीर (वय २७, रा. बारंगुळे प्लॉट, बार्शी) हा दारू विक्री करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली. त्याच्याकडून २४ पाऊचमधून ६ लिटर हातभट्टी दारू (६०० रुपये) जप्त केली.

शहरातील विविध भागांत सुरू असलेल्या कल्याण मटका जुगारावरही पोलिसांनी एकाच दिवशी सलग छापे टाकले. एसटी स्टँड शेजारील राजे टपरी परिसरातून विलास दावित रणदिवे (वय ५०, रा. सोलापूर रोड, बार्शी) याला पकडून त्याच्याकडून १६० रुपये रोख, अंक आकडे लिहिलेला कागद व बॉलपेन जप्त केले. महात्मा गांधी शॉपिंग सेंटरमागील परिसरात रविंद्र तानाजी दराडे (वय ३३, रा. खुरपे बोळ, बार्शी) हा मटका जुगार चालवत असल्याचे आढळून आले. त्याच्याकडून ३८० रुपये रोख, अंक आकडे लिहिलेली चिठ्ठी व बॉलपेन जप्त केले. जयसिमा टपरी परिसरातून प्रशांत वसंत बारंगळे (वय ४३, रा. नाळे प्लॉट, बार्शी) याच्यावर कारवाई केली. त्याच्याकडून १३० रुपये रोख व जुगार साहित्य जप्त केले. एसटी स्टँड परिसरात लालपरी हेअर स्टाईल मेन्स पार्लरजवळ सतीश गोविंद सावळे (वय ५४, रा. सावळे चाळ, सोलापूर रोड, बार्शी) याच्यावर केलेल्या कारवाईत ३५० रुपये रोख, अंक आकडे लिहिलेली चिठ्ठी व बॉलपेन जप्त केले.

सर्व कारवायांमध्ये पो.कॉ. सचिन राऊत, राहुल उदार, अविनाश पवार, अमोल माने, बाळकृष्ण मुठाळ, सोमवाड, बहिरे तसेच इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) तसेच महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.

### दहा गुन्हे दाखल असलेला ओंकार गायकवाड दोन वर्षासाठी तडीपार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

गंभीर स्वरूपाचे दहा गुन्हे दाखल असलेला ओंकार बापू गायकवाड (वय २० वर्ष , रा. ८५, नवीन विडी घरकुल, कुंभारी रोड, सोलापूर) याला सोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षांकरिता तडीपार करण्यात आले आहे.



ओंकार गायकवाड याविरुद्ध २०२२, २०२३, २०२४ आणि २०२६ या कालावधीत दागिने आणि मोबाईल चोरी करणे यासारखे एकूण १० गंभीर गुन्हे दाखल आहेत. यापैकी दोन गुन्ह्यांमध्ये न्यायालयाने त्याला दोषी ठरवून शिक्षा देखील सुनावली आहे. त्याच्या वाढत्या गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी सोलापूर लोहमार्ग पोलीस ठाण्याकडून तडीपारीचा प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त यांच्याकडे सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाची गंभीर दखल घेत तत्कालीन पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी ओंकार गायकवाड यावर सोलापूर शहर व जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपारीची कारवाई केली आहे .

### कामाचे पैसे देतो म्हणून घरी बोलावून घेत एकाला लोखंडी पाईपने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

कामाचे पैसे देतो म्हणून घरी बोलावून एका इसमाला लोखंडी पाईपने मारहाण करण्यात आली. ही घटना मोहोळ तालुक्यातील मोठी कामती येथे मंगळवारी रात्री घडली. शिवाजी तानोडे (वय ४० , वाघोली , ता मोहोळ ) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. त्याला १९ मे रोजी रात्री आठ वाजता मोठी कामती येथील विकी बाबरे यांच्या घरी बोलावून घेऊन पगार मागितल्याने अशोक बाबरे, विकी बाबरे यांनी लोखंडी पाईपने मारहाण केली. यात सर्व अंगाला मुकामार लागल्याने तो उपचारासाठी येथील शासकीय सायंकाळी स्वतः दाखल झाला.

### पैशाच्या व्यवहारातून तरुणाला मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे -**

पैसे देणे घेण्याच्या कारणावरून एका तरुणाला लोखंडी फायटरने मारहाण करून जखमी केले. अलकुंटे चौक येथील मैदानात आज सायंकाळी साडेचार वाजता ही घटना घडली हिरालाल छत्रसिंग जमादार (वय ३२, रा. बापूजीनगर ) असे जखमी तरुणाचे नाव आहे. तो आज सायंकाळी अलकुंटे चौकातील मैदानावर असताना पैशाचे व्यवहारातून त्याला निलू जयसिंग पत्तेवाले व इतर दोघांनी फायटरने मारहाण केली. यात डोक्याला जखम झाल्याने त्याला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात मित्र शितल खंडेवाले यांनी सायंकाळी दाखल केले.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील कर्मचाऱ्याला महाव्यवस्थापकांचा सुरक्षा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांनी १९.०५.२०२६ रोजी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित एका समारंभात, सोलापूर विभागातील १ कर्मचाऱ्यासह मध्य रेल्वेच्या एकूण १० कर्मचाऱ्यांना मे २०२६ महिन्यासाठीच्या सुरक्षा पुरस्काराने सन्मानित केले.

हे सुरक्षा पुरस्कार कर्मचाऱ्यांनी कर्तव्यावर असताना दाखवलेली सतर्कता, प्रसंगावधान आणि कर्तव्यनिष्ठा यांच्या सन्मानार्थ प्रदान करण्यात आले. या गुणांमुळेच गेल्या काही महिन्यांत संभाव्य अनुचित घटना टळल्या आणि रेल्वेचे सुरक्षित परिचालन सुनिश्चित झाले. प्रत्येक पुरस्कारामध्ये एक पदक, प्रशस्तिपत्र, उत्कृष्ट सुरक्षा कार्याचा गौरवपर उल्लेख आणि ३,५००/- रुपयांचे रोख बक्षीस यांचा समावेश आहे.




भारत गोरख पसले, ट्रॅक मेंटेनर (मार्ग देखभाल कर्मचारी), मलिकपेठ, सोलापूर विभाग: १४.०४.२०२६ रोजी मलिकपेठ यार्डमध्ये काम करत असताना, त्यांना तेथून जाणाऱ्या एका मालगाडीचा हॉट ॲक्सल (गाडीच्या चाकाचा धुरा गरम झालेला भाग) निदर्शनास आला. त्यांनी तात्काळ लाल सिग्नल दाखवून ती गाडी थांबवली. त्यांनी संबंधित सर्व अधिकाऱ्यांना याविषयी माहिती दिली; त्यामुळे वेळेवर योग्य ती कारवाई करणे शक्य झाले आणि एक संभाव्य अपघात टळला.

महाव्यवस्थापकांनी पुरस्कार विजेत्यांचे त्यांच्या उत्कृष्ट कर्तव्यनिष्ठा आणि सतर्कतेबद्दल अभिनंदन केले. तसेच, त्यांच्या या कृतींमुळे इतर रेल्वे कर्मचाऱ्यांनाही सतर्क राहण्याची आणि प्रवाशांची सुरक्षा व रेल्वे मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध राहण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी चंद्र किशोर प्रसाद, विविध विभागांचे इतर प्रधान विभागप्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# पंढरीच्या सेवेत मंगळवेढेकरांची अर्पणवृत्ती

## अखंड हरिनाम सप्ताहासाठी ५०० किलो शिधा साहित्य सुपुर्द

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २१ मे -**

पंढरपूर नगरीत सुरू असलेल्या अखंड हरीनाम सप्ताह व संगीत श्री संत नामदेव महाराज गाथा पारायण सोहळ्याला राज्यभरातील वारकरी, भाविक आणि भक्तगण मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहत आहेत.

संत परंपरेच्या या अध्यात्मिक सोहळ्यात मंगळवेढा शहर व तालुक्यातील वारकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि भाविकांनी दुसऱ्या टप्प्यातील तब्बल ५०० किलो प्रसाद साहित्य सुपूर्त करून भक्ती आणि समाजसेवेचा सुंदर संगम घडवून आणला आहे.

बुधवार दि. २० मे रोजी मंगळवेढा शहर व तालुक्याच्या वतीने पुरणपोळी प्रसादासाठी लागणारे साखर, गहू, हरभरा डाळ, गूळ, शेंगदाणे, तांदूळ, तूप, तेल, रवा आदी जीवनावश्यक शिधा साहित्य सोहळा समितीकडे सुपूर्त केला.




वारकरी संप्रदायात अन्नदान हे श्रेष्ठ दान मानले जाते आणि त्याच भावनेतून मंगळवेढेकरांनी हा सहभाग नोंदविला. संतांची भूमी म्हणून ओळख असलेल्या मंगळवेढ्याचा वारकरी परंपरेशी अत्यंत जवळचा संबंध आहे. संत चोखामेळा, संत दामाजीपंत यांच्या कार्यभूमीतून आजही भक्ती, सेवा आणि समर्पणाची परंपरा अखंड सुरू असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट झाले. केवळ धार्मिक कार्यक्रम म्हणून नव्हे, तर सामाजिक एकात्मता आणि मानवतेची जपणूक करणारा हा उपक्रम ठरला आहे.

**सेवेमागील सामूहिक शक्ती उल्लेखनीय**

सदर शिधा साहित्य संकलनासाठी अखिल भाविक वारकरी मंडळ पंढरपूर विभाग, मंगळवेढा तालुका व शहरातील पदाधिकारी, वारकरी परिवार तसेच अनेक दानशूर भाविकांनी मोठे सहकार्य केले. कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता अनेकांनी योगदान दिले. हीच खरी वारकरी संस्कृतीची ताकद असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### बहिणीचे फोटो फेसबुकवर टाकल्याचा जाब विचारल्याने भावावर हल्ला

**सोलापूर, दि. २१ मे-**

बहिणीचे फोटो फेसबुकवर का टाकले म्हणून विचारणाऱ्या एका भावाला तलवार व लाथाबुक्याने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना अक्कलकोट तालुक्यातील कोर्सेगाव येथे आज गुरुवारी दुपारी दोन वाजता घडली. रिजवान जमीर शेख (वय २३, रा. इंडी, जि. विजयपूर ) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. बहिणीचे फोटो फेसबुकवर टाकल्याचा जाब विचारला म्हणून रागात सिद्धू गायकवाड व इतर चार जणांनी मिळून त्याला तलवार व लाथाबुक्याने मारहाण केली. यात डोक्याला जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्याला मंद्रूपच्या आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मित्र सोहेल शेख याने सायंकाळी दाखल केले.

### सायकलवरून पडून वृध्दाचा जागीच मृत्यू

**सोलापूर, दि. २१ मे -**

सायकलवरून पडल्याने एका ६० वर्षीय वृद्ध व्यक्तीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना सोमवार पेठ येथे बुधवारी सायंकाळी पाच वाजता घडली. कैलास महाले (वय ६०, रा. सोमवार पेठ सोलापूर) असे मृत वृद्धाचे नाव असून ते बुधवारी सायंकाळी पाच वाजता सायकलवरून निघाले असताना अचानक चक्कर येऊन खाली पडले. बेशुद्धावस्थेत त्यांना शासकीय रुग्णालयात नातेवाईक मनोज महाले यांनी दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# न्यायालयाची स्थगिती; 'अतिक्रमण'चा वेग मंदावला



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे -**

महापालिका नगररचना विभागाकडून अनधिकृत बांधकाम पाडकामाची शहरात गुरुवारी तिसऱ्या दिवशी कारवाई करण्यात आली. न्यायालयात प्रकरण नसलेले पण ९६ बोगस बांधकामांमध्ये एक असलेल्या मजरेवाडी परिसरातील सहारा नगर येथील ६ मजली इमारती खालील पार्किंग मधील अनाधिकृत गाळे जमीनदोस्त करण्यात आले. त्यांना महापालिकेच्या नगररचना विभागाकडून २४ तासाची नोटीस देण्यात आली होती.

महापालिकेतून समांतर प्रक्रिया राबवून महापालिकेतील काही अधिकारी कर्मचाऱ्यांनी संगनमताने शहरातील विविध भागातील अनेक इमारतींना बोगस सही शिक्क्यासह विनानोंदीचे बांधकाम परवाने आर्थिक व्यवहार करून बहाल करण्यात आले होते. हा प्रकार उजेडात येताच केलेल्या चौकशीत मात्र प्राथमिक स्वरूपात ९६ बांधकामे बोगस परवाना असलेली आढळून आली होती. आशा बोगस आणि आणखी खूप बांधकामांवर हातोडा मारण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता. यानुसार सद्या ही कारवाई सुरू आहे. महापालिकेच्या नगररचना बांधकाम परवाना विभागाकडून महापालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या मदतीने आत्तापर्यंत या ९६ बोगस बांधकाम प्रकरणांमधील नोटीसा बजावल्यानंतर विविध भागातील ६ इमारतीमधील अनधिकृत बांधकामे, पत्रा शेड व इतर अतिक्रमण जेसीबीच्या माध्यमातून पूर्णपणे पाडण्यात आले आहे.

दरम्यान, शहरातील मजरेवाडी परिसरातील होटगी रस्त्यावरील सहारा नगर येथील सिद्दिकी यांचे जी प्लस सहा या बहुमजली इमारतीमधील पार्किंगच्या संपूर्ण जागेत बांधण्यात आलेले अनधिकृत दोन दुकान गाळे आणि इतर अनधिकृत बांधकाम जेसीबीच्या माध्यमातून पूर्णपणे जमीनदोस्त करण्यात आले. इमारत धारकांनी बांधकाम पाडण्यास विरोध करून गोंधळ केला. अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या मदतीने केवळ पार्किंग मधील अनधिकृत बांधकाम पाडत असल्याचे समजावून सांगून अवघ्या तासाभरात या इमारती खालील पार्किंगच्या जागेतील दुकान गाळे, पत्राशेड आणि इतर अनधिकृत बांधकाम पूर्णपणे पाडून पार्किंग जागा मोकळी केली.

### या इमारती आता रडारवर

आता महापालिकेच्या बांधकाम परवाना विभागाच्या, न्यायालयात न गेलेल्या आणि ९६ प्रकरणातील अनेक इमारती पाडकामासाठी टार्गेटवर असून न्यायालयाने दिलेल्या २५ मे पर्यंतच्या स्थगिती आदेशानंतर पुन्हा जोमाने कारवाई मोहीम सुरू होणार असल्याचे व सध्या न्यायालयात नसलेल्या प्रकरणातील इमारतींचे अनाधिकृत भाग पाडण्यात येणार असल्याची माहिती विभागाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.



# लाडकी बहीण अनुदान बंद; महिलांनी कडक उन्हात लावल्या रांगा

## वाहन नोंदणी, केवायसी पडताळणी प्रक्रिया

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

वाहन नोंदणी, केवायसी पडताळणी प्रक्रिया सुरु असल्याने हजारो लाडक्या बहिणींचे अनुदान रोखले आहे. आपले अनुदान का बंद झाले? याविषयी जाणून घेण्यासाठी सात रस्ता परिसरातील शोभा नगर येथील जिल्हा महिला व बालकल्याण कार्यालयसमोर महिलांनी कडक उन्हातही रांगा लावल्याचे दिसून आले.

राज्य शासनाच्या वतीने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेतंर्गत महिलांना दरमहा १५०० रुपये अनुदान दिले जाते. दरम्यान, शासनाने लाभार्थ्यांची



छाननी मोहीम हाती घेतली असता केवायसी अपूर्ण असणे, कुटुंबाच्या नावावर दुचाकी किंवा चारचाकी वाहन आढळणे, इतर शासकीय निकषांमुळे अनेक लाभार्थी अपात्र ठरल्याचे समोर आले आहे.

अचानकपणे अनुदान बंद झाल्याने संत्रस्त व संभ्रमित झालेल्या लाडक्या बहिणी जिल्हा महिला व बालकल्याण कार्यालयकडे धाव घेत संताप व्यक्त करीत आहेत. 'आमचे पैसे का बंद झाले? पुन्हा सुरु करण्यासाठी काय करावे लागेल? अपात्र ठरविण्याआधी आम्हाला का कळविले नाही? यांसारख्या प्रश्नांची सरबत्ती करीत असल्याचे दिसून आले.

### प्रक्रिया, छाननी, दाखला

'केवायसी'संदर्भात राज्य शासनाकडून दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. ज्यांनी वेळेत प्रक्रिया पूर्ण केली, त्यांचे अनुदान सुरु आहे. छाननीत वाहनधारक कुटुंबे किंवा इतर निकषांमध्ये न बसणाऱ्या लाभार्थ्यांचे पैसे थांबविण्यात आले आहेत. ज्या महिलांचे लाभ बंद झाले आहेत, त्यांना संजय गांधी किंवा इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ यांसारख्या इतर योजनांचा लाभ घेण्यासाठी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळत नसल्याचा दाखला देण्यात येत आहे, असे जिल्हा महिला व बालकल्याण कार्यालयाचे अधिकारी अविनाश मगर यांनी सांगितले.

### कागदपत्रांसाठी धावपळ

राज्य शासनाच्या निकषानुसार कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी लाडकी बहिणींची चांगलीच धावपळ होत असल्याचे दिसून येत आहे. भर उन्हात घर ते शोभा नगर येथील कार्यालयपर्यंत ये-जा करताना दमछाक होत असल्याचे काही महिलांकडून सांगण्यात आले.

# कलाकारांच्या सूचनेनुसार नाट्यगृह उभारणार : आ. देशमुख



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

जुळे सोलापूर येथे उभारण्यात येणाऱ्या प्रस्तावित नाट्यगृहाच्या संदर्भात आमदार सुभाष देशमुख यांनी सोलापूरातील विविध नाट्य कलाकार, दिग्दर्शक, साऊंड-लाईट तज्ज्ञ आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांशी सविस्तर चर्चा केली. कलाकारांनी दिलेल्या सूचनांनुसारच सोलापुरात अत्याधुनिक आणि दर्जेदार नाट्यगृह उभारले जाईल, असे देशमुख यांनी स्पष्ट केले.

या बैठकीत कलाकारांनी पुणे आणि मुंबई येथील आधुनिक नाट्यगृहांच्या धर्तीवर सोलापुरातही अत्याधुनिक सुविधा असलेले नाट्यगृह उभारण्याची मागणी केली. ध्वनी आणि प्रकाश व्यवस्था, प्रशस्त आसन क्षमता, डिजिटल तंत्रज्ञान, कलाकारांसाठी स्वतंत्र ग्रीनरूम, सरावासाठी जागा तसेच पार्किंग सुविधा यांसारख्या बाबींवर विशेष चर्चा करण्यात आली. बैठकीला महापालिकेचे प्रकाश दिवाणजी, आर्किटेक्ट चिंचोली तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. नाट्यगृहाच्या आराखड्याबरोबरच आर्थिक व्यवहार्यता, बांधकाम खर्च आणि भविष्यातील देखभाल याबाबत अधिकाऱ्यांनी माहिती दिली. सांस्कृतिक चळवळीला चालना देणारे आणि कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारे नाट्यगृह साकारण्याचा प्रयत्न राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

नाट्य आणि सांस्कृतिक क्षेत्रातील विजय साळुंखे, जे. पी. कुलकर्णी, अमोल देशमुख, जैद शेख, डॉ. मीरा शेंडगे, शांता येळमकर, नरेंद्र गंभीरे, शिरीष देखणे आणि देवदत्त सिद्धम यांच्यासह विविध कलाकार व तज्ज्ञ उपस्थित होते.



# विश्व हिंदू परिषदद्वारा हितचिंतक नोंदणी अभियान

## संघटन महामंत्री मिलींद परांडे यांनी साधला मान्यवरांशी संवाद

### ग्रामदैवत सिध्दरामेश्वर मंदिरास भेट व दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

विश्व हिंदू परिषदेचे समाजात सर्वत्र व्यापक संपर्कासाठी हितचिंतक नोंदणी अभियान नजीकच्या काळात होणार असून सर्व कार्यकर्त्यांनी हे अभियान प्रभावीपणे राबवावे, असे आवाहन विहिंपचे केंद्रीय संघटन महामंत्री मिलींद जी परांडे यांनी केले.

लातूर येथे विहिंपच्या संघटनात्मक प्रवासानिमित्त परांडे यांचे सोलापुरातील अंत्रोळीकर नगर भागात विहिंपचे जिल्हाध्यक्ष विष्णू मोंढे यांच्या निवासस्थानी काही काळ वास्तव्य होते. यावेळी अनेक मान्यवरांनी त्यांची भेट घेतली. या भेटीत संवाद, परिचय आणि चर्चा झाली. हिंदू धर्माचा गौरवशाली इतिहास, विश्व हिंदू परिषदेची स्थापना व कार्यपद्धती याविषयी त्यांनी माहिती दिली. हिंदू समाजात सक्षम व संस्कारित व्यावसायिक निर्माण करण्याची आवश्यकता असून, कुटुंब प्रबोधन, हिंदू समाजाच्या लोकसंख्येत घट, लँड जिहाद, हिंदू अस्मिता व धर्मरक्षणासाठी प्रत्येकाने सक्रियपणे व समर्पित भावनेने धर्मकार्यात सहभागी होण्याची गरज याविषयी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सामाजिक समरसता, संघटन विस्तार, सेवा कार्य, युवक सहभाग व आगामी उपक्रमांच्या अनुषंगानेही त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले, अशी माहिती विहिंपचे विभाग मंत्री विजयकुमार पिसे यांनी दिली. हिंदू समाजात व्यापक संपर्क, संवादासाठी दर तीन वर्षांनी विहिंपचे हितचिंतक नोंदणी अभियान होते. नजीकच्या काळात हे अभियान होणार असून यासंदर्भात केंद्र व प्रांत स्तरावरून मार्गदर्शक सूचना येतील, असेही त्यांनी सांगितले.

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर मंदिरास परांडे यांनी भेट देऊन दर्शन घेतले. मंदिर परिसर पाहणीत सुवर्ण सिध्देश्वर प्रकल्प बांधकाम व अन्य उपक्रमांची माहिती घेतली. मंदिराचे वतीने सुरू असलेले धार्मिक, सामाजिक व सेवा उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी संस्थेच्या धार्मिक, सामाजिक, वैद्यकीय व शैक्षणिक कार्य, संस्कृत वैदिक शाळा, श्री सिद्धेश्वर अध्ययन केंद्र व ग्रंथालयाविषयी माहिती दिली.

यावेळी पंचकमिटीचे उपाध्यक्ष सिध्देश्वर बमणी, विश्वस्त नीलकंठप्पा कोनापुरे, बाळासाहेब भोगडे, गिरीश गोरनळ्ळी, पशुपतीनाथ माशाळ, विलास कारभारी, प्रकाश बिराजदार, रतन रिक्के, प्रभुराज मैंदर्गीकर, सिध्देश्वर कारखान्याचे अध्यक्ष पुष्पराज काडादी, शरणराज काडादी, तसेच विहिंपचे कर्नाटक प्रांत अध्यक्ष लिंगराज अप्पा, धर्माचार्य प्रांत सहसंपर्क प्रमुख नागनाथ बोंगरगे, जिल्हा अध्यक्ष विष्णू मोंढे, उपाध्यक्ष अ‍ॅड.केदार पाटील, जिल्हा मंत्री जयदेव सुरवसे, सहमंत्री बापू कदम, बाबू गिरगल, विभाग सहमंत्री संजयकुमार जमादार, बजरंग दल संयोजक अभय कुलथे आदी उपस्थित होते.



# लाडकी बहीण योजनेस स्व. अजितदादा यांचे नाव द्या

## वर्ल्ड ऑफ वुमन संस्थेची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

विधानसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रात लोकप्रिय ठरलेली लाडकी बहीण योजना तात्कलिन उपमुख्यमंत्री तसेच अर्थमंत्री अजित पवार यांनी जून २०२४ मध्ये घोषणा करून त्याची अंमलबजावणी केली. या योजनेचे सर्व श्रेय स्व.अजितदादानाच जाते. त्यामुळे या योजनेस स्व. अजितदादा पवार लाडकी बहीण योजना असे नाव देण्यात यावे, अशी मागणी वर्ल्ड ऑफ वुमन या संस्थेच्या वतीने राज्यातील उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना केली. लेखी निवेदनाद्वारे संस्थेच्या अध्यक्षा विद्या लोलगे यांच्या नेतृत्वाखालील महिला शिष्टमंडळाने ही मागणी केली.

या योजनेमुळे राज्यात पुन्हा सत्ता प्राप्त करण्यात सुलभता झाली. ही योजना गेम चेंजर ठरली आहे.

राज्यातील लाखो गरीब महिलांना आर्थिक आधार लाभला आहे. राज्यभरातील लाखो महिला-भगिनी स्व. अजितदादा ना आशीर्वाद, दुवा देत आहेत. त्यामुळे या योजनेस स्व. अजितदादा पवार लाडकी बहीण योजना असे नामकरण करणे हीच अजितदादांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली ठरेल


संजय गांधी निराधार योजनामार्फत दरमहा रुपये १५००/- च दिले जातात ते सुद्धा वेळेवर दिले जात नाहीत. ही रक्कम सध्याच्या महागाईत फारच तुटपुंजी आहे, अेसही सांगण्यात आले.

यावेळी मनीषा नलावडे, सायरा शेख, कांचन चौगुले, लक्ष्मी माने, शोभा गायकवाड, पुष्पा हलकुडे, स्वाती मुकणार, मारता असादे, शबाना शेख, शारदा मसूती, प्रिया कुलकर्णी, वंदना चंदनशिवे, सारिका लामतुरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीप्रणित महिला आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.




सोलापूर : वाहनचालकाच्या बेशिस्तीपणामुळे मेकॅनिक चौक ते शिवाजी चौक या मार्गावर वाहतुकीची अशी कोंडी झाली होती. (छायाचित्र - केवल तिवारी)







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### चोरी करताना हटकल्याने डोक्यात घातली रॉड

**सोलापूर, दि.२१ मे-**

चोरी करताना हटकल्याने एकास लोखंडी रॉडने मारून जखमी केल्याप्रकरणी शेजारच्या तरुणाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धिरज सिंगे (रा. भवानी पेठ, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत अमित सुभाषचंद्र बिराजदार (रा. गुजर वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी व त्याचा मित्र त्रिलोक, मुकेश असे मिळुन मुकेश याचा वाढदिवस असल्याने त्याचे घरी गुजर वस्ती येथे दि. १६ मे रोजी पहाटे १.३० वा चे सुमारास दारु पित बसले होते . त्यावेळी शेजारी राहणारा यातील वरील आरोपी धिरज सिंगे हा चोरीच्या उद्देशाने यातील फिर्यादीच्या बहिणीच्या घरात डोकावत होता . त्यावेळेस फिर्यादी व मित्रांनी आरोपीला पकडत असताना तो तावडीतुन पळुन जाण्याचा प्रयत्न करत होता . तेव्हा त्यास विचारले असता चोरी करण्यासाठी आल्याची कबुली दिली. यादरम्यान आरोपीने त्याचे घरी जावून घरातुन लोखंडी रॉड आणुन फिर्यादीचे कपाळावर मारुन जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार पैकेकरी हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### कर्ज फेडण्यासाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ

**सोलापूर, दि.२१ मे-**

घर दुरुस्तीसाठी झालेले खर्च व कर्ज फेडण्यासाठी आठ लाख रुपये आण म्हणून व सोलापूर शहरात प्लॉट घेऊन दे म्हणून एका विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी ठाणे येथील एका पतीसह पाच जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पती- अकबर मकानदार, दौलतबी मकानदार, चांदसाब मकानदार, फरजाना शेख आणि यास्मीन पटेल ( सर्व रा.रितु वर्ल्ड कॉम्प्लेक्स, डि मार्ट जवळ, बॅरेज रोड, बदलापुर, ठाणे ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत शाहिन अकबर मकानदार (रा. ३७/२, मदनी नगर, विजापूर रोड, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी दि. २० मे २०२२ रोजी पासुन ते १६ जून २०२५ रोजी दरम्यान सासरी नांदत असताना वरील आरोपींनी मिळून फिर्यादीस वेळोवळी घराचे दुरुस्तीसाठी झालेल्या खर्चापोटी व लोन फेडण्यासाठी आठ लाख रु घेवून ये व सोलापूर येथे नवीन प्लॉट घेवून दे या कारणावरुन शिवीगाळ मारहाण तसेच मानसिक व शारीरीक छळ करुन उपाशी पोटी ठेवून जाचहाट केला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार घुगे हे गुण्याचा पुढील तपास करीत आहेत.

### खंडाळीचे अविनाश पाटील यांना पुणे आकाशवाणीची बी ग्रेड

**सोलापूर, दि.२१ मे-**

खंडाळी (ता.मोहोळ) येथील युवा पिढीतील प्रसिद्ध तबला वादक अविनाश पाटील यांना प्रसार भारती नवी दिल्ली यांच्या पुणे आकाशवाणीची मान्यताप्राप्त कलाकार म्हणून बी ग्रेड मिळाली आहे. नुकतेच त्यांना हे पत्र पुणे आकाशवाणी कडून प्राप्त झाले. पाटील हे पं. दादासाहेब पाटील व पं.उमेश मोघे यांचे शिष्य आहेत. भारतासह परदेशातही त्यांनी तबला वादनाचे अनेक कार्यक्रम सादर करुन रसिकांची दाद मिळवली आहे तसेच आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या अनेक कलाकारांना साथ संगत दिली आहे.



# विधानपरिषद निवडणूक; इच्छुकांचे लॉबिंग सुरु, पक्षश्रेष्ठींच्या निर्णयाकडे लागले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेवर निवडून द्यायच्या सोलापुरातील एका जागेसाठी इच्छुकोंचे लॉबिंग सुरु असल्याचे दिसून येत आहे. पक्षश्रेष्ठींचा निर्णय अंतिम असणार असल्याने याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. 'भाजपा'कडून माजी आमदारद्वय प्रशांत परिचारक, राम सातपुते, राजेंद्र राऊत, राजन पाटील यांच्यासह जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, युवा चेहरा म्हणून परिचित असलेले रोहन देशमुख यांच्या नावांची चर्चा आहे.

सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भारतीय जूनता पार्टी आणि मित्रपक्षांचे अर्थात 'महायुती'चे स्पष्ट संख्याबळ असल्याने ही जागा भारतीय जनता पार्टीकडे जाणार हे निश्चित मानले जात आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे पंढरपूर दौऱ्यावर आले असता प्रशांत परिचारक








लवकरच विधीमंडळात दिसतील, असे सूचक वक्तव्य केले होते. त्यांनी यापुर्वी दोनवेळा माघार घेतले होते. त्यामुळे यंदा परिचारक यांना रिटर्न गिफ्ट मिळू शकते, असे बोलले जात आहे.

तर इकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय म्हणून मानले जाणारे माजी आमदार राम सातपुते यांचेही नाव चर्चेत आहे. संघटनात्मक कामातून पुढे आलेले सातपुते यांचे पक्षात चांगले वजन आहे. मात्र नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद पदाधिकारी निवडीत त्यांच्या पत्नीला महत्त्वाचे पद मिळाल्याने पुन्हा त्यांनाच संधी दिली जाते का? याबाबत तर्कवितर्क लढविले जात आहेत.

दुसरीकडे बार्शी कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी नगरपालिका, बार्शी पंचायत समिती आणि सोलापूर जिल्हा परिषद निवडणुकांत पक्षाला मोठे यश मिळवून दिलेले माजी आमदार राजेंद्र राऊत यांचाही दावा मजबूत मानला जात आहे. स्थानिक पातळीवर त्यांनी निर्माण केलेली ताकद आणि संघटनात्मक पकड ही त्यांची जमेची बाजू मानली जाते. मात्र जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद बार्शी तालुक्याला दिल्यामुळे त्यांची निवड केली जाणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

माजी आमदार राजन पाटील यांनी अनगर नगरपंचायतीची निवडणूक बिनविरोध करून आपली ताकद दाखवून दिली आहे. त्यामुळे त्यांचे नावही संभाव्य उमेदवारांमध्ये घेतले जात आहे. मात्र ते नुकतेच भाजपात आल्याने त्यांना संधी मिळेल की नाही? याबद्दल शंका-कुशंका व्यक्त केली जात आहे. संघटनेतून पुढे आलेले नेतृत्व म्हणून भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनाही संधी मिळू शकते, अशीही चर्चा आहे.

दरम्यान, आमदार सुभाष देशमुख यांना मंत्रीमंडळात आणि त्यांचे चिरंजीव रोहन देशमुख हे तुळजापूर विधानसभा मतदार संघातून इच्छुक असताना त्यांनाही संधी दिली गेली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे दिग्गज नेते सोलापूर दौऱ्याप्रसंगी आ.सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानी भेट दिली होती. यांसारख्या बाबींचा विचार करता रोहन देशमुख या युवा चेहऱ्याला संधी मिळू शकते, असेही राजकीय वर्तुळातून बोलले जात आहे.

#### अंतर्गत नाराजी?

जातीय समीकरण, संघटनात्मक ताकद, स्थानिक प्रभाव आणि आगामी राजकीय गणित लक्षात घेऊनच उमेदवार निश्चित केला जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. उमेदवारी निवडीच्या कारणावरुन भारतीय जनता पार्टीत अंतर्गत नाराजी निर्माण होऊ नये. यासाठी पक्षश्रेष्ठी सर्व बाजूंचा विचार करुन ऐनवेळी उमेदवारी जाहीर करतील, असेही सांगण्यात येते.

## होय, आम्ही झुरळ! युवा महासंघाने काढला मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मे-**

देशातील कोट्यवधी युवक-युवती शिक्षण, रोजगार, महागाई, कंत्राटीकरण, पेपरफुटी, खासगीकरण आणि असुरक्षित भविष्य अशा असंख्य संकटांशी झुंज देत आहेत. अशा परिस्थितीत देशाच्या न्याय व्यवस्थेतील सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीकडून युवकांची तुलना झुरळांशी करण्यात केली. त्यामुळे होय! आम्ही झुरळ असे फलक हाती घेऊन भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघाने जिल्हाधिकारी कार्यालयवर आक्रमक मोर्चा काढला.

युवा महासंघाचे केंद्रीय समिती सदस्य ॲड.अनिल वासम याप्रसंगी बोलताना म्हणाले, हा केवळ शब्दांचा प्रश्न नाही; हा देशातील तरुण पिढीच्या



स्वाभिमानावर केलेला घाव आहे. कारखान्यात राबणारा कामगार युवक, शेतात घाम गाळणारा शेतकरी युवक, स्पर्धा परीक्षांसाठी आयुष्य झिजवणारा विद्यार्थी आणि बेरोजगारीशी झुंज देणारा पदवीधर हे झुरळ नसून भारताच्या प्रगतीचे खरे शिल्पकार आहेत.

संबंधित न्यायाधीशांनी देशातील युवकांची जाहीर माफी मागावी, सर्वोच्च न्यायालयाने या वक्तव्याबाबत अधिकृत स्पष्टीकरण द्यावे, युवकांविषयी अपमानास्पद भाषा वापरणाऱ्या घटनांची गंभीर दखल घ्यावी, सरकारने युवकांच्या प्रश्नांवर तातडीने सर्वपक्षीय बैठक बोलावून रोजगार, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षेबाबत ठोस धोरण जाहीर करावे आदी मागण्या यावेळी मांडण्यात आल्या. निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी आंदोलनकर्त्यांना चर्चेसाठी पाचारण केले. युवा महासंघाचे जिल्हाध्यक्ष विक्रम कलबुर्गी यांच्या नेतृत्वाखाली निवेदन सादर करण्यात आले. निवेदनासोबत प्रतीकात्मक झुरळाची प्रतिमाही देण्यात आली. या आंदोलनात युवा महासंघाचे राज्य सचिव दत्ता चव्हाण, जिल्हा कोषाध्यक्ष बाळकृष्ण मल्याळ, राज्य समिती सदस्य विजय हरसुरे, अश्विनी मामड्याल, नरेश गुल्लापल्ली, अभिजित निकंबे, दिनेश बडगु, चंटी बिटला, राधागोपाल बंडी आदी सामील झाले होते.

## इंधनदरवाढ, वाढते आर्थिक संकट; बैलगाडी प्रवास. प्रतिकात्मक आंदोलन




#### उद्योगपती, नेत्यांनाही त्याग करायला भाग पाडा

#### देशहिताच्या ऐवजी निवडणुकांना प्राधान्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

आप सोलापूर शहरच्या वतीने महागाई, इंधनदरवाढ आणि वाढत्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर मोफत बैलगाडी प्रवास असे प्रतिकात्मक आंदोलन करण्यात आले. आपचे सोलापूर शहर अध्यक्ष निलेश संगेपाग यांच्या नेतृत्वात सर्वसामान्य नागरिकांवर वाढत्या इंधनदरांचा आणि महागाईचा होत असलेला परिणाम अधोरेखित करण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.

आंदोलनादरम्यान पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी बैलगाडीतून प्रवास करत केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांविरोधात घोषणाबाजी केली. तसेच विविध आशयघन फलक हातात घेऊन सरकारकडे सर्वसामान्यांचा आवाज पोहचवण्याचा प्रयत्न केला .

यावेळी शहर अध्यक्ष निलेश संगेपाग यांनी आधीच आपल्या सरकारने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यास विलंब केला देशहिताच्या ऐवजी निवडणुकांना प्राधान्य दिले ज्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे आता आणखीन विलंब न करता देशहितासाठी मोदीजींनी त्यांची ५६ इंच ची छाती ट्रम्प यांना दाखवून द्यावं आणि देशहितासाठी कठोर ठाम भूमिका घ्यावी आजवर अनेक उद्योगपतींना सरकारने दिलासा दिलेला आहे आता फक्त जनतेलाचा त्याग करायला भाग पाडू नका तर उद्योगपतींना आणि नेत्यांना हि त्याग करायला भाग पाडा असे मत व्यक्त केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष एम पाटील, माजी शहर उपाध्यक्ष श्रीकांत वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष प्राजक्त चांदणे, मल्लिकार्जुन पिलगेरी, सुचित्रा वाघमारे, रहीम शेख, रॉबर्ट गौडर, बसवराज सारंगमठ, मदणी चाचा, प्रसाद बाबानगरे, आदी उपस्थित होते.

## शनिवारी नाभिक समाज वधू-वर मेळावा, सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे**

महाराष्ट्र नाभिक महामंडळ, शाखा सोलापूरच्या वतीने शनिवार दि. ३ मे २०२६ रोजी सोलापुरातील ॲचिव्हर्स हॉल येथे नाभिक समाजाचा वधू-वर पालक परिचय मेळावा, सामुदायिक विवाह सोहळा आणि गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती उपाध्यक्ष वैभव शेटे, जिल्हाध्यक्ष संजय चिकले यांनी पत्रकार परिषदेत दिली. सकाळी ११ वाजता होणाऱ्या वधू-वर पालक परिचय, 'शिवयोग' वधू-वर परिचय पुस्तिकेचे प्रकाशन आणि आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असलेल्या व्यक्तींना पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. सायंकाळी ६ वाजता सामुदायिक विवाह सोहळा होणार आहे.

अश्विनी तडवळकर (कला गौरव), मंगेश चिवटे (शिक्षक-मित्र), प्रा.डॉ. बापूसाहेब आडसूळ (शिक्षक भूषण'), संजय चिकले (जीवन गौरव), बापूराव चव्हाण (ज्ञानज्योती गौरव), राम डिंगे (समाजभूषण), सुरेश शिंदे (जीवन गौरव), किरण भांगे, शिवशरण सुरवसे, सुदर्शन विभुते यांना (समाजरत्न) यांना पुरस्कार दिले जाणार आहे. याप्रसंगी खासदार प्रणिती शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस श्रीकांत राऊत, आनंद वाघमारे, बापूराव काळे, संदीप पवार, मनोज डिगे, सहदेव वाघमारे, प्रदीप मोरे, संजय चिकले आदी उपस्थित होते.

#### 'तरुण भारत' यू-ट्यूब चॅनलच्या अश्विनी तडवळकर यांचा समावेश



नाट्य कलावंत आणि गेले अनेक वर्ष पत्रकारितेत कार्य करणाऱ्या दैनिक तरुण भारतच्या डिजिटल विभाग प्रमुख अश्विनी अमीर तडवळकर राज्य शासनाच्या दिव्यांग नाट्य स्पर्धेत अंध मुलांना आणि मूकबधिर मुलांना नाट्य प्रशिक्षण, राज्य नाट्य स्पर्धेत दिग्दर्शन व अभिनयाचे ९ रौप्य पदके, अंध व मूकबधिर मुलांना नाटक शिकवणे ही साधना गेले अनेक वर्षे त्या करत आहेत.

### कट मारल्याच्या कारणावरून दोघांना बेदम मारहाण; तिघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. २१ मे-**

किरकोळ कारणावरून दोन युवकांना दगड, लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणी तिघांविरोधात बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. उबेद तांबोळी (वय-१८, रा.बालाजी कॉलनी, सोलापूर रोड, बार्शी) यांच्या फिर्यादीनुसार, दि. १५ मे रोजी रात्री ९ वाजता ते व त्यांचा मित्र साईम सय्यद हे दोघेजण क्षीरसागर टर्फ येथे क्रिकेट खेळण्यासाठी गेले होते. परत येत असताना पाठीमागून आवाज दिल्याने त्यांनी गाडी रस्त्याच्या कडेला थांबवली. त्यावेळी रेहान बाबुडे व यासिर तुटके (दोघे रा. बारंगुळे प्लॉट, बार्शी) हे त्यांच्याजवळ आले. तू आम्हाला कट का मारलास? असा जाब विचारत त्यांनी उबेद तांबोळी व साईम सय्यद यांना मारहाण करण्यास सुरुवात केली.

आरोपींनी त्यांचा मित्र शोएब मिर्झा (रा. मेहदी नगर, बार्शी) याला घटनास्थळी बोलावून घेतले. यावेळी रेहान बाबुडेने दगड उचलून उबेदच्या पाठीवर तसेच साईम सय्यदंच्या बरगडीवर मारून जखमी केले. तिघांनी शिवीगाळ करत जीवे ठार मारण्याची धमकी दिली. आरडाओरडीनंतर अमन जिकरे, रिजवान तांबोळी व इतरांनी घटनास्थळी धाव घेत भांडण सोडवले.

## महापालिका सभागृह ठंडा, ठंडा... कुल, कुल...

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

यंदाचा उन्हाळा अतिशय कडक असून सोलापूर महापालिकेच्या कै.यशवंतराव चव्हाण सभागृहात सभेच्या वेळी उकाडा मोठ्या प्रमाणात जाणवते. ही बाब लक्षात घेऊन या सभागृहात नवीन वातानुकूलित (एसी) यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. रखरखत्या उन्हात आता सभागृह ठंडा.. ठंडा.. कुल.. कुल.. झाले होते.

महापालिका सर्वसाधारण सभेमध्ये नगरसेवक अनंत जाधव यांनी सभागृहात वातानुकूलित यंत्रणा बसविण्याची सूचना केली होती. यासंदर्भात महापौर विनायक कोंड्याल यांनी तातडीने कार्यवाहीचे आदेश महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांना दिले होते. त्यानुसार विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, अभियंता महादेव इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वातानुकूलित (एसी) यंत्रणा बसविण्यात आली.

आजच्या महापालिका सभेसाठी सभागृहात ही नवी



वातानुकूलित यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. यामुळे सभागृहातील वातावरण थंडगार झाले होते. सभागृहात वातानुकूलित यंत्रणामुळे थंडगार वातावरण असल्याने उपस्थित सर्व सदस्यांनी समाधान व्यक्त केले. दरम्यान, सभागृहनेते नरेंद्र काळे यांनी या नव्या यंत्रणेची पाहणी केली. यावेळी नगरसेवक अनंत जाधव, व्यंकटेश कोंडी, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, अभियंता महादेव इंगळे आदी उपस्थित होते.

#### २१.५ लाख खर्चातून बसविले १४ एसी

सोलापूर महापालिकेच्या सभागृहात तीन टनाचे एकूण १२ टॉवर एसी (वातानुकूलित यंत्रणा) आणि दोन टन क्षमतेचे दोन स्प्लिट एसी असे एकूण ४० टन क्षमतेचे एकूण १४ एसी बसविण्यात आले आहेत. डायकिन कंपनीची ही वातानुकूलित यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. यासाठी एकूण २१ लाख ५० हजार रुपये केबलसह खर्च झाला आहे.

#### सर्वांना थंड करण्यात भाजपा माहीर

महापालिका सभागृहात वातानुकूलित यंत्रणा कार्यान्वित झाल्याने थंडगार वातावरण झाले होते. हे पाहून सर्वांना थंड करण्यात सत्ताधारी भाजपा माहीर असल्याची मिस्कील टिपणी काही सदस्यांनी केली. यावर उपस्थित सदस्यांमधून हास्याचे फवारे उडाले.

## आंब्यांच्या सजावटीत खुलला साई दरबार

#### श्री साई श्रध्दा संस्थेच्या वतीने आंबा महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मे-**

पूर्वभागातील भद्रावती पेठ येथील श्री साई श्रद्धा संस्था, साई दरबार येथे प्रथमच आयोजित करण्यात आलेला आंबा महोत्सव भक्तांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात आणि भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. गुरुपुष्य अमृत योगाच्या शुभमुहूर्तावर पार पडलेल्या या महोत्सवाने अनोखा आध्यात्मिक अनुभव मिळाल्याचे साईभक्तांतून सांगण्यात आले.

या महोत्सवानिमित्त श्री साईबाबांच्या दरबाराची विविध प्रकारच्या आंब्यांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. रंगीबेरंगी आणि सुगंधी आंब्यांनी सजलेला साई दरबार भक्तांसाठी विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. सकाळपासूनच साई दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. भक्तांनी साईंचे



दर्शन घेत भक्तिभावाने प्रार्थना केली.

महोत्सवादरम्यान धार्मिक कार्यक्रम, पूजा-अर्चा, भजन तसेच आरतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित भाविकांना प्रसादाचेही वितरण करण्यात आले. संपूर्ण परिसर साईनामाच्या गजराने आणि भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. महोत्सवाच्या माध्यमातून भक्तांमध्ये श्रध्दा, भक्तीभाव आणि अध्यात्मिक ऊर्जा अधिक दृढ व्हावी, हा प्रमुख उद्देश आहे. प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक होता.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तीन गावातील २३ वाड्या-वस्त्यांना तीन टँकर सुरु

### दररोज १ लाख २२ हजार लिटर पाणी पुरवणार

**माळशिरस, दि.२१ मे-**

माळशिरस तालुक्यातील कदमवाडी, गारवाड, मगरवाडी या तीन गावांतील २३ वाड्यावस्त्यांना पाणी पुरवठा केला जाणार आहे. आज सदरचे टँकर त्या त्या गावांना रवाना होणार असल्याची माहिती पंचायत समितीचे पाणी पुरवठा उपअभियंता जे.व्ही. सदावरे यांनी दिली.

कदमवाडी येथील गावठाण, भोसले वस्ती, कदमवस्ती, मजगे वस्ती, पाववस्ती, जुनी वाडी, इंगळे वस्ती, चवंडी या आठ वस्त्यावर २५ हजार लीटर क्षमतेच्या टँकरच्या दोन खेपा दररोज करण्यात येणार आहेत. गारवाड येथील गावठाण, बाबरवस्ती, चिकाटे वस्ती, सुळकी शेत, रानमळा, राऊत वस्ती, पाटील वस्ती, शिंगटे वाटी, या आठ वस्त्यावर २४ हजार लिटर क्षमतेच्या टँकरच्या दोन खेपा दररोज करण्यात येणार आहेत. मगरवाडी येथील नाम देव धोंडी वस्ती, रेणुकाताई पाटील वस्ती, लोंढे वस्ती, पाटील वस्ती, भंडार मुळा, कुंबर मळा या सात वस्त्यावर २४ हजार लिटर क्षमतेच्या टँकरची रोज एक खेप दररोज करण्यात येणार आहेत .

यापूर्वी पळसमंडळ, सुळे वाडी, पिंपरी या तीन ठिकाणी टँकर सुरू असून आता तीन टँकर असे सहा टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. यावेळी शाखा अभियंता ए.एन,आंबले, जे व्ही.घोळवे, वरिष्ठ सहाय्यक एस .आर,करांडे. सहा. स्थापत्य अभियंता एस आर मोरे आदी उपस्थित होते.

## महत्त्वाचे...



### विश्वेश्वर एम्पॉवरमेंट ऑर्गनायझेशनतर्फे बसव उद्योजक पुरस्कारांचे वितरण

**अक्कलकोट दि .२१ मे -**

लिंगायत समाजातील उद्योजकांची संघटना असलेल्या विश्वेश्वर एम्पॉवरमेंट ऑर्गनायझेशन, इंडियाच्या वतीने १० जणांना 'बसव उद्योजक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष अनिल मंद्रुपकर यांच्या नेतृत्वाखाली नुकताच हा सोहळा पार पडला. अक्कलकोट येथील लायन्स इंटरनॅशनलचे माजी प्रांतपाल राजशेखर कापसे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण केले. यावेळी व्यासपीठावर संघटनेचे महासचिव गणेश बिराजदार, सचिव अमित पाटील आदी उपस्थित होते. यावेळी राज मिरजे, आनंद बेल्लाड, ऋषिकेश शेरकर, गणेश माळी, सीए हनुमंत राव, प्रियांका हापसे, राहुल जिगजीणी, समीर साखरे, विजय लिंगायत यांना 'बसव उद्योजक पुरस्कार' प्रदान केला. तसेच अनिल मंद्रुपकर यांना दिल्ली येथे मानाचा अटल सेवा पुरस्कार व फ्रान्स येथील थीम इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीकडून डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल जाहीर सत्कार करण्यात आला. राजशेखर कापसे यांनी विश्वेश्वर एम्पॉवरमेंट ऑर्गनायझेशनच्या कार्याचे कौतुक केले. विश्वेश्वर एम्पॉवरमेंट ऑर्गनायझेशन युवकांमध्ये उद्यमशीलता रुजावी,यासाठी कार्यरत असल्याचे अनिल मंद्रुपकर यांनी नमूद केले. गणेश बिराजदार यांनी आभार मानले.

### एकता महिला मंचचा जिल्हाभरात महा-वृक्षारोपणाचा संकल्प

**वैराग, दि २१ मे -**

एकता महिला मंच, सोलापूर जिल्हातर्फे जागतिक पर्यावरण दिनी महा-वृक्षारोपण संकल्प सोडण्यात आला आहे. ५ जून रोजी संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात भव्य वृक्षारोपण आणि वृक्षसंगोपन मोहीम राबवण्यात येणार आहे. गेली ३ वर्षे हा वृक्षारोपणाचा उपक्रम केवळ बार्शी तालुक्यापुरता मर्यादित होता. तिथे सर्व महिलांच्या सक्रिय सहभागामुळे मोहिमेला अभूतपूर्व यश मिळाले. बार्शीतील या यशानंतर आता या व्यापक उपक्रमाला अधिक बळ देण्यासाठी एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली या वर्षापासून हा उपक्रम संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर राबवण्याचा संकल्प केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील ज्या ज्या गावांमध्ये एकता महिला मंचचे ग्रुप कार्यरत आहे, तिथे महिला सदस्यांच्या संख्येनुसार विविध प्रकारची (औषधी, सावली देणारी व फळझाडे) मंचच्या वतीने स्वतःहून मोफत उपलब्ध करून दिली जातील. ।पल्याला फक्त झाडे लावून थांबायचे नाही, तर लावलेली झाडे वर्षभर काळजीपूर्वक जगवायची हाच या मोहिमेचा मुख्य संकल्प असल्याचे प्रभाकर क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

### बार्शीतील महाराष्ट्र विद्यालयचे दोन्ही शिष्यवृत्ती परीक्षेत दमदार यश

**बार्शी,दि.२१ मे -**

सन २०२५-२६ इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेचा महाराष्ट्र विद्यालय,बार्शीचा उत्तम लागला. परीक्षेस बसलेल्या १८२ विद्यार्थ्यांपैकी ७९ विद्यार्थी पात्र झाले. आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत बसलेल्या २५४ विद्यार्थ्यांपैकी ९६ विद्यार्थी पात्र झाले आहेत. इयत्ता पाचवीसाठी एस.डब्ल्यू. करंजकर, एस. एस. पाटील, पी. एस. जाधव, ए. आर. जाधव, जे.एम. तोगे, व्ही.डी. चव्हाण, एस.एस. शेळके व व्ही.बी. पवार यांचे मार्गदर्शन लाभले. इयत्ता आठवीसाठी एस.एम. डिसले, देशमुख एस. ए., जुगदार पी. सी. व पवार ए.व्ही. यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, संस्थेचे सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी.टी.पाटील, सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य ए.पी. देबडवार, खजिनदार जे.सी. शितोळे, शाळा समिती सदस्य डॉ. मीरा यादव, एस.बी. शेळवणे, संस्थेचे सर्व कार्यकारणी सदस्य, सर्व संस्था सदस्य, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. आर. सपताळे, पर्यवेक्षिका एन.बी. साठे, पर्यवेक्षक के. जी. मदने, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले.

### माचणूर येथील पुलावरुन नदीत उडी मारुन तरुणाची आत्महत्या

**मंगळवेढा दिनांक २१ मे-**

माचणूर येथील भीमा नदी पुलावरुन एका ३२ वर्षीय तरुणाने दारुच्या नशेत नदीत उडी मारुन आत्महत्या केली. घटनेची मंगळवेढा पोलिसात नोंद झाली आहे. दत्ता तुळशीराम माने (रा.घोडेश्वर) यांचा भाचा कुमार नेताजी साळुंखे (वय ३२) याने दि.१८ मे रोजी दुपारी ३ वाजता माचणूर येथील भीमा नदी पुलावरुन भीमा नदीच्या पात्रात दारुच्या नशेत उडी मारल्याने तो गंभीर जखमी झाला होता. नातेवाईकांनी त्याला तात्काळ उपचारासाठी मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले, मात्र तेथील डॉक्टरांनी तपासून तो उपचारापुर्वीच मयत झाल्याचे सांगितले. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## जि.प. शाळांमध्ये पुस्तकांची प्रतीक्षा

### मागणी २२ लाख पुस्तकाची; आली साडेपाच लाख पुस्तके

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२१ मे**

नवीन शैक्षणिक वर्ष अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले असताना जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना अद्याप पूर्ण पाठ्यपुस्तके मिळालेली नसल्याचे चित्र समोर आले आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी तब्बल २१ लाख ९९ हजार ५२२ पाठ्यपुस्तकांची मागणी नोंदविली होती. मात्र, आतापर्यंत केवळ ५ लाख ५५ हजार ४१२ पुस्तकेच जिल्ह्याला प्राप्त झाली आहेत. त्यामुळे अनेक शाळांना पुस्तकांची प्रतीक्षा करतच नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात करावी लागणार आहे.

राज्य शासनाकडून बालभारतीमार्फत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरवली जातात. यंदा विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणावर पुस्तकांची मागणी केली होती. मात्र, प्रत्यक्ष पुरवठा अत्यल्प प्रमाणात झाल्याने वितरण प्रक्रियेत मोठा विलंब निर्माण झाला आहे. प्राथमिक शिक्षण विभागाकडून प्राप्त झालेली पुस्तके तालुकास्तरावर पाठविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. काही शाळांना अंशतः पुस्तके मिळाली असली तरी अनेक विषयांची पुस्तके अजून पोहोचलेली नाहीत. परिणामी, शिक्षकांना अध्यापनाचे नियोजन करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यास सुरळीत सुरू होईल का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

विशेषतः ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये या समस्येची तीव्रता अधिक जाणवत आहे. अनेक पालकांनी शाळा सुरू होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांच्या हाती पुस्तके मिळावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली होती.

मात्र, अद्याप बहुतांश पुस्तकांचा पुरवठा बाकी असल्याने विद्यार्थ्यांना पहिल्या काही दिवसांत वहीवरच अभ्यास करावा लागण्याची शक्यता आहे. दरम्यान, शिक्षण विभागाने उर्वरित १६ लाख ४४ हजार ११० पुस्तके लवकरच उपलब्ध होतील, असा दावा केला आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पुस्तके पोहोचविण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.



#### अभ्यास पहिल्याच दिवसापासून विस्कळीत

नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे डिजिटल शिक्षणाच्या गप्पांपेक्षा विद्यार्थ्यांच्या हातात वेळेवर पुस्तके पोहोचणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास पहिल्याच दिवसापासून विस्कळीत होण्याची भीती शिक्षक व पालकांमधून व्यक्त होत आहे.

#### मागणीपेक्षा एक चतुर्थांश उपलब्धता

| | |
|---|---|
| पुस्तकांची एकूण मागणी | : २१,९९,५२२ |
| आतापर्यंत प्राप्त पुस्तके | : ५,५५,४१२ |
| अद्याप येणे बाकी | : १६,४४,११० |

## भाविकांची गर्दी वाढल्याने पाद्य अन् तुळशी पूजा बंद

- श्री विठ्ठल मंदिर समितीचा निर्णय
- १५ जुननंतर होणार पुर्ववत

**तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२१ मे -**

अधिकमासानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी भाविकांची गर्दी वाढली आहे. भाविकांचे दर्शन जलद आणि सुलभ व्हावे, तसेच दर्शनाचा कालावधी कमी करण्यासाठी मंदिर समितीने भाविकांकडून केल्या जाणाऱ्या पाद्य व तुळशी पूजा १५ जून पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. पूजा बंद केल्यानंतर दर्शनाचा कालावधी किमान दोनतासांनी कमी होईल, अशी माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

अधिक मासाला रविवारपासून (दि. १७) प्रारंभ झाला आहे. वारकरी संप्रदायामध्ये तसेच विठुरायाच्या भक्तांमध्ये या मासाला अधिक महत्त्व आहे. राज्यासह देशभरातून भाविक पंढरीत येऊ लागले आहेत. सध्या दररोज किमान एक लाखाहून अधिक भाविकांची मांदियाळी पाहायला मिळत आहे.

दरम्यान भाविकांची संख्या वाढल्याने पदस्पर्श दर्शनाची रांग विठ्ठल रुक्मिणी मंदिर पासून दोन किलोमीटर पर्यंत गेली आहे. गोपाळपूर रोडवरील पाच पत्राशेड भाविकांनी भरले आहेत. त्यामुळे दर्शनाचा वेळही वाढला आहे. भाविकांना कमी वेळेत जलद आणि सुलभ दर्शन व्हावे यासाठी मंदिर समितीने विविध उपाय योजना केल्या आहेत. यामध्ये व्हीआयपी दर्शनावर निर्बंध घातले आहेत.



#### नोंदणी केलेल्यांना पुढील महिन्यात संधी

ज्या भाविकांनी पाद्य व तुळशी पूजेची या महिन्यात नोंदणी केली आहे, त्यांना अधिक मास संपल्यानंतर क्रमानुसार पाद्य व तुळशी पूजा दिली जाणार असल्याचे मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले.

## अनधिकृत गॅस विक्रेत्यांकडून ग्राहकांची होतेय लुट

### पुरवठा विभाग लक्ष देणार का ?

**तभा वृत्तसेवा,
पिलीव, दि २१ मे -**

आखाती देशातील युद्धाचा परिणाम गॅस पुरवठ्यावर झाला असेल, नसेल पण पिलीव भागात अनधिकृत गॅस विक्रेत्यांकडून ग्राहकांची मोठी आर्थिक लुट केली जात आहे. ग्राहक अक्षरक्षः मेटाकुटीला आला असून पुरवठा विभाग याकडे लक्ष देणार का? असा प्रश्न विचारत आहेत.

गॅस ग्राहकांनी बुकींग केल्यानंतर एच पी २५ दिवसांनी तर भारत गॅस तब्बल ४५ दिवसांनी ग्राहकांना टाकी पुरवते. खरेतर ४५ दिवस हा खुप मोठा गॅप आहे. पण पिलीवमध्ये काही अनधिकृत स्वतःची एजन्सी नसणारे डिलर टाक्यांचा मोठा साठा करुन तब्बल २००० ते २५०० रुपयाला टाकी विकत आहेत. हा प्रकार गेल्या दोन-तीन महिन्यांपासून सुरु आहे. ग्राहकांना तुमची केवायसी नाही, केवायसीला वेळ लागतेय अशी कारणे देऊन गॅस दिला जात नाही.

हाच गॅस हॉटेल व गाडीमध्ये भरण्यासाठी तब्बल २००० ते २५०० रुपयाला विकला जातो. जी पावती निघते त्यापेक्षा १५० रुपये जास्त घेण्याचा धक्कादायक प्रकार पिलीव येथील एका अनधिकृत डिलरकडून सुरु आहे.

दुसरीकडे टाक्यांची प्रचंड कमतरता असताना या महाशयाकडे मात्र टाक्यांचा अक्षरशः ढिग लागला आहे. हा धक्कादायक प्रकार याठिकाणी दोन महिन्यापासून सुरू आहे. याबाबत अनेक ग्राहकांनी पत्रकारांकडे तक्रारीचा पाढा वाचला. आताच ही परिस्थिती आहे. अजून गॅस, पेट्रोल व डिझेल याच्या टंचाईचे सावट आहे.

टंचाईत तर अशा डिलरकडून ग्राहकांची अगणीत लुट होणार. अडचणीमुळे नागरिक तक्रारी करीत नाहीत, याचाच फायदा असे डिलर घेत आहेत. पुरवठा विभागाने याकडे ताबडतोब लक्ष देऊन ग्राहकांची लुट थांबवावी अशी मागणी होत आहे.

#### पुरवठा अधिकाऱ्यांशी संपर्क नाही

याबाबत माळशिरस तालुक्याचे पुरवठा अधिकारी शेटे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

## माणगंगेला मिळणाऱ्या उपनद्यांच्या स्वच्छतेला सांगोल्यात प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,
सांगोला,दि.२१ मे -**

माणगंगा भ्रमणसेवा बहुउद्देशीय संस्था वाडेगाव, श्री बृहद भारत सामाजिक संस्था मुंबई तसेच ग्रामस्थ मेडशिंगी यांच्या संयुक्त विद्यमाने सांगोला तालुक्यात माणगंगा नदीला मिळणाऱ्या उपनद्यांच्या स्वच्छतेचा प्रारंभ करण्यात आला.

पं.स.सभापती पुनम इंगवले, तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव, महिला सूतगिरणीच्या चेअरमन कल्पना शिंगाडे, प्रतापसिंह इंगवले, संतोष इंगवले, फॅबटेकचे भाऊसाहेब रुपनर डॉ.मच्छिंद्र सोनलकर, सुदर्शन इंगवले, प्रशांत पाटील, माणगंगा भ्रमणसेवा संस्थेचे अध्यक्ष वैजिनाथ घोंगडे, उपसरपंच शिवाजी दिघे, बसवेश्वर झाडबुके, इंजि.अमित नष्टे, गणेश इंगवले, संजय पाटील, प्रभाकर कसबे, प्रभाकर कांबळे, संजय नष्टे, संजय कसबे, तानाजी आळतेकर यांच्या हस्ते मशिनरीचे पूजन व श्रीफळ वाढवून शुभारंभ करण्यात आला.

सांगोला तालुक्यातील ५३ किलोमीटरचे माण नदीपात्र स्वच्छ करून पुनर्जीवित केल्यानंतर नैसर्गिक पाण्याचे स्रोत अधिक बळकट व्हावेत या दृष्टीने वाडेगाव परिसरातील शिंदे ओढ्याची स्वच्छता करण्यात आली. त्याचबरोबर अफ्रुका नदीपात्र स्वच्छ करून माण नदीला मिळणारे इतर ओढे स्वच्छ केले तर जलसंवर्धनाचे काम अधिक प्रभावी होईल, असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले. संजय मोरे व राजेंद्र सोनलकर यांच्या दोन जेसीबी मशीनद्वारे कामाला सुरुवात करण्यात आली.



## अक्कलकोट, चिंचोली एमआयडीसीतील समस्यांचा उहापोह

### जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी घेतली सोलापूर जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर दि. २१ मे -**

जिल्हा उद्योग मित्र समिती सभेची बैठक दि.२० मे रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत अक्कलकोट रोड व चिंचोली एमआयडीसीमधील विविध समस्यांबाबत उहापोह करण्यात आला.

बैठकीस इंडस्ट्रियल असोसिएशन, अक्कलकोट रोड एमआयडीसी व चिंचोली एमआयडीसीचे सदस्य व अधिकारी तसेच महापालिका अधिकारी उपस्थित होते. इंडस्ट्रियल असोसिएशनच्या वतीने औद्योगिक वसाहतींमध्ये पायाभूत सुविधांच्या कमतरतेबाबत मुद्दे मांडण्यात आले.

विशेषतः अक्कलकोट एमआयडीसीमध्ये पाणीपुरवठा, खराब रस्ते, ड्रेनेज लाईन आणि रस्त्यावरील लाईट या प्रमुख समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले. तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात टेक्स्टाईल शाखा सुरू करण्याची मागणी करण्यात आली. पाण्याच्या समस्येसंदर्भात महापालिका आयुक्तांसमवेत बैठक घेण्याबाबतही असोसिएशनने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी औद्योगिक वसाहतीमध्ये आवश्यक सुविधा पुरविणाऱ्या महापालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करून अडचणींबाबत चर्चा केली. एमआयडीसीमधील रस्त्यांच्या कामांसाठी शासनाकडून ७५ टक्के, महापालिकेकडून १२.५ टक्के आणि उर्वरित १२.५ टक्के हिस्सा जिल्हा नियोजन व विकास समितीद्वारे उपलब्ध करून देण्यास सुकाणू समितीने मागील बैठकीत मान्यता दिली होती. याबाबत अंमलबजावणी लवकरात लवकर करण्याचे निर्देश दिले.

बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, पॉलिटेक्निक कॉलेज आर. व्ही. मुंडे, डायरेक्टर यंत्रमाग संघ नारायण आडकी, उपाध्यक्ष टेक्सटाईल फाउंडेशन सोलापूर जयंत श्री अकेन, जनसंपर्क अधिकारी टेक्स्टाईल फाउंडेशन सुजय निकते, इंडस्ट्रियल असोसिएशन सेक्रेटरी शिवशंकर आंधळकर, व्यवस्थापक सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन एस. बी. गायकवाड, प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी एस.टी. राठोड., उप अभियंता बी.पी. खंदारे, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालक ओंकार चौरे, जिल्हा विकास व्यवस्थापक नाबार्ड नितीन शेळके, जिल्हा उद्योग केंद्र राजशेखर शिंदे, सीनियर कन्सल्टंट पुणे श्रीजीत नायर, जी.डी बाबर खादी ग्रामोद्योग मंडळ आदी महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



#### बैठक प्रत्येक महिन्याला घेण्याचे निर्देश

जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक उमेशचंद्र दंडगव्हाळ यांना बैठक दर तीन महिन्यांनी न घेता प्रत्येक महिन्याला घेण्याबाबत सूचना देण्यात आली. प्रत्येक विभाग प्रमुखांनी एमआयडीसी संदर्भातील अडचणींचा आढावा घेऊन पुढील पंधरा दिवसांत तो विषय बैठकीत मांडावा, अशी सूचना दिली.

#### अतिक्रमण काढण्याबाबत कडक कारवाईचे आदेश

एमआयडीसी परिसरातील अतिक्रमण काढण्याबाबत सूचना दिल्या. अतिक्रमण करणारे आणि त्यांना मदत करणारे या दोघांवरही कारवाईचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.